IRBK-0100222

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २२२

IRBK-0100222

IRBK-0100222

१५०८ — दा. क्र. २२२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 JUL 1983

ग्रं. नं. २२२/२

संगीत

# चित्रवंचना नाटक

हें पुस्तक

## वासुदेव वामन खरे

यांनीं रचिलें

तें

IRBK-0100222

पुणें येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं
छापिलें व वासुदेव वामन खरे यांनीं
मिरज येथें प्रसिद्ध केलें.

---

शके १८३८ इ. स. १९१७.

---

किंमत बारा आणे.

ना१२५
१६०८६.

# प्रस्तावना.

—: ० :—

या नाटकांत नायिका व तिची सखी यांनीं आपआपसांत नांवें व स्थानें बदलून नायकास फसविण्याचा उद्योग केला आहे एवढयावरून ' संदेश ' पत्राच्या आक्टोबर १९१६ च्या एका अंकांत कोणीं एकानें असें प्रसिद्ध केलें कीं, हें मूळ नाटक भास कवीनें केलें असून तेंच ' चित्रवंचना ' नांव देऊन मीं मराठींत उतरलें आहे ! आधीं भास कवीचें असलें संविधानक माझ्या पाहण्यांत नाहीं, आणि त्यांतून ही कल्पना सुचायला भासासारख्या प्राचीन कवीकडे धांव घेण्याचें कारणही नव्हतें ! नांवें व स्थानें बदलण्याची ही कल्पना सामान्य असून ती इंग्रजी नाटक-कादंबऱ्यांतून व आमच्या इकडच्या जुन्या गोष्टींतून कोणच्याना कोणच्या तरी रूपानें पुष्कळदां आलेली आहे. अशीच एक गोष्ट थोरले शाहूमहाराजांच्या बखरींत ( पृ. ५ ) नमूद आहे, ती वाचून मला या नाटकाचें संविधानक रचण्याची प्रथम स्फूर्ति झालेली आहे ! कुणीकडे भासकवि आणि कुणीकडे आमचे बखरवाले चिटणीस !

नाटक बसवितांना प्रयोगास अनुकूल असे पुष्कळ फेरफार मूळ पुस्तकांत करावे लागले. त्या कामीं मला शिवराज संगीत मंडळी'चे मालक रा. रा. गोविंद सदाशिव टेंबे व स्टेज डिरेक्टर रा. रा. राजाराम नारायण पुरोहित यांच्या सल्ल्याचा मोठा उपयोग झाला. याबद्दल या दोघांही गृहस्थांचा मी फार आभारी आहें. शिवाय रा. रा. टेंबे यांनीं पदांच्या चाली दिल्या व पुस्तकांत चित्रें घालण्याकरितां आपल्या मंडळीचे फोटो घेऊं दिले; याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले पाहिजेत.

मिरज, ता. २९ जानेवारी
सन. १९१७.

वासुदेव वामन खरे.

... ग्रं. सं. ग्रां. ...
222 ... ता. ...
ना१२५ ... क्र.

# पात्रें.

## पुरुष.

**माधव**—उज्जनीचा राजकुमार.

**कंक**—माधवाचा अनुचर.

**जालंदर**—गुर्जर देशांतला एक बंडवाला.

**प्रभाकर**—गुर्जराधीश्वर युगंधर राजाचा पुत्र.

## स्त्रिया.

**प्रभावती**—युगंधराची कन्या.

**मदयंती**—जालंदराची वाग्दत्त वधू व प्रभावतीची सखी

**चपला, सौदामिनी, मंदाकिनी, मदनिका, मोहिनी, चंद्रिका.** } प्रभावतीच्या सख्या.

**प्रतिहारी, छत्रधारिणी, चवऱ्या वारणाऱ्या मुली.** } प्रभावतीच्या दासी.

शिवाय आचारी, पाणक्या, कामाठी, कुळंबिणी, फुलारी वगैरे नोकर आणि सैनिक व दरवडेखोर वगैरे.

श्रीमन्महाराज शाहूछत्रपति

सरकार, राज्य करवीर

यांच्या सेवेस

अत्यंत पूज्यभावानें

हें नाटक समर्पण करितों.

नाटककार.

ठाणे. [illegible]
नों. ...
222
2222
[illegible]

॥ श्री ॥

# संगीत चित्रवंचना नाटक.

## अंक १.

### प्रवेश १.

स्थळः—आमोदसुंदर उद्यान.

( प्रभावती सर्व सख्यांसह मंगलाचरण करीत असतां पडदा उघडतो. )

**मंगलाचरण.**

रागः—तिलक कामोद. ताल—त्रिवट.

प्रकट-काम नाम-रूपें । तूं प्रभो नमोनी ।
तुज विनवुं कुमारी-। जन-कामना मना आणीं ॥ ध्रु० ॥
करु सुचरित तनु । राहु अंतरंगिं । धर्मवासना ।
मुखिं विलसो । मंगलमय वाणी ॥ १ ॥

रागः—भीमपलास. ताल—एक्का.

महावीर भुवन-धीर जनानंद-कर अनंग ।
विनवुं आज नमन करुनि ॥ ध्रु० ॥
सुगुण-रूप-शील-शालि । कांत असो प्राप्त असा ॥
लीना निशिदिनीं होऊं । रमण-चरणिं ॥ २ ॥

**प्रभावती:**—सख्यांनो, अनुरूप पति प्राप्त व्हावा म्हणून कुमारिकांनीं हा कामदेवाचा उत्सव दरवर्षास करायचा असतो, त्याप्रमाणें आम्हीं आज हा उत्सव सुरू केला आहे. पण या मदयंतीला आतां लवकरच तिच्या मनाजोगा नवरा मिळणारच आहे; तेव्हां तिचें नाहीं आतां या आमच्या उत्सवांत मन लागायचें !

**सौदामिनी:**—अगबाई ! मदयंतीचें का लग्न ठरलें आहे ? कसली लबाड आहे पण ! याबद्दल अगदीं अवाक्षर सुद्धां ही आजपर्यंत आमच्याजवळ बोलली नाहीं !

**चपला:**—अग, ती तशीच पहिल्यापासून पाताळयंत्री आहे, हें तुला नाहीं का ठाऊक ?

**मंदाकिनी:**—मदयंती, तर मग सांगच आतां आम्हांला, तुझें कोणाशीं लग्न ठरलें आहे तें ? त्या गृहस्थाचें नांव, गांव, कुळशीळ, ठाव, ठिकाण, धंदा, विद्या, रूप, गुण, धन, दौलत काय सगळी माहिती असेल ती एकदम सांगून टाक. पुन्हां पुन्हां विचारायला लावूं नकोस.

**चपला:**—मंदाकिनी, मी सारें सांगतें तुला. सुवर्णपुरचा व्यापारी धर्मनिधि म्हणून कोणी आहे, त्यानें इच्याबद्दल हिच्या बापाजवळ मागणी घातली आहे. अगदीं चांगले हिच्या मनाजोगे हौसेचे गृहस्थ मिळाले आहेत हो ! अगदीं सारा स्वयंवराचाच प्रकार घडला आहे म्हणे !

**प्रभावती:**—झालें तर. असा पति आपल्याला प्राप्त होणार ही मदयंतीची खात्री होऊन चुकली आहे; आणि म्हणूनच मीं मघांशी म्हटलें कीं, आमच्या या उत्सवाची तिला कांहीं आतां मौज वाटायची नाहीं.

**मदयंती:**—उत्सवाची मौज मला वाटत नाहीं असें कसें होईल ?

पण या उत्सवाचे आरंभीं आपण जी प्रार्थना केलीत तीं मात्र मला नाहीं आवडली. म्हणे " लीना होऊं रमण-चरणिं ! " स्त्रीनें पतीवर जें प्रेम करायचें तें कांहीं त्याच्या चरणीं लीन होण्यासाठीं नाहीं करायचें ! समाजांत आपली मानमान्यता वाढावी, संपत्ति ऐषआराम यांचा उपभोग मिळावा, आपलें मन सदासर्वदा प्रसन्न असावें, आणि मनाप्रमाणें हौस मौज करायला सांपडावी, एवढ्यासाठींच देवाजवळ पति मागायचा, आणि त्यावर प्रेम करायचें बरें का !

**प्रभावती:**—मदयंती, स्त्रीनें पतीवर प्रेम कशाकरितां करावें, संसारसुखाचें स्वरूप कशा प्रकारचें असावें, याबद्दलचे तुझे विचार मीं एवढा वेळ ऐकून घेतले. पण तुला बजावून ठेवतें कीं, हे विचार तूं सोडून न देशील तर संसारांत तुझी निराशा झाल्याशिवाय राहणार नाहीं. स्वार्थसाधन हाच केवळ प्रेमाचा हेतु आहे असें तूं समजतेस; पण खरें प्रेम ज्याला म्हणतात त्याला हेतु मुळींच लागत नाहीं. आणि खरें पाहिलें तर जगाची रहाटी अशा निर्हेतुक प्रेमावरच चालली आहे.

### पद.

राग–जिल्हा काफी. ताल–त्रिवट.

**जीवनरस प्रेम । पाप-हारि ।**
**जीवनरस प्रेम सदा शोभे दिनकरसम ।**
**छल-मल-लव हें न साहे ॥ ध्रु० ॥**
**लघु-चल-फल मिळवाया ।**
**पतिमन वळवावें म्हणसि हें प्रेम नोहे ॥ २ ॥**

**मदयंती:**—ताईसाहेब, रागावूं नका. आपण निर्हेतुक प्रेम म्हणतां तें कसलें असतें हें कांहीं मला समजत नाहीं. प्रीति ही केवळ स्वतःच्या सुखाकरितांच आहे, कांहीं तरी स्वतःचा

फायदा दिसल्यावांचून ती दुसऱ्याला देणें हा वेडेपणा आहे, असेंच मला वाटतें. तें कसेंही असो. माझे विचार माझ्यापुरते. पण आपण ज्या खऱ्या प्रीतीचें एवढा वेळ वर्णन केलें, ती आपली प्रीति कोणा तरी भाग्यवानाला लवकरच प्राप्त होणार आहे, असें मीं परभारें ऐकलें. आपण मात्र मला त्यांतलें कांहींच कळवलें नाहीं, हें कसें काय ?

**प्रभावती:**—( इतर सख्यांस ) सख्यांनो, जा पाहूं आरतीची तयारी करा, तोंपर्यंत आम्ही येतोंच. जा, सगळ्या जणी जा. (सख्या जातात. ) मदयंती, माझ्या लग्नाबद्दल तूं काय काय ऐकलेंस तें सांग पाहूं.

**मदयंती:**—मालव देशाचे अधिपति धुरंधर महाराज यांचा पुत्र माधव म्हणून आहे, त्याच्याशीं आपलें लग्न व्हायचें घाटतें आहे असें मीं ऐकलें. खरें ना पण हें ? आपण तर एवढा वेळपर्यंत कांहींच कळवलें नाहीं !

**प्रभावती:**—मदयंती, तुला कळवण्याजोगें अजून जर कांहीं घडलेंच नाहीं, तर कळवूं तरी काय ?

**मदयंती:**—छे बाई ! आपण कांहींच सुगावा लागूं देत नाहीं, हें चांगलें नव्हे बरें का !

**प्रभावती:**—( तिच्या गळ्यांत हात घालून ) गडे मदयंती, तूं आणि मी जिवलग मैत्रिणी हें तर खरेंना ? माझा प्रभाकरदादा म्हणत असतो, कीं प्रभावती आणि मदयंती या जणूं काय विशाखा नक्षत्राच्या तारकाच ! जिथे एक असेल तिथे दुसरी असायचीच !

**मदयंती:**—आणि माझे वडील म्हणत असत त, माझ्या ' यंतीला उन्हाची तिरीप लागली, तर राजकन्येचें तोंड कोमेजून जातें, आणि राजकन्येला कांटा लागला तर मदयंतीच्या डोळ्याला

पाणी येतें ! खरेंच ताईसाहेब, आपल्याविषयीं मला व माझ्याविषयीं आपणाला हें असें कां वाटतें ?

**प्रभवाती:**—गडे, ही आपली मैत्री अशीच आहे. ( परस्परांस आलिंगन देतात. ) हें जें आमचें प्रेम आहे, त्याचा बिघाड कोणाच्यानें तरी होईल का ग ?

**मदयंती:**—( कामदेवाच्या मूर्तीकडे बोट दाखवून ) या कामदेवाच्या लीलेमध्यें प्रेम आणि वैर हीं दोन्ही उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे असें म्हणतात. पण या देवाच्या हातूनसुद्धां आमच्या प्रेमाची ताटातूट करणें कध्धीं कध्धीं होणार नाहीं !

## पद.

राग—सोरट. ताल—त्रिवट.

**हा मदन मज मंद भासे ।**
**कलह करिन परम सुहृदिं अभिमान धरित ॥ ध्रु० ॥**
**प्रेम-भरें सुघटित अमुच्या मनिं ।**
**कोण निपजवि वैर अहित ॥ ४ ॥**

**प्रभावती:**—सखे, देंवतेची अवज्ञा करूं नकोस.

**मदयंती:**—( हंसून ) यांत कसली मी अवज्ञा करतें आहें ? आम्हां दोघींमध्यें वैर उत्पन्न करण्याचा प्रभाव जर कामदेवाच्या लीलेमध्यें असलाच, तर त्यानें तसें करून दाखवावें म्हणजे झालें !

**प्रभावती:**—अशी जर आपली मैत्री आहे तर माझ्या लग्नासंबंधानें महत्त्वाचें म्हणण्याजोगें जर कांहीं घडलें असलें तर तें तुला सांगितल्याखेरीज मी कशी राहीन ?

**मदयंती:**—पण आतांपर्यंत काय काय झालें आहे एवढें तरी सांगाल कीं नाहीं ?

**प्रभावती:**—सांगायचें काय ? तिकडच्या माणसांनीं माझी तसबीर

पसंत केली आहे, आणि इकडच्या माणसांना त्या कुमाराची तसबीर आवडली आहे. यांत काय तुला सांगायचें !

**मदयंती:**—इतकें झालें आहे ना ? मग काय ! लग्न ठरल्या-दाखलच आहे.

**प्रभावती:**—कोणाचें ? तसबिरी तसबिरीचें ?

**मदयंती:**—ताईसाहेब, रागावूं नका. तसबिरी तसबिरीचें म्हटलें तरी त्यांत काय चुकलें ? राजेलोकांच्या मुलांमुलींचीं लग्नें म्हणजे आपण बाहुलाबाहुलींचीं लग्नें करीत होतों त्यांतलाच प्रकार; आणि दुसरें काय ?

**प्रभावती:**—तें ग कां ? प्रीति हा पदार्थ त्यांना माहीतच नसतो, कीं त्यांना आवडानिवड करायची नसते ? तुझें ह्मणणें तरी काय ?

**मदयंती:**—ताईसाहेब, रागावूं नका ह्मणून बोललेंच आहें. तें जर कबूल असेल तर पुढें बोलेन.

**प्रभावती:**—बोल. बोल. अगदीं मोकळ्या मनानें बोल.

**मदयंती:**—हें पहा, या सृष्टींत यक्ष, गंधर्व, किन्नर, देव, दानव, मानव अशा ज्याप्रमाणें निरनिराळ्या जाती आहेत, तशी आपली सुद्धां निराळी जात आहे, असें राजेलोक समजत असतात. त्यांना शरीरसंबंध करणें झालें तर तो बहुधा आपापल्यांतच करतात. आपल्या वर्गांत बाहेरच्या माणसांचा रिघाव सहसा होऊं देत नाहींत. यामुळें त्यांचीं लग्नें ठरतात तेव्हां वधूवरांची रूपसंपत्ति, सुस्वभाव, सुशिक्षण यांचा विचारसुद्धां कोणी करीत नाहींत ! वधू थोटी, पांगळी, वेडसर कशी असली तरी चालते. मात्र ती राजकन्या असली ह्मणजे झालें ! आपल्या लग्नाच्या बाबतींत तसबीर पाहण्याचा प्रकार घडला हें तरी फार झालें समजा ! जें मी वधूविषयीं बोललें तेंच वराला-ही लागू आहे. राजकन्येच्या नशीबानें नवरा शहाणा आणि सुंदर

मिळाला तर बराच; पण तो तसा नसला तरी नुसता राजकुलांत त्याचा जन्म आहे एवढ्याच गोष्टीवरून तो पसंत ठरतो! राजांच्या मुली उपवर झाल्या ह्मणजे, या अमक्या राजाच्या मुलाला ह्मणतात, आणि देऊन टाकतात! त्या मुलाच्या पाहिल्या दहा बायका असल्या तर त्यांतच ही अकरावी, आणि मागाहून आणखी दहा त्यानें केल्या तर ही एकविसावी! अशा तऱ्हेनें ज्यांचीं लग्नें झालीं आहेत त्या राण्यांना खरें संसारसुख ह्मणजे काय हें कुठून माहीत असणार? धर्मनिधींच्या सहवासापासून मला जसें सुख मिळेल तसें ताईसाहेब, पतीच्या सहवासापासून आपल्याला कधीं तरी मिळणार आहे का? वैभव, अधिकार हीं मिळतील; हें कबूल आहे, पण माझें सुख कांहीं आपल्याला मिळणार नाहीं.

**प्रभावती:**—इतकें जर आहे, तर हा राजपुत्र मला पहायला तरी कशाला येतो आहे?

**मदयंती:**—तो कसचा पहातो आणि कसचें काय? तो आपला उगीच येतो आहे. लग्नाकारितां वराला वधूच्या घरीं यायचेंच असतें, तो पाहुणचार घ्यायला चार दिवस आधीं येतो आहे. दुसरें काय?

**प्रभावती:**—तूं म्हणते आहेस हें सारें बरेच दिवस माझ्या माझ्या मनांत घोळतें आहे. लग्नाच्या बाबतींत हल्लीं राजेलोकांत जी रूढि पडली आहे ती मोडलीच पाहिजे; आणि तिच्या जागीं प्रीतिविवाह सुरू झालेच पाहिजेत. मी तर माझ्या लग्नाच्या कामांत असला सावळागोंधळ कधींही होऊं देणार नाहीं. जिथे प्रीति नाहीं तिथे लग्न कसलें?

**मदयंती:**—ताईसाहेब, असें आपण म्हणतां खरें, पण त्या कुमाराची प्रीति आपणावर खरोखरीच आहे याबद्दलची खात्री आपण करून घेणार कशी? कारण, सहवासाशिवाय कुमाराचें मन आपल्याला ओळखतां येईल कसें?

**प्रभावती:**–कुमाराचा आणि माझा सहवास घडल्याशिवाय माझ्या लग्नाच्या बाबतींत प्राण गेला तरी मी कोणाचें कांहींएक ऐकणार नाहीं असा जेव्हां मीं हट्टच धरला, तेव्हां आईसाहेबांनीं आणि प्रभाकरदादानें आर्जव करून आणि युक्तिप्रयुक्तीनें समजूत घालून या उद्यानांत मला पंधरा दिवस राहूं देण्याबद्दल महाराजांचा रुकार मिळवला आहे. मी या नर्मविलास मंदिरांत राहणार, आणि कुमार माधव येथें आले म्हणजे त्या पलीकडच्या शर्मविलास मंदिरांत राहतील. मग कुमारांचें आणि माझें बोलणें चालणें दररोज व्हायला कांहीं हरकत पडणार नाहीं. कुमाराची प्रीति खरोखरीच माझ्यावर आहे कीं काय, हें पाहण्याकरितां मी काय तजवीज करतें याची विचारपूस पंधरा दिवसपर्यंत वडील माणसांनीं कांहींएक करायची नाहीं, असें सुद्धां मीं ठरवून घेतलें आहे.

**मदयंती:**–कुमार आणि आपण आपापल्या परिवाराचीं माणसें बरोबर घेऊन शहराबाहेर या उद्यानांत राहणार, आणि जालंदराचा पुंडावा तर दिवसेंदिवस जास्तच वाढत चालला आहे; तेव्हां इथे राहून आपला निभाव कसा लागणार ?

**प्रभावती:**–जालंदराच्या बंदोबस्ताकरितां म्हणून महाराजांनीं प्रभाकरदादाची स्वतंत्रच नेमणूक केली आहे. त्याची नको आतां काळजी !

**मदयंती:**–हा जालंदर म्हणजे प्रजेला एक कृतांतच उत्पन्न झाला आहे ! महाराजांच्या सुद्धां फौजेला दाद देत नाहीं, आणि युवराजांनासुद्धां वचकत नाहीं; तेव्हां मी म्हणतें, असा हा मेला आहे तरी कोण ? हो, बरें आठवलें ! मी इकडे आलें तेव्हां बाबांनीं मला कांहीं कामाकरितां लवकर परत ये म्हणून सांगितलें आहे. याकरितां मला निरोप द्या. मी जातें आतां.



**प्रभावती**—अधिराज्य रति-पति नृपाचें।
नव-राज्य मोहन विशाल भ्रांति-भय-कारी ! ॥

( पृ० १ )

**प्रभावती:**—अग थांब. अशी घाई कां ? आरती होईपर्यंत नाहीं का थांबत ?

**मदयंती:**—छे. छे. मला गेलेंच पाहिजे.

**प्रभावती:**—बरें आहे. ये हो. पण त्या कुमार माधवांच्या प्रेमाची परीक्षा करण्याच्या कामांत मला कदाचित् तुझ्याही मदतीचें कारण पडेल. बोलावणें पाठवीन तेव्हां येशील ना ?

**मदयंती:**—( जातां जातां ) ताईसाहेब, हें आपण विचारायला का पाहिजे ? सांगाल तेव्हां पडेल तें काम करायला मी तयार आहें बरें ! ( जाते. )

**प्रभावती:**—माझी बालदशा संपून यौवनाला प्रारंभ झाल्यामुळें माझ्या डोळ्यापुढें दिसूं लागणारें मन्मथाचें हें अफाट साम्राज्य मला किती तरी रमणीय दिसतें आहे ! या प्रदेशाचा कांहींच परिचय नसल्यामुळें यांत प्रवेश करायला मन कचरतें, पण पाऊल आपाआप पुढें धांव घेतें याला मी काय करूं ?

## पद.

**राग**—पूर्वी. ताल त्रिवट.

**अधिराज्य रति-पति-नृपाचें ।**
**नव-राज्य मोहन विशाल भ्रांति-भय-कारी ।**
**हें केंवि मार्ग काढुं यांतुनी ॥ ध्रु० ॥**
**मन बावरे मार्गीं या परी पद चपल**
**कां धांव घे ॥ ५ ॥**

## प्रवेश २.

स्थळ:-कुबेरदत्ताच्या वाड्यामागील बाग.

( मदयंती गात येते. )

### पद.

राग-यमन. ताल-त्रिवट.

प्यारी नारी विलसलि।
प्रिय-हृदय-कमालिं जशी कमला निवसलि॥ ध्रु०॥
सुंदर कोमल ही सुम-कलिका।
विजयि-मदन-करवाली चमकलि॥ १॥
पेलव दुर्बल कमल-मृणाली।
मदकल-वारण-वारणिं रमली॥ २॥

धर्मनिधींनीं दागिने आणण्यासाठीं गांवाला जातों म्हणून काल सांगितलें खरें, पण ते दागिने तर त्यांनीं आज पाठवून दिले; यावरून ते कांहीं अजून गांवाला गेले नाहींत असें वाटतें. तर मग ते आहेत तरी कुठे, आणि करताहेत तरी काय? ( थांबून ) दागिने पाठवून द्यायचे, आणि ते घालून मी कशी दिसतें हें पहायला यायचें नाहीं म्हणजे काय? या हेटाळणीबद्दल मी त्यांच्यावर रागावेन. रुसेन. त्यांनीं किती समजूत केली, ते कितीन्दां जरी पायां पडले, तरी मनाचा निष्ठुरपणा मी पुष्कळ वेळ नाहींच सोडणार! ( खिन्न मुद्रेनें ) पण हें सारें माझें मनोराज्यच चाललें आहे! ते दृष्टीस पडल्यावर हे सारे खेळ खेळायचे आहेत, आणि ते तर कुठेच दिसत नाहींत! ( पडद्यांत शब्द होतो-अरे, हा जालंदर धनुर्धर, चोरट्यांच्या टोळीसमवेत राजपुत्र प्रभाकर व त्याचे सैनिक यांच्याशीं लढत लढत पळून चालला आहे. याकरितां आडरस्ते, गल्ल्या,

चव्हाटे रोंखून धरा हो!) काय? जालंधर धनुर्धर आसपास आला आहे म्हणतात? आणि माझ्या अंगावर हें इतकें जवाहीर! आतां काय करूं! (कानोसा घेऊन) अगबाई! हा सारा घोळका अगदीं जवळ आला आहेसें वाटतें. आतां या देवळाआड दडून रहावें. (दडते. तों जालंदर व चोरटे लढत लढत पळत आहेत, प्रभाकर व सैनिक त्यांना पकडण्याचा यत्न करीत आहेत, असा देखावा तिच्या नजरेसमोरून जातो.) हाय हाय! माझ्या डोळ्यांपुढें अंधारी आली! माझ्या अभागी जिवा! कायरे तूं हें पाहिलेंस! आपल्या विशाल वक्षःस्थळावर सैनिकांच्या तरवारीचे घाव घ्यायला न कचरणारा जालंदर धनुर्धर आणि मी ज्याला प्रियकर समजत होतें तो धर्मनिधि हे एकच आहेत? हो. एकच आहेत! दागिन्यांचीं गांठोडीं बांधून लढत लढत पळणाऱ्या चोरट्यांचा पुढारी जालंदर आणि मी ज्याला प्रियकर समजत होतें तो धर्मनिधि हे एकच आहेत? होय. एकच आहेत! देवा! आजपर्यंत मी आनंदमय स्वप्नसृष्टींत वावरत होतें, त्या तूं मला कशाला बरें जागें केलेंस? माझ्या प्रियतमाच्या जोडीचा पुरुष साऱ्या दुनियेंत नाहीं म्हणून मी फुशारकीनें माझ्या वयाच्या सर्व मुलींना—प्रभावतीला सुद्धां—हिणवीत होतें, त्या माझी अशी लाजिरवाणी दशा व्हावी काय? जो हिरा म्हणून शिरावर मिरवीत होतें तो गारेचा तुकडा निघावा ना! धिःकार! धिःकार असो ह्या दैवाला! एकूण मी दरवडेखोराची बायको होणार आं? अरेरे! हा विचार मनांत येऊन जिवाला खंती वाटूं लागते, आणि हें तोंड कुठे दडवावें आणि काय करावें हें कांहींच सुचत नाहीं! (किंचित् विचार करून) या दुष्टाचें हें खरें स्वरूप दृष्टीस पडल्यामुळें याचा मला अगदीं अगदीं वीट आला आहे. हा दरवडेखोर दररोज दरवडे घालणार, चोऱ्या करणार, आणि आश्रयाकरितां माझ्याजवळ येणार; तें उघडकीला आलें तर हा प्राणाला मुकेल तें एक असो मेलें, पण मला राजदंड भोगावा

लागेल; माझी छीः थू होईल; त्याची काय वाट ? छे ! छे ! हें अगदीं उपयोगीं नाहीं. आतां त्याला माझ्या वाऱ्याला सुद्धां उभा राहूं देणार नाहीं ! ( जालंदर येतो. )

**जालंदर**:—प्रिये, मी आतां तुझ्या समोरून पळत गेलों तेव्हां तूं मला ओळखलें नसशील !

**मदयंती**:—( स्वगत ) ओळखलें नसतें तर किती चांगलें झालें असतें !

**जालं०**:—पण तूं या देवळाआड लपली होतीस तरी मीं तुला जातां जातां ओझरतें पाहिलेंच ! ( जवळ जातो. )

**मद०**:—हां ! व्हा एकीकडे ! असला मानभावीपणा करून माझा गळा कापीत होतां, आणि पुन्हां मला तोंड दाखवायला यायला लाज कशी वाटत नाहीं तुम्हांला ?

**जालं०**:—हें पहा, आतां बोलायचें भांडायचें काय असेल तें मग पाहूं. तूं न प्रभाकरानें चोहोंकडच्या वाटा घेरून मला प्राण-संकटांत पाडलें आहे. या वेळीं माझ्या धर्मपत्नीखेरीज मला कोण वांचवणार ?

**मद०**:—खबरदार मला पत्नीबित्नी ह्मणाल तर ! आतां मी तुमची कोणी नव्हें. इथे नाहीं तुम्हांला थारा मिळायचा. हां, बोलत उभे राहूं नका. लवकर येथून निघून जा.

**जालं०**:—आतां कुठे जाऊं ? या देवळांत तुझ्या पाठीमागेंच मला लपलें पाहिजे. तूं दारांत उभी रहा. हे आलेच सैनिक! कोणी तुला विचारतील तर मी इथे नाहीं ह्मणून बेधडक सांग. कां ? मीं सांगितलेलें ऐकत नाहींस ? ( दरडावणीच्या स्वरानें ) हें पहा मदयंती, आजपर्यंत दरवडेखोर सरकारांत सांपडलेले आहेत ते सर्व त्यांच्या विश्वासघातकी बायकांनीं धरून दिलेले आहेत, त्याप्रमाणें



**प्रभाकर**—जालंदर कुठे आहे हें हिला कुठून ठाऊक असणार ? ( पृ० १३ )

तूं करायला जाशील तर तत्काळ प्राणाला मुकशील. सैनिकांना उत्तर देतांना जर तुझी यत्किंचित् चलबिचल मला दिसून आली, तर तरवारीनें हें तुझें सुंदर शिरकमल छाटलेंच म्हणून समज! याद राखून ठेव. रहा दारांत उभी. (तिला ओढीत नेऊन देवळाच्या दारांत उभी करतो व आपण देवळांत दडतो. )

( सैनिक येतात. )

१ **सैनिकः**—बाई, जालंदर धनुर्धर कुठे आहे ?

( मदयंती ठाऊक नाहीं म्हणून मान हालवते. )

२ **सैनिकः**—तो याच वाटेनें येथपर्यंत आला असा आम्हीं पत्ता लावला आहे. तो इथेच कुठे तरी लपला असला पाहिजे.

**मद०:**—( स्वगत ) हा मेला बेरड इथेच माझ्या पाठीमागें दडला आहे म्हणून बोलूं का आतां ?

३ **सैनिकः**—बाई, उत्तर दे. तूं कां बोलत नाहींस ? ( मदयंतीच्या मानेला जालंदर तरवारीच्या टोंकानें स्पर्श करितो. )

**मद०:**—अग आई ! ( रडूं लागते. )

१ सैनिकः—बाई, तूं एकदम रडूं कां लागलीस ? तुला काय झालें ?

( प्रभाकर घाईघाईनें येतो.)

**प्रभाकरः**—अरे बैलांनो, ही प्रभावताची सखी मदयंती हें तुम्हांला ठाऊक नाहीं ?

२ **सैनिकः**—( चरफडत स्वगत ) कुणा लेकाला ठाऊक आहे ही मदयंती का दमयंती का रमयंती ती ?

**प्रभा०:**—जालंदर कुठे आहे हें हिला कुठून ठाऊक असणार ?

त्याचें नांव ऐकल्याबरोबर बिचारी रडूंसुद्धां लागली ! मूर्ख बेटे ! हिच्याशीं बोलण्यांत व्यर्थ वेळ मात्र घालवलात. तेवढ्या वेळांत जालंदर कुठे नाहींसासुद्धां झाला असेल ! आतां तरी चला लौकर ! मदयंती, तूं इथे खुशाल उभी रहा. जालंदराची भीति बिलकुल बाळगूं नकोस. ( प्रभाकर व सैनिक जातात. )

**मद०:**–( स्वगत ) हा काळ माझ्या मानगुटीला बसला आहे याची भीति कशी नको बाळगूं ?

**जालं०:**–( देवळाबाहेर येऊन हंसतो. ) हात् मूर्खा प्रभाकरा ! हा गडी तुझ्या देवाला सुद्धां सांपडणारा नव्हे, तो तुला कोठून सांपडणार ? भटक ! भटक ! अगदीं जीव कासावीस होईपर्यंत भटक, आणि शेवटीं जा रडत बापाला सांगायला कीं, " जालदंर सांपडत नाहीं ! " मदयंती, तुझ्या मनांतून आज खचित मला धरून द्यायचें होतें. चंडाळणी, आजपर्यंत मीं तुझें असें कोणचें अप्रिय केलें म्हणून तूं माझ्यावर फिरली आहेस ?

**मद०:**–धर्मनिधि !

**जालं:**–धर्मनिधि नव्हे, जालंदर धनुर्धर.

**मद०:**–पण मला धर्मनिधि हेंच नांव बरें वाटतें.

**जालं०:**–नुसतें बरें वाटून काय उपयोग ? तं शोभलें पाहिजे ना ? माझा धंदा अधर्मनिधीचा, आणि नांव म्हणे धर्मनिधि ! पुष्कळ दिवसांपासून मी तुझ्या टपणीवर होतों, आणि तुला माझ्या जाळ्यांत अडकवण्यासाठीं राजरोसपणें मला तुझ्या बापाच्या घरीं राहतां यावें म्हणून तें नांव मीं तुला सांगितलें होतें.

**मद०:**–मी तुमची प्रार्थना करतें, माझें नांव सोडून द्या.

**जालं०:**–ऊं हूं ! तें माझा प्राण गेला तरी व्हायचें नाहीं.

**मद०**:–तुम्हांला दुसरी बायको नाहीं का कुठे मिळणार ?

**जालं०**:–मिळेल. तुझ्यापेक्षां सुंदर सुद्धां मिळेल. मी कुठे नाहीं म्हणतों ? पण मला तूंच हवीस याला काय करायचें ? हे मोहिनि ! हे मदनमंजरि, हे शृंगारतरंगिणि, पृथ्वीतील सर्व स्त्रिया मी तुझ्यावरून ओंवाळून टाकतों !

**मद०**:–( कपाळाला हात लावून ) फुटकें कपाळ माझें !

**जालं०**:–तें कां फुटकें असेल ? कुंकुमाच्या तिलकानें अलंकृत असें हें तुझें विशाल भाल जात्याच सुंदर असून या तुझ्या कुटिल केशराजीनें अंशतः झांकल्यामुळें तें अधिकच खुलून दिसतें आहे ! ( तिच्या कपाळावरचे केंस दूर करितो. त्याच्या स्पर्शामुळें ती कांपते. तो तिचा हात धरूं लागतो. ती त्याचा हात झिटकारते व दूर उभी राहते. ) कां ? तुझ्या प्रेमाचा पाझर आज अगदींच कसा आटून गेला ? तूं माझ्याशीं एकही आनंदाचा शब्द बोलूं नयेस काय ? आज मी एवढ्या अरिष्टांतून बचावलों, याचा तिळमात्र सुद्धां संतोष माझ्या स्त्रीला वाटूं नये काय ? बोल ! सुंदरि ! एक शब्द तरी बोल !

## पद.

राग–मांड. ताल–दीपचंदी.

**टाकिं अबोला। सदये॥ ध्रु०॥**
**बोल मधुर मृदु प्रेमादर-वाणी॥**
**संमुख शशिमुख सखये करुनी॥ ७॥**

**मद०**:–( स्वगत ) याच्याशीं मऊ बोलून नाहीं हा ऐकायचा ! ( उघड ) पुरे करा हा लघळपणा ! माझें कांहीं तुम्हांशीं लग्न झालेलें नाहीं. तुम्ही मला काय म्हणून आपली स्त्री म्हणतां ?

**जालं०**:–लग्नाचा सोहळाच म्हणतेस ना ? त्याचें काय ? तो

केव्हां तरी माझ्या सोईप्रमाणें होईलच. पण काल सर्व जातगोतासमोर तुझा व माझा जो वाङ्‌निश्चय झाला आहे, तेवढा तुझ्यावर हक्क सांगायला मला पुरे आहे. इतक्या लोकांसमोर झालेलें हें वचन म्हणजे कांहीं अंथरूण पांघरूण नव्हे, कीं वाटेल तेव्हां वापरावें आणि वाटेल तेव्हां झुगारून द्यावें !

**मद०:**—पण माझा वाङ्‌निश्चय धर्मनिधीशीं झालेला आहे. तुमचें नांव जालंदर आहे.

**जालं०:**—पण माझें पाळण्यांतलें नांव धर्मनिधि असेंच आहे !

**मद०:**—मीं ज्याला वरलें तो व्यापारी होता. तुम्ही दरवडेखोर आहां.

**जालं०:**—दरवड्यांतला माल खपवण्याकरतां मलाही केव्हां केव्हां व्यापारी बनावेंच लागतें. मी स्वतःला व्यापारी म्हणवून घेतलें तर त्यांत कांहींएक खोटें नाहीं.

**मद०:**—हा सारा उद्योग तुम्हीं लबाडीनें केलेला आहे. मला तो मुळींच मान्य नाहीं.

**जालं०:**—काल जो तुझा माझा सर्व जातगोतासमोर वाङ्‌निश्चय झाला आहे, त्याची वर्दी तुझा बाप कुबेरदत्त यानेंच स्वतः महाराजांपर्यंत नेऊन पोंचवली आहे. अर्थात् हा वाङ्‌निश्चय नुसता लोकमान्य नसून राजमान्यही झालेला आहे. तो तूं आतां अमान्य करून कसें चालेल ? कालच्या वाङ्‌निश्चयानें तूं आणि मी जन्मभर बद्ध झालेलीं आहों. त्यांतून तुझी सुटका कधींही व्हायची नाहीं.

**मद०:**—असें काय ? तर मग दरवडेखोराची बायको मी कधींही होणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवा. या क्षणापासून तुमचें माझें नातें तुटलें !

**जालं०:**–नातें तुटलें असें तूं म्हणतेस; परंतु तूं मला प्राणाहून सुद्धां प्रिय आहेस याकरितां मी तुला कधींहीं सोडणार नाहीं. तुला मी माझी स्त्री याच नात्यानें वागवणार, आणि तूंही माझ्याशीं एकनिष्ठपणानें वागलेंच पाहिजेस. मी आतां जातों. पण मी दूर गेलों असा भ्रम धरूं नकोस, आणि स्त्रीधर्माला विसंगत असें कोणतें-ही कुकर्म करण्याच्या भरीस पडूं नकोस. तूं हातवारे करते आहेस आणि माना उडवते आहेस, यावरून माझ्या सांगण्याप्रमाणें वागा-यचें तुझ्या मनांत नाहीं असें दिसतें. पण मी तुला बजावून ठेवतों कीं, जर तूं माझ्याशीं दगलबाजी करशील, तर त्याचा सूड तूं जिथे असतील तिथे येऊन मी घेईन. माझा बाण अमोघ आहे. माझी दृष्टि फार तिखट आहे दूरच्या अंतरावर घडत असलेल्या बारीकसारीक गोष्टी सुद्धां मला दिसतात. मी उत्तम नट असल्यामुळें केव्हां कोणचें सोंग घेऊन तुझ्यापर्यंत येऊन पोहोंचेन ह तुला कळणार सुद्धां नाहीं. माझ्याशीं नीट वागलीस तर तुला पट्टराणीचें सुख प्राप्त करून देईन. आणि जर माझ्याशीं बेइमानी केलीस तर दयामाया न धरतां तुझी मान अश्शी अश्शी कापीन. ( धारेच्या उलटच्या बाजूनें तरवार तिच्या मानेवर घांसतो. ती किंकाळी फोडते व जालंदर पळून जातो. )

**मद०:**–( आसपास पाहून ) गेला मेला एकदांचा! यानें कितीही बडबड केली, आणि कसलेंही भय दाखवलें तरी याला मी नाहींच जुमानीत! जो पुरुष मला योग्य वाटेल त्याच्याशीं लग्न करून घ्यायला मी मोकळी आहें असेंच मी समजतें, आणि अश्शीच मी वागणार! ( थांबून ) पण मला महत्त्वाला चढवणारा, आणि संपत्तीचा उपभोग मिळवून देणारा पति कसा प्राप्त होणार? मी प्रभावतीला तुच्छ करीत होतें त्या माझी ही अशी स्थिति झाली! तिला मात्र वरण्यासाठीं तो मालव देशाचा राजपुत्र कुमार माधव येथें आला आहे त्याच्याशीं

तिचें लग्न होऊन तिचे सर्व मनोरथ पूर्ण होणार ! माझें दुर्दैव असें आणि तिचें सुदैव तसें ! ( विचार करून ) बरें, पण हा जो कुमार इथे आला आहे, त्यालाच मोहपाशांत गुंतवण्याचा यत्न मीं कां करूं नये ? प्रभावतीला नवरा दुसरा कोणी तरी राजपुत्र मिळेल हें खचित. राजपुत्राची बायको होण्यासाठींच ती जन्माला आली आहे. पण मला मात्र त्या कुमारासारखा पति मिळणें दुर्लभ आहे ! ( थांबून ) छे ! काय ही वेडेपणाची आशा ! तो राजकुमार माझ्या दृष्टीलासुद्धां पडणें कठिण, मग बाकीच्या गोष्टींचें नांव कशाला !

( मदनिका येते. )

**मदनिका०:**—मदयंती, तुला कुठे कुठे ह्मणून हुडकावें ! चल. आत्तां तुला ताईसाहेबांनी वाड्यांत बोलावलें आहे. येशील ती तिकडे पंधरा दिवस रहायच्या बेतानें ये, असें त्यांनीं सांगितलें आहे. उज्जनीहून कुमार माधव इथे आले आहेत ते आमोदसुंदर उद्यानांत उतरले आहेत. आम्हां सर्वांना आणि तुलासुद्धां बरोबर घेऊन ताईसाहेब त्या उद्यानांत आजच रहायला जाणार आहेत, याकरितां लवकर ये. मी जातें आतां.

**मद०:**—बरें. जा हो. मी बाबांची परवानगी घेऊन तुझ्या मागोमाग येतें. ( मदनिका जाते. ) आतां मात्र माझ्या आशेला अंकुर फुटला ! माझ्या सौंदर्याला भुलून तो राजकुमार प्रभावतीला सोडून माझ्याकडे वळतो कीं काय हें आतां पहायचें ! ( दागिन्यांकडे पाहून ) हे दरवडेखोराचे दागिने घेऊन आतां मला काय करायचे ? हे बहुमोल असले तरी जालंदरानें दिलेले असल्यामुळें मला कवडीमोलच वाटतात ! दऊं का हे टाकून ? (विचार करून) छे, नको पण ! या दागिन्यांचाही आतां मला मोठा उपयोग आहे. त्या कुमाराच्या डोळ्यांत नुसतं मदयंतीचें रूप उतरण्यापेक्षां शृंगारलेल्या मदयंतीचें रूप उतरणं अधिक चांगलें नव्हे का ? ( थांबून )

पण या शृंगारलेल्या मदयंतीलासुद्धां त्या कुमाराची प्राप्ति होणें शक्य आहे का ? हो ! त्यांत काय अशक्य आहे ? ही गोष्ट इतर कोणा स्त्रीला अशक्य वाटत असेल तर वाटो; पण मला मदयंतीला यांत कांहींच अशक्य वाटत नाहीं ! ! ! तर मग माझ्या मनांत असली अशक्यतेची भलतीच शंका कां येते ?

## पद.

राग—सारंग. ताल- दादरा.

**मानस कां हें । संशय मम जयिं घेई ।**
**अधीर कां होई । नेत्र माझा सुरा ॥**
**वीर विजयी खरा । तरुणां मारी लोळवि पायां ॥ध्रु०॥**
**भुलवूं कुमारा । संभ्रम मम सारा ।**
**मदन-लीला-प्रसारा । बरा हा । नेत्र माझा सुरा ॥८॥**

( जाते. )

---

अंक पहिला समाप्त.

# अंक २.

## प्रवेश १.

स्थळः—आमोदसुंदर उद्यान.

( प्रभावती आसनावर बसली आहे. तिच्या पाठीमागें दोन दासी उभ्या राहून चवऱ्या वारीत आहेत. आसनाच्या सर्वांत खालच्या पायरीवर मदयंती बसली आहे. बाकी सख्या उभ्या आहेत. कोणाच्या हातांत फुलांचे हार आहेत. कोणाच्या हातांत तांबूलकरंडक व पुष्पकरंडक आहेत. कोणाच्या हातांत शुकसारिकांचे पिंजरे आहेत. प्रतिहारी सोन्याची काठी घेऊन पुढें उभी आहे. व जालंदर दुरून हें सर्व पहात आहे, असा देखावा दृष्टीस पडतो. )

**जालं०**:—( स्वगत ) ती प्रभावती आणि तिच्या सख्या त्या महालांत बसलेल्या दृष्टीस पडतात. तिथे काय काय चाललें आहे हें या जाग्यावरून मला स्पष्ट दिसतें आहे. प्रभावतीजवळ मदयंती जाऊन राहिली आहे ती तिथे काय काय करीत असते हें मला पहायचें आहे. तर आतां स्वस्थपणानें या सुंदर कुमारिकांच्या काय काय लीला चालताहेत तें पाहूं या.

**प्रभा०**:—सख्यांनो, या कामदेवाच्या उत्सवापुरती पंधरा दिवस आपल्या इच्छेप्रमाणें इथे वागण्याची मोकळीक आपल्याला मिळालेली आहे. आतां काय काय करायचें त बोला पाहूं.

**सौदा०:**—या उत्सवांत दरवर्षास आपण जें करीत असतों तेंच यंदांही करायचें. देवासमोर नृत्यगायन करायचें. त्याची पूजा-अर्चा करायची.

**मंदा०:**—हंसायचें. खेळायचें. खिदळायचें !

**चंद्रि०:**—गोड गोड पक्वान्नें खायचीं आणि वाटेल तितकी झोंप काढायची !

**मद०:**—चांदण्यांतून हिंडायचें. गोष्टी सांगायच्या !

**मोहि०:**—झाडांना झोंपाळे बांधले आहेत त्यांवर बसून गाणीं म्हणायचीं !

**चप०:**—एकमेकींचीं सोंगें आणून एकमेकींना फसवायचें,हंसवायचें !

**प्रभा०:**—तुम्ही म्हणतां हें सारें करायचेंच; परंतु यंदां आणखी एक विशेष गोष्ट करायची आहे. चपले, एकमेकींचीं सोंगें आणून एकमेकींना फसवायचें, यांत काय आहे ? सोंग आणून परक्या माणसाला फसवलें तर अधिक मौज ! असें नव्हे का ?

**मदयंता:**—परक्या माणसाला असें फसवायचें धाडस कोणाच्या हातून होणार बाई !

**प्रभा०:**—त्यांत काय आहे ? तसें सोंग खुद्द मी घेऊन कुमार माधवांना फसवणार आहें. हें मौजेचें साहस करण्यांत माझा हेतु एवढाच आहे कीं, या कुमाराच्या मनाची मला परीक्षा करतां यावी. रूपगुणसंपन्न व स्वतःला योग्य अशीच वधू आपण प्रत्यक्ष पाहून पसंत करणार, ती राजकुलांतली नसली तरी चालेल, असें हा कुमार म्हणत असल्याचें मीं ऐकलें आहे. आणि म्हणूनच हा बोलल्याप्रमाणें खरोखरच वागणारा आहे, कीं इतर राजे लोकांच्या रूढाप्रमाणें केवळ राजकन्येच्या नांवाला व ऐश्वर्यालाच मान देणारा आहे, हें मला पहायचें आहे.

**चप०:**–पण ताईसाहेब, त्या कुमाराची ही तसबीर आपल्याला आवडली आहे हें खरें ना ? मग त्याच्याशीं कपट करण्याचा हा विचार आपल्या मनांत कां आला आहे ? तसबिरींतल्या मुद्रेवरून याच्या मनाची नाहीं का आपल्याला परीक्षा होत ?

**प्रभा०:**–( तसबिरीकडे पाहून ) चपले, या कुमाराचा चेहरा प्रशांत आणि गंभीर दिसतो खरा, पण एवढ्यावरूनच याच्या मनाचा अंत मला कसा लागेल ? यासाठीं मदयंती, या कुमाराचें हें चित्र पाहिल्यापासून याच्याशीं वंचना करून याचें हृद्गत काढून घ्यावें अशी मला बुद्धि झाली आहे. असा कांहीं तरी लपंडाव केल्याखेरीज आपल्या प्रियकराचें मन ओळखण्याइतका धूर्तपणा ज्या स्त्रीला देवानें दिला असेल ती स्त्री धन्य होय !

राग—बागेश्री. ताल–झंपा.

**धन्य नारी खरी । जरि दयित–मुखकमल ।**
**निरखुनि झणी जाणि । तन्मन सुचरित–मति ॥ ध्रु० ॥**
**गंभीर आकार । रमणीय वाणी । झांकी हृदय–भाव ।**
**पुरुष–चरित–परिणति अति गहन कुटिल–गति ॥ ९ ॥**

याकरितां सख्यांनो, कुमार माधवांना फसवण्याच्या हेतूनें आजपासून पंधरा दिवस माझें राजकन्येचें पद व प्रभावती हें नांव मी माझ्या प्रियसखीला–या मदयंतीला–देत आहें, आणि तिचें मदयंती हें नांव आणि जागा मीं घेतली आहे. राजपुत्राची जेव्हां जेव्हां गांठ पडेल तेव्हां तेव्हां याप्रमाणें सर्वांनीं अगदीं न चुकतां वागायचें. ही गोष्ट आपल्यांतच आहे, तेव्हां बाहेर फुटणार नाहींच; व कोणीं फोडूं नये अशी माझी सक्त ताकीद आहे. याच वेळीं ही योजना करण्याचें कारण असें आहे कीं, कुमार माधव माझ्या भेटीकरितां इथे आतांच येणार आहेत. याकरितां मदनिके, तूं कुमारांना

सामोरी जाऊन त्यांना इथे घेऊन ये. तोंपर्यंत आम्ही मदयंतीच्या सोंगाची तयारी करतों. ( मदनिका जाते. ) मदयंती, तूं आणि मी रूपानें आणि अंगबांध्यानें अगदीं एकसारख्या आहों. माझें सोंग कुणाला द्यायचेंच तर तें तुलाच दिलें पाहिजे. आणि तूंही मला मदत करायचें कबूल केलें आहेस, त्याअर्थीं तूं आतां नाहीं म्हणशील तर मी ऐकणार नाहीं.

**मद०:**–( स्वगत ) आयतें सारें माझ्या मनाजोगेंच होतें आहे, तर मी कशाला नाहीं म्हणतें आहें म्हणा ! पण आढेवेढे घेतले नाहींत तर इच्या मनांत काळेंबेरें यायचें ! ( उघड ) हें काय बरें ताईसाहेब भलतेंच करायला सांगतां ! धर्मनिधींना हें कळलें तर काय गत होईल ? वडिलांना हें समजलें तर ते काय म्हणतील बरें ?

**प्रभा०:**–अग, ही आपआपल्यांत ठरलेली गुप्त मसलत कामदेवाचा उत्सव संपेपर्यंत उद्यानांतल्या उद्यानांतच चालायची. ही कशाला बाहेर फुटते आहे ?

**मद०:**–पण तो लग्नाकरितां इथे आलेला कुमार मला कांहींच्या-बाहींच विचारूं लागला तर काय करूं ?

**प्रभा०:**–तूं मुखदुर्बळाप्रमाणें स्वस्थ रहात जा. आणि फारच निकरावर काम आलें तर कांहीं तरी गुळमुळीत धरसोडीचीं उत्तरें देऊन वेळ मारून नेत जा, म्हणजे झालें ! त्याशीं आदरानें आणि गोडपणानें वागायला मात्र कधींही चुकूं नकोस. तूं राजकन्या मुख-दुर्बळ असायचीस, आणि मी तुझी सखी त्या कुमाराला प्रीतीनें माझ्याकडे ओढायचा उद्योग करायची ! आणि मग तो मुखदुर्बळ राजकन्येकडे वळतो कीं प्रीति करणाऱ्या गरीब सखीकडे वळतो हें पहायचें, याप्रमाणें मीं ठरवून टाकलें आहे.

**मद०:**–छे, पण बाई ! आपलें सोंग घेणें मला कसेंसेंच वाटतें ! नको हें मला !

**प्रभा०:**—तें कांहीं आतां चालायचें नाहीं. ठरलें तें ठरलें. ( सख्यांस ) घाला ग माझ्या अंगावरचे दागिने आणि मुकुट हिला! ( सख्या मदयंतीच्या अंगावर दागिने व मुकुट घालूं लागतात. )

**जाल०:**—( आश्चर्यानें स्वगत ) अरेच्या! हें मी काय पाहतों आहें! स्वतः राजकन्या प्रभावती आपल्या अंगावरचे दागिने व मुकुट मदयंतीला घालून तिलाच राजकन्या बनवते आहे! ( विचार करून ) हां. आलें आतां सारें ध्यानांत! कुमार माधवाला फसवण्याकरितां प्रभावतीनें ही कपटलीला आरंभली आहे. आपण झाली आहे मदयंती, आणि माझ्या मदयंतीला केलें आहे प्रभावती! पण या लीलेचा परिणाम मात्र मला सुधा दिसत नाहीं! मदयंती चंचल मनाची आहे. ती माधवाला मोहांत घालूं लागेल; आणि तें मला खपायचें नाहीं; त्यामुळें हा निरपराधी राजपुत्र प्राणाला मुकणार, हाच या खेळाचा शेवट मला दिसतो आहे! आतां मला मदयंतीवर सारखी पाळत ठेवली पाहिजे.

**प्रभा०:**—( मदयंतीला ) वा! आतां तूं राज्यकन्या नाहींस असें कोण म्हणेल? अग, आतां तूं इथे नाहीं उभी रहायचीस! माझ्या आसनावर तुला बसलें पाहिजे.

**मद०:**—हें काय ताईसाहेब! मीं नाहीं बसायची जा! ( सर्व हंसतात व तिला धरून राजकन्येच्या आसनावर बसवितात. दासी तिच्यावर चवऱ्या ढाळूं लागतात, व सख्या तिच्याभोंवतीं आपापल्या कामावर उभ्या रहातात. प्रभावती हातांत पंखा घेऊन मदयंतीच्या शेजारीं उभी राहते. )

**प्रभा०:**—जशी काय तूं खरोखरीचीच प्रभावती आहेस असें समजून राजकन्येच्या डौलानें वागत जा. माझीं सर्व राजचिन्हें तुझ्या हवालीं केलींच आहेत. हें कलमदान आणि ही माझी मुद्रा



**प्रभावती**—घालाग माझ्या अंगावरचे दागिने आणि मुकुट हिला ! ( पृ० २४ )

तुझ्याजवळच राहूं दे. राजपुत्र येथें असतां तूं त्याच्या समक्ष या मुद्रेचा उपयोग करीत जा, म्हणजे त्याला तुझें सोंग खरें वाटायला आणखी कारण होईल.

**मद०:**—ताईसाहेब !

**प्रभा०:**—हां ! आतां कुठल्या ताईसाहेब ? माझ्या नव्या नांवानें मला हांक मार.

**मद०:**—बरें. मदयंती, तुझ्या सांगण्याप्रमाणें मीं या आसनावर बसलें आहें खरी, पण आतां कुमार माधव इथे आले म्हणजे मी त्यांच्याशीं काय बोलायचें हें कांहीं मला सुचत नाहीं.

**प्रभा०:**—ताईसाहेब, देवानें हवापाणी कशाला उत्पन्न केलें आहे ?

**मद०:**—हें काय ? ही सारी सृष्टि जगली पाहिजे म्हणून देवानें हवापाणी उत्पन्न केलें आहे.

**प्रभा०:**—होय. पण हवापाण्याचा दुसरा एक मोठा उपयोग आपल्याला नेहमीं होत असतो तो नाहीं का माहीत ?

**मद०:**—तो कोणता उपयोग ?

**प्रभा०:**—बोलायला कांहीं सुचत नाहीं आणि बोललें तर पाहिजे, असें असलें म्हणजे हवा आणि पाणी या विषयांवर हवें तितकें बोलावें. हवा चांगली आहे, वाईट आहे, रोगी आहे, निरोगी आहे, थंड आहे, गरम आहे, पाणी पाचक आहे, जड आहे, त्याच्या योगानें हिंवताप येतात, क्षयरोग जातात, असें एकना दोन ! हवें तितकें बोलतां येईल.

**मद०:**—बरें आहे. आज हवा आणि पाणी यांतलेंच कांहीं तरी बोलायचें म्हणतेस तर तसेंच बोलेन. ( पडद्यांत—"इकडून इकडून यावें कुमार !" असा शब्द होतो.)

**प्रभा०:**—हा मदनिकेचा शब्द ! ( पाहून ) हे कुमार माधवजी आलेच. अहाहा ! तसबिरींत पाहिल्यापेक्षां यांचें रूप किती रमणीय दिसतें ! यांना पाहतांच माझ्या जिवाची लुटपुट होऊन गेली ! आतां या खांबाआड दडून यांची आणि मदयंतीची दृष्टादृष्ट झाल्याबरोबर यांची मुद्रा कशी काय होते हें पाहिलें पाहिजे.

( खांबाआड दडते. )

**मदनिका:**—( मदयंतीजवळ येऊन ) ताईसाहेब, हे कुमार आले पहा.

( कुमार माधव व कंकराव येतात. )

**मद०:**—( आसनावरून उठून रिकाम्या आसनाकडे हात दाखवून ) यावें कुमार, या आसनावर बसावें.

**जालं०:**—( स्वगत ) हा राजपुत्र आलेला दिसतो. आतांच काय ती मदयंतीची परीक्षा आहे !

**माध०:**—( कंकास हळूच ) काय ! हीच युगंधर राजाची कन्या ?

**कंक०:**—( कुमारास हळूच ) दुसरी कोण असणार !

**माध०:**—राजकन्ये, तूं उठण्याचे श्रम कशाला घेतलेस ? हा मी बसतों. तूंही बैस. ( आसनावर बसतो. मदयंती मोहित होऊन देहभान विसरते. )

**मदनि०:**—( मदयंतीला ) आतां आपण बसायला हरकत नाहीं.

( मदयंती बसते. )

**माध०:**—( कंकास हळूच ) ही युगंधर राजाची कन्या वेडसर आहे वाटतें ! किती वेळ तरी उगीच उभी होती. आणि कशी चमत्कारिक नजरेनें माझ्याकडे बघते आहे पहा !

**कंक०:**–अहो, हा भेटीचा पहिलाच प्रसंग असल्यामुळें प्रथम थोडीशी बावरली असेल. थोडा दम धरा. म्हणजे बघाल कशी चुरूचुरू बोलूं लागेल ती !

**प्रभा०:**–( स्वगत ) कुमारांची मुद्रा मदयंतीला पाहून प्रसन्न झालेली कांहीं दिसत नाहीं.

**मद०:**–कुमार, कुशल आहेना ?

**माध०:**–होय. कुशल आहे.

**मद०:**–आपल्या राहण्याची सर्व व्यवस्था आपल्या इच्छेप्रमाणें झाली आहेना ?

**माध०:**–युगंधरमहाराजांच्या अगत्यामुळें सर्व यथास्थित आहे.

**कंक०:**–ताईसाहेब, काय हें आपलें लावण्य ! आणि काय हें तेज ! माझे तर डोळे दिपून गेले ! ( सख्यांकडे पाहून ) किती झालें तरी राजतेज तें ! तें कुठे लपणार आहे कीं काय ? त्याची गोष्टच वेगळी ! अहाहा ! राजकुलांतलि व्यक्तींच्याठायीं देवतांचें वास्तव्य असतें असें म्हणतात, तें आज या ताईसाहेबांना पाहून माझ्या प्रत्ययाला आलें.

( सख्या व दासी गालांतल्या गालांत हंसतात. )

**माध०:**–( स्वगत ) या सर्व जणी कंकाची फाजील स्तुति ऐकून हंसताहेत, पण हें कुठे याच्या लक्षांत येतें आहे ?

**प्रभा०:**–( स्वगत ) आतां मी कुमारांच्या दृष्टीस पडून त्यांच्या मुद्रेंत कांहीं प्रसन्नता दिसते कीं नाहीं हें पाहतें.

( खांबाआडून दूर होते. )

**माध०:**–(आश्चर्यानें व आनंदानें स्वगत) एवढा वेळ खांबाआड दडून राहून आतांच चमकूं लागणारी ही तेजस्वी कुमारी कोण

बरें असावी ? हां. मीं उज्जनीस जिची तसबीर पाहिली ती मुलगी हीच !

**प्रभा०:**—( आनंदानें स्वगत ) समजलें यांचें इंगित ! मी समोर असलेली यांना आवडतें आहें खास !

**मद०:**—कुमार, या ठिकाणची हवा आपल्याला कशी काय वाटते ?

**कंक०:**—( माधवास ) कां ? ताईसाहेबांनीं कसा खुबीदार प्रश्न विचारला आहे ! याला म्हणतात चातुर्य !

**माध०:**— मी नुकता कालच आलों आहें. इतक्यांतच काय सांगूं ?

**कंक०:**—ताईसाहेब, हवा ती कसली असायची ? ती इथून तिथून एकच ! पण या स्थळाला जी रमणीयता आली आहे ती देवकन्येलासुद्धां लाजवणाऱ्या आपल्या सौंदर्यामुळें आलेली आहे.

**चप०:**—( स्वगत ) कसा मेला लुब्रेपणानें बोलतो आहे पहा !

**मद०:**—( कंकाकडे प्रसन्न मुद्रेनें पाहून माधवास ) आपण बरेच देश पाहिले असतील ?

**माध०:**—होय. मीं पुष्कळ देशांतून प्रवास केला आहे.

**मद०:**—( मदनिकेच्या कानांत ) अग, बोलायचें सगळेंच काम माझ्यावर टाकतां हें ग काय तुमचें ? एखादा दुसरा शब्द ताईसाहेब मधून मधून बोलल्या तर नाहीं का चालणार ? तितकी मला मदत होते.

**मदनि०:**—( प्रभावतीकडे पाहून हंसत हंसत मदयंतीच्या कानांत ) चंद्राकडे चकोरीनें टक लावावी त्याप्रमाणें कुमाराच्या मुखाकडे पाहण्यांत ताईसाहेब तल्लीन होऊन गेल्या आहेत. त्या कसली तुला मदत करणार !

**मद०:**—( मत्सरानें स्वगत ) अस्सें अस्सें ! राजकन्येच्या जागीं मी बसलें आहे ती उगीच नाहीं आहें बसलें ! कुमाराला वश करून घेण्याकरितां माझ्याप्रमाणें प्रभावतीसुद्धां उद्योग करणारच, पण आज तरी मी तिची मात्रा नाहींच चालूं द्यायची ! ( उघड ) मदयंती !

**प्रभा०:**—जी ताईसाहेब !

**मद०:**—आज कामदेवाची पूजा या सर्व सख्यांना घेऊन तूंच कर जा. या सगळ्या जणी तुझी पूजासामग्री जुळवून देतील. ( सख्यांस ) तुम्हांलाही पूजा करायची आहे. जा मदयंतीला घेऊन. ( चवऱ्या वारणाऱ्या दासींस व प्रतिहारीस ) जा, तुह्मीसुद्धां जा !

( सख्या व दासी जातात. )

**प्रभा०:**—( जातां जातां स्वगत ) अग कारटे ! कांहीं तरी निमित्त काढून मला घालवून दिलेंस काय ? तुझ्या मनांत काय आलें आहे कुणाला ठाऊक ! ( चरफडत निघून जाते. )

**माध०:**—( निराशेनें स्वगत ) जिचा मुखचंद्र पाहून मला आल्हाद वाटत होता ती तर येथून निघून गेली ! आतां कशाला इथे बसायचें ? ( प्रभावती दिसेनाशी होईपर्यंत तिच्या मार्गाकडे टक लावून पाहतो. )

**जालं०:**—( स्वगत आश्चर्यानें ) हा काय चमत्कार आहे ? मदयंतीनें महालांतून सर्वच स्त्रीजातीला, हद्दपार केलें ! कुमाराशीं कांहीं तरी फाजील सलगीचें वर्तन सख्यांना न कळत इच्या मनां-तून करायचें आहे असें वाटतें.

**कंक०:**—( किंचित् रागानें माधवाच्या कानांत ) कुमार, तुम्ही आहां कुठे आणि पाहतां कुणीकडे ? जिच्या भेटीला आलांत ती राजकन्या तुमच्यासमोर बसली आहे. ती मनांत तुम्हांला हंसत असेल ना !

माध०:—राजकन्ये, आतां इथे बसून मी तुला अधिक तसदी देत नाहीं. ( उठूं लागतो. )

मद०:—छे छे ! आपल्या सहवासापासून मला कांहींच तसदी होत नसून उलटा फार आनंद होतो आहे आपण इतक्यांतच जाण्याचें करूं नये. आणखी थोडा वेळ माझेजवळ बसावें.

## पद.

राग—खमाज. ताल—दादरा.

**आशि कां त्वरा । मनोहरा ! । प्रेमभरें डोला ॥**
**अवगणुनि मला जातां ॥**
**प्रणय—विमुख कां होतां ॥ ध्रु० ॥**
**प्रार्थना राज—दुहिता करितसे ॥**
**माना तिला दया सदया करा प्रेमभरें बोला ॥ १० ॥**

कंक०:—कुमार, आपण आणि ताईसाहेब एकत्र बसलेलीं पाहिलीं म्हणजे वसंत आणि वनश्री यांचाच समागम झाल्यासारखें वाटतें. त्या आग्रहानें सांगताहेत त्याअर्थीं त्यांचा शब्द तर मोडायचा नाहीं. बसा आणखी अंमळ.

माध०:—( उठून ) छे छे ! मीं आतां निरोप घेणारच.

मद०:—नाहींना बसायचें होत ? बरें ! आपली तशीच मर्जी असल्यावर मग काय करायचें ? हा एवढा फुलांचा पोषाख अंगावर घालतें तोंपर्यंत तरी थांबावयाचें होतें.

माध०:—राजकन्ये, हा प्रयास तूं करण्याचें कारण नाहीं. कंकराव, घाला तो पोषाख माझ्या अंगावर.

कंक०:—ह्या: ! ह्या: ! मी कशाला ? माझे म्हाताऱ्याचे हात बाभळीच्या लांकडासारखे कणखर ! फुलांचें काम फार नाजूक ! तें राजकन्येच्या नाजूक हातांनींच व्हायला पाहिजे.



मदयंती—हा तीर कुणी कशाकरतां मारला हा कांहीं तर्क होत नाहीं.        ( पृ० ३१ )

**माध०:**–( किंचित् रागानें कंकास हळूच ) पण ह्या अतिप्रसंग मला खपत नाहीं.

**कंक०:**–( हळूच ) खपत नसला तरी करणार काय? उज्जनीहून इतक्या लांब आलांत कशाला? ( मदयंतीस त्वरा करण्याविषयीं खूण करितो. ती फुलांचा तुरा माधवाच्या मंदिलांत खोवते, व पुष्पकरंडकांतून हार काढूं लागते. )

**जालं०:**–( स्वगत. रागानें दांत ओठ चावून ) हा दुष्टे! माझ्या देखत परपुरुषाच्या गळ्यांत माळ घालतेस हें मी कसें सहन करीन? ( तीर मारून पुष्पकरंडक खालीं पाडतो. )

**कंक०:**–( घाबरून ) मेलों! मेलों! माझ्या छातींत तीर घुसला! ( उताणा पडतो. )

**माध०:**–कुठे? कुठे? ( मदयंती घाबरून लटलट कांपूं लागते. )

**कंक०:**–( काकुळतीच्या स्वरानें ) कुमार, कुठे कुठे म्हणून काय हो विचारतां? तीर माझ्या छातींतून आरपार निघून गेला! आतां मी कसचा जगतों!

**माध०:**–( नीट न्याहाळून )अहो, तुम्हांला कांहीं झालें नाहीं. उगीच कां मेलों मेलों म्हणून ओरडतां? ( त्याला उठवून उभा करितो. )

**कंक०:**–मी मेलों नसलों तरी मरणाच्या मार्गाला लागलों आहें एवढें खचित आहे! आतां इथून लवकर चला, नाहींतर दुसरा तीर येईल!

**मद०:**–कुमार! माझी तर कंबर खचून गेली! हा तीर कुणी कशाकरितां मारला हा कांहीं तर्क होत नाहीं.

**माध०:**—राजकन्ये, भिऊं नकोस. कोणातरी मूर्ख शिकाऱ्याच्या हातून हें तीर मारण्याचें काम नकळत झालेलें आहे. मी माणसें पाठवून चवकशी करवतों. ( कंकासह जातो. )

**मद०:**—असा बिनचूक तीर मारणारा या राज्यांत एकच माणूस आहे. आणि तोही एकेकाळीं माझ्या अतिशय प्रेमाला पात्र झालेला जालंदर धनुर्धर हाच होय ! ( अंगावर शहारे आणून ) अगबाई ! काय भयंकर तिरंदाजी ही ! ज्याला असा बिनचूक तीर मारून पुष्पकरंडकाचा वेध घेतां आला, त्याला माझा जीव घेणें काय कठिण होतें ? पण त्यानें तसें केलें नाहीं यावरून त्याचें माझ्यावर अजून सुद्धां अतिशय प्रेम आहे. हें सिद्ध होतें. पण त्या प्रेमाचा मोबदला द्यायला माझें त्याच्यावर आतां प्रेम राहिलें आहे कुठे ? त्या प्रेमाऐवजीं त्याच्याविषयीं माझ्या मनांत इतका द्वेष भरला आहे कीं, त्याचें स्मरण झालें म्हणजे ओकारीच येते ! इश्श ! या सुकुमार राजकुमाराला सोडून त्या दरवडेखोराची बायको होण्यासाठीं कांहीं मदयंती जन्माला आलेली नाहीं ! ! !

## पद.

राग—सोहनी. ताल—त्रिवट.

**पति मला उचित सुत राजाचा ॥**
**विभव—मान तो त्याचा ॥ ध्रु० ॥**
**कुल उणें पथ मलिन खलाचा ॥**
**कर मम लाभे तो कैंचा ॥ १ ॥**
**प्रसर मानसिं कलहंसाचा ॥**
**बक अधिकारी नच त्याचा ॥ ११ ॥**

---

# प्रवेश २.

स्थळ—शर्मविलास मंदिर.

( माधव व कंक बोलत बसले आहेत. )

**माध०:**—कंकराव, ज्यांना युगंधर महाराज म्हणतात ते इथले राजे—

**कंक०:**—मोठे धार्मिक ! मोठे न्यायी ! मोठे दयाळु ! मोठे भाग्यवान् !

**माध०:**—नाहीं म्हटलें, युगंधर—

**कंक०:**—उदार ! सत्यवचनी ! शूर ! बुद्धिमान् !

**माध०:**—अहो ते युगंधर—

**कंक०:**—पुण्यवान्, क्षमावान्, तेजस्वी, परमपूज्य, राजे आहेत !

**माध०:**—( त्रासून ) ते तुमचे युगंधर महाराज मोठे संभावित सोदे आहेत, संभावित सोदे !

**कंक०:**—( आश्चर्यानें ) काय ! काय म्हणतां हें ? कुमार, तुम्ही शुद्धीवर आहांना ?

**माध०:**—या युगंधरानें तसबीर काढून पाठवली प्रभावतीच्या सखीची म्हणजे मदयंतीची; आणि लग्नाला पुढें उभी करतो आहे प्रभावती ! ही सोदेगिरी नव्हे तर काय ? अशी लबाडी यानें कां करावी ? नवरी असायची एक आणि तसबीर असायची दुसरीचीच, अशा लबाड्या होत असतात असें मीं ऐकलें होतें. इथून उज्जनीस गेलेली तसबीर पाहिल्याबरोबर ती माझ्या मनांत भरली. पण मला

शंका आली कीं, जिचें लग्न व्हावयाचें तिचीच ही तसबीर कशावरून? म्हणून म्हटलें, मुलगी समक्ष पाहून खात्री करून घेतलेली बरी! त्यासाठीं मी उज्जनीहून इथे आलों, आणि काल पाहिलें तों मला संशय आला होता तोच खरा ठरला!

**कंक०:**—इथून गेलेली तसबीर मदयंतीचीच होती, आणि प्रभावतीची नव्हती, हें तुम्ही कशावरून म्हणतां हो? दोघींचें रूप अगदीं एकसारखें आहे.

**माध०:**—त्या दोघींच्या रूपांत साम्य आहे असें वरवर पहाणाऱ्याला भासतें खरें, पण बारीक नजरेनें निरखून पहाणाऱ्याला दोघींच्या रूपांतला फरक तत्काल दिसून येतो. राजकन्येपेक्षां मदयंती निःसंशय अधिक सुंदर आहे. शिवाय राजकन्येची मुद्रा धीट, कपटी व उग्र आहे. मदयंतीची नम्र, सौम्य, प्रेमळ आणि निष्कपटी दिसते. शिवाय काल मीं राजकन्या पाहिली ती मदयंतीपेक्षां वर्ष सहा महिन्यांनीं तरी मोठी दिसते. राजकन्येची तसबीर म्हणून ज्यानें मदयंतीची तसबीर काढून आम्हांकडे उज्जनीस पाठवली तो गृहस्थ लबाड आहे असें ह्मणायला कोणाचें भय आहे?

**कंक०:**—कुमार, असलें कांहीं मनांत आणूं नका. तसबीर पाठवण्यांत जर कांहीं गडबडगुंडा झाला असेल तर तो चुकीमुळें झालेला आहे असेंच समजलें पाहिजे.

**माध०:**—तें कांहीं नाहीं. युगंधरानें माझ्याशीं लबाडी केली आहे. याकरितां मीही पण त्याची चांगली खोडच मोडणार आहें! जिची तसबीर मीं उज्जनीस पाहिली, ती मदयंती काल राजकन्येजवळ उभीच होती. ती मुलगी मला फारच आवडली आणि मीं तेव्हांच निश्चय केला कीं, लग्न करायचें तें इच्याशींच करायचें! ती गरीब कुळांतली असली तरी मला पतकरली!

**कंकः०:**—( रागानें ) हें काय हो तुमचें नास्तिकपणाचें बोलणें! राजकुलांत जन्म घेतलेल्या पुरुषानें कधीं गरीबाची मुलगी आपली स्त्री करून घेतली आहे असें कोणी ऐकलेलें सुद्धां नाहीं. त्यांतून तुम्हीं त्या मदयंतीची इतकी तारीफ करतां, तर प्रभावती तरी काय वाईट आहे हो? तिच्यांत कोणता दोष तुम्हांला दिसला? मला तर असें वाटतें कीं, विधात्यानें जर तुम्हांकरितां पत्नी निर्माण केली असेल तर ती या जगांत राजकन्या प्रभावती एवढी एकच आहे! तिचें रूप किती मोहक! भाषण किती मधुर! वागणूक किती भारदस्त! किती तिचें वर्णन करूं! मदयंती ही तिच्या रूपापुढें अगदीं तुच्छ आहे! अहो, किती झालें तरी राजकन्या ती राजकन्या आणि सखी ती सखी! एकीची सर दुसरीला कशी येणार?

**माध०:**—हें मात्र खरें म्हणालांत! त्या सखीची सर एवढी राजकन्या होऊनसुद्धां प्रभावतीला कधींच यायची नाहीं! घटकाभर सुद्धां मी प्रभावतीजवळ नव्हतों, पण तितक्या वेळांत सुद्धां तिनें डोळे काय मोडले, माना काय हलवल्या, आणि हंसली काय, आणि बोलत होती कशी! मीं मनांत म्हटलें कीं ही काय राजकन्या आहे कीं राजकन्येचें सोंग आहे! कालचा तिचा फाजीलपणा पाहून मला तर तिचा फार तिटकारा आला. फुलांचा पोषाख तिनें स्वतः उठून घालायचें कांहींच कारण नव्हतें! आणि तुम्ही तिला उत्तेजनच देत होतां! मोठें आश्चर्य आहे!

**कंक०:**—नशीब माझें! तुमच्या लग्नाच्या कामांत द्रव्य मिळवायचें जर माझ्या कपाळींच नसलें तर तुम्हांला तरी कुठून चांगली बुद्धि होणार?

**माध०:**—तुम्ही कांहीं म्हणा, पण त्या राजकन्येची सखी मदयंती काल मीं पाहिल्यापासून तिची मूर्ति कांहीं माझ्या डोळ्या-

समोरून हालत नाहीं. कंकराव, काल राजकन्येच्या दरबारांत जेव्हां ती अकस्मात् चमकूं लागली, त्या वेळची तिची शोभा किती वर्णन करूं !

## पद.

राग—सिंदोरा. ताल—दीपचंदी.

कल्याणी नव–बाला प्रकटली ॥
कांति–बळें दिपवी नयनातें ॥ ध्रु० ॥
नसतां दुर्दिन गगनांत सहसा ॥
चमकलिं चपल जणों कीं बिजली ॥
कांति–बळें दिपवी नयनातें ॥ १२ ॥

**कंक०:**—( रागानें ) कुमार, तुम्हांला निक्षून सांगतों, कीं प्रभावती राजकन्येशीं तुमचें लग्न जुळवण्याकरितां तुमच्या आईसाहेबांनीं मला पाठवलें आहे. प्रभावतीला सोडून जर तुम्ही तिच्या सख्यांना आणि दासींना धुंडाळायला लागलांत, तर आपण कांहीं तें साफ चालूं देणार नाहीं !

**माध०:**—( न ऐकिल्यासारखें करून ) मदयंतीला वारंवार पहाण्याची मला किती उत्कंठा झाली आहे म्हणून सांगूं !

**कंक०:**—झाली असेल उत्कंठा ! पण ती मुलगी एकदांसुद्धां तुमच्या दृष्टीस पडूं नये असा राजकन्येला सांगून मी बंदोबस्तच करवतों—( प्रभावती व चपला यांस येतांना पाहून ) पण कसचा बंदोबस्त करवतों आणि कसचें काय ! ही पहा ती चेटकीण मदयंती दुसऱ्या एका पोरीला बरोबर घेऊन इकडेच आली !

**माध०:**—तर मग माझ्या सुखाचा पुन्हा अभ्युदय झाला म्हणायचा !

( प्रभावती व चपला येतात. )

**कंक०:**–( घाईघाईनें प्रभावतीस ) मदयंती, आतां कशाला इथे आलीस ! कुमार या वेळीं कामांत आहेत आणि तवकांत हीं इतकीं फुलें कशाला आणलीं आहेस ? तुला काय बोलायचें असेल तें माझ्यापाशीं बोल आणि लवकर इथून निघून जा.

**चप०:**–( प्रभावतीस ) कोण मेल्याचा त्रास आहे हा !

**माध०:**–कंकराव ! काय हा असभ्यपणा ! त्या मुलींना अशा बिचकावूं नका. मला त्यांचें काय म्हणणें असेल तें समक्ष ऐकायचें आहे.

**प्रभा०:**–( चपलेस हळूच ) कुमारांच्या सांनिध्यानें मला फारच आनंद होतो, पण यांच्याशीं बोलायला फारच बाई लाज वाटते आणि भयही वाटतें !

**चप०:**–( प्रभावतीस हळूच ) ताईसाहेब, तुमचें मन कांहीं थाऱ्यावर दिसत नाहीं. तर आतां तुमच्यासाठीं मीच प्रस्तावना करून देतें. ( माधवास ) कुमार, ताईसाहेबांच्या मनांतून काल तुम्हांला फुलांचा पोषाख घालायचा होता, तें तसेंच राहिलें. याकरितां आज तो पोषाख त्यांनीं मदयंतीबरोबर पाठवला आहे. आणि तो स्वतः तुमच्या अंगावर घालण्याविषयीं त्यांनीं हिला सांगितलें आहे.

**कंक०:**–तर मग मदयंती, दे तो पोषाख माझ्या हातांत ! मीच तो कुमारांना घालतों.

**माध०:**–छे ! छे ! राजकन्येचें जसें तिला सांगणें असेल तसेंच तिनें केलें पाहिजे.

**कंक०:**–तसें होणार असेल तर आपण कांहीं इथे राहणार नाहीं. एक तर, हा अयोग्य प्रकार माझ्यानें पहावत नाहीं. दुसरी गोष्ट, मदयंती पोषाख घालूं लागली म्हणजे कालच्यासारखा कुठून

एखादा तीर बीर आला तर माझा प्राणच जायचा ! याकरितां मी इथून निघून जातों कसा ! [ जातो. ]

**चप०:**–( आश्चर्यानें ) अगबाई ! कंकराव रागावून इथून निघूनच गेले कीं, ! मीं त्यांची समजूत करून त्यांना घेऊन येतें. ( जाऊं लागते. )

**प्रभा०:**–अग थांब. मला एकटीला टाकून कुठे जातेस ?

**चप०:**–( हंसून ) तूं एकटी असतीस तर तुला मी कधीं तरी टाकून गेलें असतें का ? ( जाते )

**माध०:**–मदयंती, तुला संकट वाटत असेल तर मी तुला मदत करीन. पण तुझ्या हाताचा स्पर्श होऊन एकदां मला धन्य होऊं दे ! ( प्रभावती हारतुरे वगैरे फुलांचा पोषाख घालते. )

**प्रभा०:**–( स्वगत ) एकदांचें उरकलें काम ! आतां इथून लवकर जावें म्हणतें, पण पाय कांहीं हालत नाहींत. आणि कुमारांच्या चेहऱ्यावरून दृष्टि ढळत नाहीं. काय करावें ! छे ! आतां मनाचा निग्रह केलाच पाहिजे. ( उघड ) चपले–

**माध०:**–थांब. थांब. थोडी थांब. डोळे भरून तुझें रूप पहावें म्हणून उत्कंठा होते, आणि तुझ्याकडे जों जों पहावें तों तों ती उत्कंठा कमी न होतां उलट वाढतच जाते ! सखे, उभी राहण्याचे श्रम कां करितेस ? बैस. चार शब्द माझ्याशीं बोलून माझे कांन तृप्त कर.

**प्रभा०:**–कुमार, मीं काय बोलावें ?

## पद.

**राग**–बिहाग. ताल–केरवा.

**विसरुनि विनया बोलों कैसी ॥**
**टाकुनि रीती सोडुनि नीती ॥ ध्रु० ॥**



**माधव**—तुझ्या हाताचा स्पर्श होऊन एकदां मला धन्य होऊं दे !

( पृ० ३८ )

जवळि बसावें मज ना वदावें ॥
त्यजुनि जन-भया वागूं कैसी ॥ १३ ॥

कुमार, आपणासमोर आसनावर बसावें ही योग्यता राजकन्येची आहे. माझ्यासारख्या सामान्य स्त्रीची कोठून असणार ?

**माध०:**- छे ! छे ! माझ्या दृष्टीनें तर तूं या लोकीं असामान्य स्त्री आहेस. राजकन्येची तर गोष्ट राहोच, पण पृथ्वींतल्या कोणाही स्त्रीला तुझी बरोबरी करतांच यायची नाहीं. तुझ्यासारखी स्त्री तूं एकच आहेस !

## पद.

**राग**-सोहा कानडा. ताल-एक्का.

स्वर्गाधिक-भूमि-रचन-चिंतनिं जणु धाता ॥
होय अतुल यत्न करुनि मूर्ति तुझी करिता ॥ ध्रु० ॥
चंद्र-किरण अमृत-फेन ॥
पारिजात-कुसुम-गंध ॥
सुर-नारी-नव-विलास ॥
घे विधि तुज घडितां ॥ १ ॥
धर्म-दयौदार्य-विनय ॥
त्रिभुवन गत सुगुण-निचय ॥
विणुनि रची हृदय सदय ॥
निरुपम तूं वनिता ॥ १४ ॥

**प्रभा०:**-कुमार, अशा अमृतासारख्या गोड भाषणांनीं नका मला मोहांत गुंतवूं !

## पद.

**राग**-पिलू. ताल-केरवा.

कपट न जाणें भाव कैसा ॥ कळेना तव ॥ ध्रु० ॥
आशा-पाशीं मातें गोंवी । कां हे ऐशी लीला ॥
शुभशीला । कळेना तव ॥ १ ॥

सरळ भली मी अधन कुमारी ॥
कां ये माझ्या कानीं । प्रियवाणी । कळेना तव ॥ १५ ॥

मला आतां इथून गेलेंच पाहिजे. चपले, ये कीं ग लौकर ! मी निघालें !

( चपला येते. )

**चप०:**—ही मी आलेंच. चल जाऊं. ( कुमाराकडे पाहून स्वगत ) ज्यासाठीं आलों तें काम झालेलें दिसतेंच आहे ! ( उघड ) कुमार, आम्ही येतों आतां. ( जातात. )

**माध०:**—मीही तुम्हांला पोंचवायला चार पावलें बरोबर येतों ! ( जाऊं लागतो. )

**कंक०:**—( येऊन ) कुमार, हें तुम्हीं काय आरंभलें आहे ? या सख्यांची किंमत ती काय, आणि तुम्ही राजपुत्र होऊन यांच्याशीं इतकी सलगी करतां हें अगदीं अयोग्य आहे ! चला, थोडी विश्रांति घेण्यासाठीं वरच्या गच्चीवर जाऊं या.

**माध०:**—बरें आहे. ( कान देऊन ) पण ऐका. ऐका आधीं ! चुप !

**कंक०:**—( त्रासून ) काय ऐका ? ऐका काय?

**माध०:**—पैंजणाचा शब्द !

**कंक०:**—पैंजणाचा शब्द ! वेड नी खूळ ! तुम्हीच ऐका ! ( स्वगत ) याला मदयंतीनें पुरतेंच झपाटलें ! काय करावें !

( चरफडत निघून जातो. )

**माधव०:**—अहाहा ! प्रियेच्या पैंजणाचा हा मंजुळ ध्वनि दुरून ऐकूं येतो आहे हा मनाला किती आल्हाददायक वाटतो आहे !

## पद.

राग—जीवनपुरी. ताल—त्रिवट.

मंजुळ किति मंथर–गति नूपुर–रव हा अनुतालें ॥
जणु नीलकंठा नृत्यागम सांगे ॥ ध्रु० ॥
हा दूत चतुरतर कांता नियोजी ॥
लागुनी श्रवणा सुचवी आराधन मातें ॥ १६ ॥

---

## प्रवेश ३.

स्थळ—आमोदसुंदर उद्यानाचा एक भाग.

( प्रभावती व चपला येतात. )

**प्रभा:०**—चपले, काय ग मीं हा वेडेपणा केला !

## पद.

राग—काफी. ताल—धुमाळी.

अविचारी सहसा कशि झालें ॥
प्रेमळ नाथ होइल वाटे मजला अंतरला ॥
मीच वंचियला ॥ ध्रु० ॥
कपटाची वार्ता गेली । त्याच्या कर्णीं असली ॥
तरि घात माझा स्वयें केला । प्रेमळनाथ ॥ १७ ॥

**चप०:**—ताईसाहेब, अशी जर आपल्याला धास्ती वाटत असली तर कुमारांना ओळख देऊन मोकळ्या व्हा म्हणजे झालें !

**प्रभा०:**—वेडीच आहेस तूं ! कुमारांची प्रीति माझ्यावर आहे एवढें मला कळलें, पण एवढ्यानें माझें कोणतेंच कार्य अद्याप

झालेलें नाहीं. ही प्रीति नुसती शाब्दिक आहे कीं खरोखरीची आहे हें कशावरून समजावें ? आपल्या वर्गाबाहेरच्या माणसाशीं शरीरसंबंध करणें हें राजे लोकांना महत्पाप वाटतें. अशा स्थितींत कुमारांनीं मी राजकुलांतली नाहीं हें समजूनसुद्धां माझ्याशीं लग्न करण्याचा निश्चय करणें फार दुर्लभ आहे. आणि त्यांनीं तसा निश्चय यदाकदाचित् केला तरी तो कायमचा टिकणें त्याहून दुर्लभ आहे. शिवाय ज्यानें माझें पाणिग्रहण करावें त्यानें एकपत्नीव्रतानें राहिलें पाहिजे, हा तर माझा मुख्य मुद्दा आहे. तो कुमारांनीं अजून कुठे कबूल केला आहे ?

**चप०:**—पण या सर्व गोष्टी कबूल करण्याआधींच आपलें कपट त्यांना उमगलें तर काय वाट होईल ?

**प्रभा०:**— तीच मला रात्रंदिवस धास्ती पडली आहे. पण कामदेवाच्या कृपेवर माझा पूर्ण भरंवसा आहे. मी त्याला नेहमीं हीच प्रार्थना करतें कीं, हे जगन्मोहना ! या कुमाराच्या तीव्र बुद्धीवर मोहनी घालून तुझा उत्सव संपेपर्यंत माझें कपट याच्या नजरेस येऊं देऊं नको ! जें जें विसंगत घडून येईल तें तें त्याला सुसंगत भासवीत जा.

**चप०:**—ताईसाहेब, देवावर जर आपली अशी निस्सीम भक्ति आहे, तर तो सर्व संकटांचा परिहार करीलच करील. ( पाहून ) हा कंक इथे कशाला येतो आहे ? ताईसाहेब, हा मेला थेरडा आपल्या प्रेमाच्या मार्गांत वारंवार पडून आपल्याला कांट्यासारखा दुःख देत राहणार याची माझी आजपासून बनलीच ! आतां पहा याची कशी वेळोवेळीं फजीती करतें ती !

**प्रभा०:**—असें तुझ्या मनांत आलें तेव्हां त्याचें दुर्दैवच ओढवलं म्हणायचें !

( कंक येतो. )

**कंक०:**—अग पोरींनो. मी तम्हांला किती वेळ शोधीत होतों, पण

सांपडलांत एकदांच्या ! मदयंती, मी तुझ्या कल्याणाची गोष्ट तुला मुद्दाम सांगायला आलों आहें.

**प्रभा०:**—बोला. काय तुमचें म्हणणें ?

**कंक०:**—मदयंती, राजपुत्रांवर राजकन्यांनींच प्रेम करावें. त्यांनाच ती गोष्ट योग्य आहे. तूं कांहीं राजकन्या नव्हेस. तूं आपल्या पायरीनेंच वागलें पाहिजे. तूं आहेस गरीबाची मुलगी. गरीब मुलींनीं गरीब नवरेच हुडकले पाहिजेत. तूं आमच्या कुमारांच्या नादाला कशाला वेड्यासारखी लागली आहेस ? मी तुला एखादा छानदार नवरा बघून देईन. त्या कामांत शें दोनशें रुपये हुंडा भरावा लागला तरी मी पदरचा भरीन. मग तर झालेंना ? त्याची काळजी करूं नकोस तुला नवरा बघून द्यायचें काम माझ्यावर सोंपव.

**प्रभा०:**—( हंसून ) हा उपदेश तुम्ही मला करतां, पण या प्रमाणें वागण्याचें माझ्या हातांत थोडेंच आहे ! कुमार मला वागवतील तशी मी वागणार !

**चप०:**—हें खरेंच आहे. कंकणराव, तुम्ही—

**कंक०:**—( तिला थांबवून ) कंकराव म्हणावें. कंकणराव काय म्हणतेस ? तुझ्यासारखीं मीं कांकणें का घातलीं आहेत ?

**चप०:**—( हंसून ) तसें नांव माझ्या तोंडांतून चुकून गेलें हो ! कंकराव, तुम्ही आपल्या कुमारांचा बंदोबस्त करा, मग मी माझ्या सखीला संभाळतें.

**कंक०:**—( त्रासून ) तो माझ्या म्हणण्याप्रमाणें वागणारा असता तर हें सांगायला मी तुम्हांकडे कशाला आलों असतों ! ( दोघी हंसतात. ) बायांनो, माझ्या बोलण्याची तुम्हांला आतां

थट्टा वाटते आहे, पण पुढें पस्ताऱ्यांत पडाल बरें! असो. चपले, तूं नांवाप्रमाणें मोठी हुशार आणि चपळ दिसतेस !

**चप०:**–कां ? कांहीं काम सांगायचें आहे वाटतें ! पण त्यासाठीं माझी इतकी नको कांहीं शिफारस करायला !

**कंक०:**–( हंसून ) होय, माझें एक काम आहे. इथे माझ्या ओळखीचें दुसरें कोणीच नाहीं म्हणून तें काम तुलाच सांगावें म्हणतों.

**चप०:**–बरें. बोला तुमचें कोणचें काम आहे तें ?

**कंक०:**–काम दुसरें तिसरें कांहीं नाहीं. मला घेऊन राजवाड्यांत चल, आणि राणीसाहेबांची आणि माझी भेट करून दे. त्यांच्याशीं मला कांहीं बोलायचें आहे. या मदयंतीच्यानें हें काम होण्याजोगें असेल तर तिलाच येऊं दे.

**प्रभा०:**–छे ! छे ! कंकराव, मला कांहीं राजवाड्याची फारशी माहिती नाहीं. या चपलेलाच तुम्ही घेऊन जा. ( जाते. )

**कंक०:**–चल तर चपले !

**चप०:**–( स्वगत ) मेल्या लुबऱ्या ! चल आतां वाड्यांत, म्हणजे तुझें कांडात् काढतें ! ( उघड ) बरें आहे कंकराव, चला आतां वाड्यांत जाऊं या. ( जातात. )

## प्रवेश ४.

स्थळ–राजवाडा.

( चपला व प्रभाकर येतात. )

**प्रभा०:**–चपले, तूं हा कंकराव का शंखराव कोण म्हणतेस, तो आहे कुठे ?

**चप०:**–तो आईसाहेबांच्या दर्शनाला त्यांच्या महालांत गेला आहे. आत्तां तो बाहेर येईल. मेला भारी भांडखोर आणि चढेल आहे. कुमार माधवांजवळ ताईसाहेबांची जेव्हां तेव्हां निंदा करीत असतो मेला !

**प्रभा०:**–कांहीं चिंता नाहीं. येऊं दे त्याला आईसाहेबांचे महालांतून बाहेर ! त्याला रेशमासारखा मऊ करून तुझ्या हवालीं करतों ! मग तर झालेंना ? ( जातो. )

**चप०:**–( टाळ्या वाजवीत ) आहा ! आतां कशी पण मौज होणार आहे मौज ! !! ( जाते. )

**कंक०:**–( येऊन ) चपले ! अग चपले ! कोणीकडे पोरगी गेली न कळे ! आतां या अफाट वाड्यांत मला बाहेर जायचा रस्ता तरीं कसा सांपडणार, आणि विचारूं तरी कुणाला ? चपले ! अग चपले !

**चप०:**–( जवळ येऊन) अहो कंकराव, हांका तरी केवढ्यानें मारतां ! ही आलें मी. काय म्हणतां ? ( कंकास निरखून पाहून हंसत ) काय ! आज काय थाट हा ! हा अत्तराचा घमघमाट, आणि हे हारतुरे आणि हा शेला ! आज राणीसाहेबांकडूनच हा सत्कार झाला वाटतें ! चांगलें झालें हो !

**कंक०:**–( डौलानें ) अग याचें काय तुला नवल वाटतें! असा माझा सत्कार उज्जनीस दररोज होत असतो. राजकन्येचें आणि कुमाराचें लग्न झालें म्हणजे उज्जनीच्या राणीसाहेब मला एक हजार मोहरा देणार आहेत! आणि इथल्या राणीसाहेब मला आपल्या गळ्यांतला कंठा देणार आहेत कंठा! तूं काय समजते आहेस! आतां तुला मी बडा मनुष्य दिसूं लागलों आहे कीं नाहीं? ( डौलानें चालूं लागतो पडद्यांत प्रभाकर बोलतो–' कोण आहेरे पाहऱ्यावर? लुच्चांनो! आईसाहेबांच्या महालाकडे कोणी एक अनोळखी परका मनुष्य आतांच येऊन गेला. कुणाच्या परवानगीनें त्याला तुम्ही आंत सोडलेंत? कुठे आहे तो माणूस? आणा त्याला धरून. ( चाबूक फटकारून ) या चाबकाचे मी त्याच्या पाठीवर पंचवीस तडाके मारणार! )

**कंक०:**–( घाबरून ) अग चपले, हें ग काय अरिष्ट आहे? मला फटके मारीन म्हणतो तो माणूस इकडेच येतो आहे! आतां अशी वाट काढ कीं, या माणसाची आणि माझी गांठच पडूं नये. चाललीस कुणीकडे? तो तिकडूनच येतो आहे आणि तिकडेच तूं चाललीस?

**चप०:**–या, या लौकर. घाबरूं नका. मी तुम्हांला दुसऱ्याच वाटेनें सांभाळून नेतें. ते युवराज प्रभाकर महाराज बोलताहेत. तुम्हांला काय करताहेत ते? ( कंक भीत भीत पुढें जातो. तों प्रभाकर येऊन त्याची गचांडी धरितो. )

**प्रभा०:**–( डोळे वटारून ) कोण हो तुम्ही?

**कंक०:**–( रडवें तोंड करून ) मला कक म्हणतात.

**प्रभा०:**–एकूण तुम्ही गिधाडाच्या जातींतले आहा?

**कंक०:**–नाहीं महाराज, मी माणूस आहें.

**प्रभा०:**—माणूस आहां ? ( चाबूक फटकारून ) खोटें बोलतां. कंक, वृक, वायस, गृध्र, हा मृतमांस भक्षण करणारा पक्ष्यांचा वर्ग आहे. आहे कीं नाहीं ? बोला. ( चाबूक फटकारतो. )

**कंक०:**—तें खरें आहे महाराज, पण मी जन्माला आलों तो माणूस म्हणून आलों आणि मागून मला कंक हें नांव मिळालें.

**प्रभा०:**—तुम्ही स्वतःला माणूस म्हणवतां, पण माणुसकी तुमच्या अंगांत दिसत नाहीं ! प्रभावतीच्या लग्नाच्या कामांत तुम्ही कांहीं घोंटाळा करणारा आहां असें मला कळलें आहे.

**कंक०:**—( स्वगत ) हें चपलेचें काम दिसतें ! ( उघड ) नाहीं. नाहीं. आपल्याला ही बातमी कोणीं सांगितली आहे ती अगदीं खोटी आहे; हें आपण खास समजा.

**प्रभा०:**—( अंगावर खेंकसून ) तुम्ही कुठले राहणारे ?

**कंक०:**—मी उज्जनीचा रहाणारा असून तेथला मोठा योग्यतेचा गृहस्थ आहें.

**प्रभा०:**—उज्जनीचे लोक सोदे, लुच्चे, कपटी, बेइमान, घमेंडखोर असतात असें आमच्या कानावर आलें आहे.

**कंक०:**—जसे इतर गांवांतून असतात तसे तिथेही कांहीं कदाचित् असतील; पण मी त्यांतला नाहीं. मी भला मनुष्य आहें. राजकन्या प्रभावतीचें कुमार माधवांशीं लग्न जुळवण्याच्या कामावर माझी नेमणूक झाली आहे, हीच माझ्या भलेपणाची साक्ष आहे.

**प्रभा०:**—असें काय ? तर मग कधीं लग्न जुळवतां ?

**कंक०:**—त्याच तजविजीला लागण्याचा— ( प्रभाकर डोळे वटारतो. ) विचार करण्याचा—( प्रभाकर चाबूक उगारतो. ) उद्योग करतों आहें.

**प्रभा०:**–तजविजीला लागण्याचा विचार करण्याचा उद्योग करतों आहें!!! लाज नाहीं वाटत बोलायला? कुणापुढें या माकड-चेष्टा लावल्या आहेत! कोण आहे रे तिकडे? खोडा आणा पाहूं! आत्तां आमच्या देखतच यांना फटके मारले पाहिजेत. ( कंक रडूं लागतो. ) मुलगी तुम्हांला पसंत पडली कीं नाहीं?

**कंक०:**–( रडत ) पडली आहे महाराज!

**प्रभा०:**–( वेडावून ) पडली आहे महाराज! पडलीच पाहिजे! माझी बहीण रत्नांतलें श्रेष्ठ रत्न आहे. ज्यांना ती बायको पाहिजे असेल त्यांनीं आमच्या पायां पडून तिची मागणी केली पाहिजे. याप्रमाणें तिची योग्यता आहे कीं नाहीं?

**कंक०:**–खरें आहे. खरें आहे. कबूल आहे.

**प्रभा०:**–( चाबूक खडकावून ) असें नुसतें कबूल करून काय उपयोग? पायां पडून कबूल केलें पाहिजे.

**कंक०:**–( स्वगत. ) गांजेकसाशीं प्रसंग! करायचें काय! ( उघड ) राजकन्येसंबंधानें आपण म्हणतां तें अक्षरशः कबूल आहे. ( पायां पडतो. चपला प्रभाकराला " पुरे " अशी खूण करिते. )

**प्रभा०:**–बरें आहे. या वेळेला मी तुम्हांला सोडून देतों. पण प्रभावतीच्या मनाला कुमार आला, आणि कुमाराच्या मनाला प्रभावती आली, हें वर्तमान आठ दिवसांच्या आंत मला येऊन कळ-वलें नाहींत, तर तुमच्या पाठीची चामडी लोळवीन! काय समजलांत? जा! कंक! खंक! रंक!! शंख! ( चरफडत जातो. )

**चप०:**–चला आतां. जाऊं या आपण!

**कंक:**–अग कारटे, या आग्या वेताळाला तूं काय सांगितलेंस?



**कंक्**—खरें आहे. खरें आहे. कबूल आहे. ( पृ० ४८ )

**चप०:**—नाहीं हो ! मीं नाहीं कांहीं सांगितलें ! उगीच आपला माझा संशय घेऊं नका कंकणराव !

**कंक०:**—कंकराव म्हणावें.

**चप०:**—कशाला कंकराव म्हणावें? आतां त्यांच्या पायां पडलांत, आणि गयांवयां करून रडूं लागलांत ! त्यांना चांगलें ठासून एखादें उत्तर देतां तर ते काय तुमचा जीव घेत होते? म्हणे कंकणराव म्हणूं नका ! कां म्हणूं नका ?

**कंक०:**—अग, माणसाशीं वेळ पाहून असें वागावेंच लागतें. पण या प्रसंगाची ओळख तिकडे उद्यानांत कोणा पोरीबिरींना देऊं नकोस हो ! तूं अजून लहान आहेस म्हणून सुचवून ठेवतों ( स्वगत ) प्रभाकरानें माझी अशी दुर्दशा केली हें कांहीं कुमाराला कळवण्याची सोय आहे का ? आपला अपमान आपणच गिळून बसलें पाहिजे ! कुमाराला जर हें वर्तमान कळवलें, तर तो रागानें तत्काळ निघून उज्जनीला जाईल. मग या कंकरावाला हजार मोहरा आणि मोत्यांचा कंठा कुठून मिळणार ? ( जातात. )

---

## प्रवेश ५.

**स्थळ**—आमोदसुंदर उद्यान.

( लतामंडपांतल्या शिलातलावर प्रभावती बसली असतां माधव प्रवेश करतो. त्यास जवळ आलेला पाहून प्रभावती जाऊं लागते. )

**माध०:**—मदयंती, एकांतांत तुझ्याशीं संभाषणाचा प्रसंग प्राप्त व्हावा म्हणून मी आज इतके दिवस यत्न करतों आहें तो प्रसंग आज मोठ्या सुदैवानें मला मिळाला आहे. अशा स्थितींत तूं

माझ्याशीं एक शब्दसुद्धां न बोलतां इथून निघून जावेंस हें तुला योग्य आहे का ? ( ती थांबते, आणि सलज्ज व हास्ययुक्त मुद्रेनें खालीं मान घालून उभी राहते. ) बोल. बोल. तुझ्या तोंडचे शब्द ऐकून माझा जीव कृतार्थ होऊं दे ! इथे कोणी नाहीं. काडीमात्र भीड न धरतां तूं माझ्याशीं मोकळ्या मनानें बोलावेंस ही माझी तुला प्रार्थना आहे.

**प्रभा०:**—कुमार, मीं काय बोलावें ? आपल्याशीं बोलायची माझी काय योग्यता आहे ? तशांत साहस करून आपणाशीं अधिक परिचय करण्याच्या भरीस मी पडलें तर त्यांत आपलें आणि माझें हंसें होईल.

## पद.

**राग**—समाज. ताल–पंजाबी.

**नका परिहास करूं मन लाजे ।**
**समादर–भर राज–सुतेला साजे ॥ ध्रु० ॥**
**रूप–विभव–गुण शोभवि अनुगुण ।**
**कीर्ति भुवनिं त्याची गाजे ॥ १८ ॥**

आपण ज्या राजकन्येचें प्रेम संपादण्यासाठीं उज्जनीहून इथे आलां तिच्याकडेच आपलें लक्ष जावें हें योग्य आहे.

**माध०:**—तें योग्य आहे कीं अयोग्य आहे हें पाहण्याचें मला कारण नाहीं. मला एवढें कळतें कीं, प्रेम हें कांहीं व्यक्तीच्या दर्जा-वर अवलंबून नाहीं.

**प्रभा०:**—थोडें मोकळ्या मनानें बोलतें याबद्दल क्षमा असावी. प्रेम हें व्यक्तीच्या दर्जावर अवलंबून नसेल तर नसो. पण आपल्या-संबंधानें प्रेम व राजकारण या दोहोंचाही विचार झाला पाहिजे. आपण माझ्यावर प्रीति करतां असा माझा समज झाला आहे. हा माझा समज चुकीचा नाहीं ना ?

**माध०:**—छे ! छे ! तूं बरोबर ताडलेंस !

**प्रभा०:**—तर मग हें आपलें वर्तन आपल्या स्थितीशीं फारच विसंगत आहे. माझी सखी प्रभावती राजकन्या आहे, आणि आपण राजपुत्र आहां. आपण दोघेंही थोर आणि एकमेकांस अनुरूप अशीं वधूवरें होण्याला योग्य आहां. त्यांतून माझी सखी रूपवान् आहे तशीच गुणीही आहे. तिच्यावर आपलें प्रेम बसूं नये आणि तें माझ्यासारख्या रंकावर बसावें हा आपला छांदिष्टपणा नव्हे काय ?

**माध०:**—यांत कसला छांदिष्टपणा ?

## पद.

**राग—सोरट. ताल—एका.**

**नवल नोहे । लोहें चुंबका धरावें ।**
**कनक-रजत-भजन नच करावें ॥ ध्रु० ॥**
**ईश-घटित तव मजला ।**
**मीलन न चुकावे व्हावें ॥ १९ ॥**

हे प्रियसखी, आतां माझ्या मनाला दुःख देणारें प्रतिकूल भाषण करूं नकोस. माझा अंगीकार करून मला सुखी कर.

**प्रभा०:**—कुमार, हें काय आपलें बोलणें? आपल्यासारखा राजकुमार कुणा गरीब कुमारिकेला जर नवरा मिळत असला तर तो तिला नकोसा कसा होईल ? पण पुरुष भोळ्या कुमारिकांना मोहक भाषणांनीं भुरळ पाडून शेवटीं दगा देतात, असें मीं ऐकलें आहे. प्रभावती अन्नाचा काय घांस घालील त्यावर निर्वाह करून राहणारी मी गरीब मुलगी आहें. आणि आपण राजकुमार आहां. आपण कोणीकडे आणि मी कोणीकडे ! सर्व बाजूंनीं मला माझा विचार केला पाहिजे.

**माध०:**—प्रेम हें कुलवैभवादिक अवस्थाविशेषाची पर्वा कधींच बाळगीत नाहीं. तथापि स्वतःचें कुल उच्चप्रतीचें नसल्यामुळेंच जर तुला कांहीं हीनपणा वाटत असेल अगर मजवर प्रीति करणें अशक्य वाटत असेल, तर राजकन्येच्या बरोबरीला तुला आणणें ही गोष्ट माझ्या हातांतली आहे. तूं मूळची राजकन्या नसलीस तरी राजकुमाराची पत्नी झालीस म्हणजे त्यांत थोरपणा कमी आहे असें नाहीं.

**प्रभा०:**—पण प्रभावती माझी जिवलग मैत्रीण आहे. तिचा विश्वासघात मी कसा करूं ? आपल्याला वरण्याविषयीं ती आतुर आहे, हें ठाऊक असून सुद्धां जर मीं आपल्या प्रेमाचा अभिलाष धरला, तर तिचा विश्वासघात केल्यासारखें होईल. आणि मी गरीब असलें तरी कोणत्याही लाभासाठीं कोणाचाही विश्वासघात कधीं करणार नाहीं.

**माध०:**—मदयंती, हा तुझ्या मनाचा थोरपणा स्तुत्य आहे. पण त्याचा आपल्या प्रस्तुतच्या भाषणाशीं कांहींच संबंध येत नाहीं. प्रभावतीचें मन माझ्यावर गेलें आहे असें तूं सांगतेस, पण माझें मन तिच्यावर मुळींच जात नाहीं, व कधींही जाण्याचा संभव नाहीं, हें कुठे तुला ठाऊक आहे ? जसें तिचें माझ्यावर मन आहे, तसें माझें तिच्यावर असतें, आणि तशा स्थितींत माझें प्रेम ओढून घेण्याविषयीं तूं आपण होऊन खटपट करतीस, तर मात्र तो विश्वासघात झाला असता. याउपर तुझें काय म्हणणें आहे ? ( प्रभावती बोलत नाहींसें पाहून ) तूं कांहीं बोलत नाहींस यावरून तूं माझी पत्नी होण्याला कबूल आहेस असाच अर्थ मीं समजावा ना ?

**प्रभा०:**—कुमार, मी गरीब आहें, आणि आपली स्त्री होणें ही मानाची आणि वैभवाची गोष्ट आहे हें खरें आहे. पण आपण

पुष्कळ स्त्रिया करणार त्यांतलीच जर मी एक होणार असेन, तर या मानाची आणि वैभवाची मला कांहीं फारशी महती वाटत नाहीं.

**माध०:**—राजे लोकांत जनानखाना बाळगण्याची रूढि पडली आहे तीविरुद्ध माझाही फार कटाक्ष आहे. मीं असा संकल्प केला आहे कीं जर मी कोणा स्त्रीवर प्रेम करीन तर तें एकीवरच करीन. आणि अशा या एकट्या विवाहित स्त्रीबरोबर यावज्जीव संसार करीन. आतां तर तुझें समाधान होईल ना ?

**प्रभा०:**—कुमार, मी होय म्हणेन, परंतु राजकन्येच्या ऐश्वर्याला मान देऊन व राजे लोकांच्या रूढीला भिऊन आपण आतां बोललांत हें सारें विसराल, आणि माझा अव्हेर करून मला जन्मभर दुःखसमुद्रांत ढकलून द्याल हें मोठें भय वाटतें !

**माध०:**—नाहीं. नाहीं. मी तुझा अव्हेर कधीं करणार नाहीं. आतां जें बोललों तें अक्षरशः खरें करून दाखवीन. याबद्दल तुला जरूर वाटत असेल तर पाहिजे तसली मी शपथ घ्यायला तयार आहें.

## पद.

**राग—कानडी देस. ताल—दादरा.**

**घामांगी तुज विनवीं । वचन खचित हेंचि जाण ॥**
**न कधीं इतरा । तुजविण मानीन गृहिणी ॥**
**देइं वचन खचित हेंचि जाण ॥ ध्रु० ॥**
**प्रणय-बंधनें शिथिल । काल-नाश ना करी ॥**
**आली विषमा दशा । नच प्रेमा तरि भंगे ॥**
**सुरेंद्र-सौख्य मिरवूं संसारिं असुनी ॥**
**देइं वचन खचित हेंचि जाण ॥ २० ॥**

**प्रभा०:**—आपण सत्यवचनी रहाल हा मला भरंवसा आहे. तथापि आपल्या प्रश्नाचें निश्चितपणें उत्तर द्यायला आपण मला चार दिवस अवकाश द्यावा एवढेंच माझें मागणें आहे.

**माध०:**—आतां आणखी चार दिवस माझा जीव संशयांत कां बरें ठेवतेस !

**प्रभा०:**—माणसानें प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करीत असावी. त्यांतून ही जन्माची गांठ. याचा जितका विचार करावा तितका थोडाच आहे. आणि विचार करायची हीच वेळ आहे. आपलें मन चार दिवसांनीं फिरलें तरीही त्याचा मला राग नाहीं. पण तसें जरी तें फिरणारें नसलें तरी मला उत्तर द्यायचें तें माझ्या सखीला म्हणजे प्रभावतीला विचारूनच दिलें पाहिजे. तिला ही गोष्ट मीं कळवली तर आपली कांहीं हरकत नाहीं ना ?

**माध०:**—कांहीं हरकत नाहीं खुशाल कळव. या प्रकरणांत तिचा किंवा तिच्या बापाचा अथवा भावाचा माझ्यावर राग झाला तरी मला कांहीं त्याची परवा नाहीं. आणि या सर्वांचा राग तुझ्या-वर झाला तरी तुझें संरक्षण करण्याचें मला पूर्ण सामर्थ्य आहे, व तें करण्यांत मीं कृतकृत्यता मानीन.

**प्रभा०:**—आपला इतका आधार असल्यावर आतां मला कुणा-चेंही भय नाहीं. ( पडद्यांत शब्द होतो:—" अहो कुमार, अहो कुमार, तुम्ही आहां कुणीकडे ? " )

**माध०:**—( त्रासून ) आली ही कंकाची ब्याद ! आतां इथून पाय काढावा हेंच बरें ! ( जातो. )

**प्रभा०:**—( हर्षानें ) भगवान् कामदेवाचा विजय असो ! ज्याला अबलाबंधु असें म्हणतात त्या या कामदेवानेंच माझें पूर्णपणें साहाय्य करून या कुमाराला माझ्या हातीं आणून दिलें ! कुमारा, तूं आतां माझ्या प्रेमपाशांत सर्वस्वी बद्ध झाला आहेस. आतां तूं कोठें जाशील ?

पद.

राग–तोडी. ताल–त्रिवट.

तूं मजसिं वश नाथा ॥ आतां ॥ ध्रु० ॥
प्रेमामृत–घन तनमन हरिता ।
प्राणाहुनि तूं प्यारा ॥
पूर्व–सुकृत–फल आलें हाता ॥ २१ ॥

( जाते. )

अंक दुसरा समाप्त.

# अंक ३.

## प्रवेश १.

**स्थळ**—आमोदसुंदर उद्यान.

( गवळ्याचा वेष घेतलेला जालंदर "घ्या रे दूध !" असें ओरडत येतो. )

**जालं०**:–( दुधाची कावड खालीं ठेवून ) मदयंतीची आणि माझी त्या दिवशीं बागेंत गांठ पडली त्या दिवशींच्या तिच्या बोलण्यावरून तिच्या मनांत कांहीं तरी दुष्ट विचार घोळतो आहे असें वाटतें. राजकन्येच्या महालांत माधवानें तिला झिडकारलेलें मीं डोळ्यांनींच पाहिलें आहे, त्यामुळें त्याचा नाहीं मला संशय येत. पण तो नसला तरी दुसऱ्या कोणा पुरुषाकडे तिचें लक्ष वेधलें असावें अशी मला शंका येते. आणि त्यासाठींच मीं हा गवळ्याचा वेष घेऊन इथे आलों आहें. इथे येण्यांत मोठा धोका आहे हें मला कळतें. पण मी तरी काय करूं ?

**पद.**

**राग**–भीमपलास. ताल–त्रिवट.

**घडवि संताप अनार्या–पाप ।**
**सुचवि तदालाप अधमाचार ॥ ध्रु० ॥**
**मम मनिं संशय–भूत ठाकलें ।**
**अविरत तें करि विहार ॥ २२ ॥**

( दुरून माधवाला पाहून ) तो कोण पुरुष त्या बागेच्या कोंपऱ्यांत हिंडतो आहे ? ( निरखून ) होय. त्या दिवशीं महालांत मद-

यंती ज्याला भुलवूं पहात होती तोच हा राजकुमार ! या बिचाऱ्याला प्रभावतीशिवाय रात्रंदिवस कांहींसुद्धां दिसत नसेल ! तिनें पसरलेल्या मायेच्या जाळ्यांत हा असा गुरफटून गेला आहे कीं, याची स्थिति पाहून कींवच येते ! स्त्रीचें प्रेम म्हणजे कांहीं परब्रह्म आहे असें या बिचाऱ्याला वाटत असेल नाहीं बरें ? बाबारे ! एका वेळीं स्त्रीप्रेमाच्या मदिरेनें मीसुद्धां तुझ्यासारखा बेहोष होऊन गेलों होतों, आणि त्यामुळेंच आतां हें माझ्या जिवाला वारंवार दुःख होतें आहे ! माझ्याप्रमाणेंच तुझीसुद्धां दशा होणार नाहीं असें कोणीं म्हणावें ! प्रभावतीनें आरंभलेल्या या कपटनाटकाचें पर्यवसान या कुमाराला सुखदायक होतें, कीं माझ्यासारखेंच दुःखदायक होतें, हें मला पहायचें आहे. ( थांबून ) आज कांहीं होवो ! मदयंतीला गांठून तिला समक्ष ताकीद द्यायचीच, असें ठरवून मी इथे आलों. पण ती आतां कुठे बरें दृष्टीस पडेल ? ( पाहून ) राजकन्येचें सोंग घेतलेली माझी मदयंती त्या बकुल वृक्षाच्या सावलींत खालीं मान घालून चिंतन करीत इकडे तिकडे हिंडते आहे. अरेच्या ! ही भयचकित दृष्टीनें पुन्हां पुन्हां चोहोंकडे काय पहाते आहे ? हां ! तिनें पदराखालून एक तसबीर हळूच बाहेर काढली ती कोणाच्या दृष्टीस पडूं नये हेंच तिच्या मनांत आहेसें दिसतें. त्या तसबिरीकडे ती वारंवार प्रसन्न मुद्रेनें पहाते आहे. ही तसबीर माझी असेल काय ? छे ! जालंदरा, एके वेळीं असें तुझें भाग्य होतें खरें ! पण आतां तें खचित नाहीं ! कशाला आशा करतोस ? आतां अचानक जाऊन ती तसबीर तिच्या हातांतून हिसकून घेतों, आणि परपुरुषाचें चित्र काढल्याचा गुन्हा तिच्या पदरांत घालून तिचें शासन करतों. पण इतका प्रयास कशाला ? ती आपण होऊनच या जाईच्या मंडपाकडे येते आहे. आतां ती तसबीर कोणाची आहे हें सहजीं कळतेंच आहे. या मंडपांतल्या शिलातलाच्या पाठीमा-

गच्या झुडपांत दडून बसावें आणि ती काय लीला करते हें निश्चिंतपणें पहावें. ( झुडपांत दडून बसतो. मदयंती येते. )

**मद०:**—या माधवावर मी जसें निस्सीम प्रेम करतें, तसें आजपर्यंत कोणाही सुंदर स्त्रीनें कोणाही पुरुषावर केलें नसेल ! पण हें त्याच्या गांवीं तरी आहे का ? माझें प्रेम त्याला स्पष्ट कळावें म्हणून काय खटपट करायची तिची मीं वेळोवेळीं पराकाष्ठा करून पाहिली तरी तिकडे तो लक्षच देत नाहीं: तेव्हां याला काय अजाण म्हणूं, कीं हट्टी म्हणूं, कीं निर्दय म्हणूं ? याला ह्मणूं तरी काय ? प्रेमविकारामुळें मी विव्हल झालेली त्याला माहीत असतांही ज्याअर्थी माझी त्याला कींव येत नाहीं, त्याअर्थी तो पराकाष्ठेचा निर्दय मनाचा आहे हेंच खरें !

## पद.

**राग**—काफी. ताल—त्रिवट.

**झाला विमुख प्रेमा या । हा नाहिं यासिं माया ॥ ध्रु० ॥**
**तळमळवी मना । झुरवि मम काया ॥ १ ॥**
**रडवि हटें मला । दिन-रजनि वांयां ॥ २३ ॥**

काय चमत्कार तरी ! या माधवाची हेटाळणी पाहून केव्हां केव्हां मला अतिशय संताप येतो. पण त्या संतापाच्या भरांत त्याचें नावच अजीबात टाकून द्यावें, असें नाहीं माझ्या मनांत येत ! उलट त्याचा पिच्छा पुरवून त्याचें प्रेम आपल्याकडे ओढून घ्यायचेंच घ्यायचें, असाच मनाचा निर्धार बळकट होतो ! ( थांबून ) माझ्या भोंवतीं एकसारखा त्या सख्यांचा घोळका असतो. त्यांतूनच एकान्ताची संधि साधून मीं कशी तरी चोरून मारून ही त्या कुमाराची तसबीर काढली आहे. पूर्वी चितार्‍याकडून मीं माझी तसबीर काढवली होती तींत इथे कोरी जागा ठवली होती. त्या जागेंत जालंदराचें चित्र काढावें असें मीं पूर्वी योजिलें होतें. परंतु

आतां त्याच्याशीं माझें नातें तुटलेलें आहे आणि म्हणूनच त्या जागेंत मीं कुमाराच्या चित्राची स्थापना केली आहे. आतां इथे एकान्त आहे या शिलातलावर बसून डोळे भरून स्वस्थपणानें ही तसबीर पहातें. ( बसते. ) हुश्श् ! किती उष्मा होतो आहे हा ! हा माझ्या डोकीवरचा मुकुट खालीं तरी काढून ठेवूं दे. ( हंसून ) हा प्रभावतीच्या इच्छेमुळें चार दिवस माझ्या डोक्यावर येऊन बसला आहे. हा कांहीं माझा सत्तेचा नव्हे. सोंगाच्या बतावणी-पुरती याची प्रतिष्ठा ! ठेवतेंच तर हा काढून. ( मुकुट काढून ठेविते. ) आतां बाई अंमळ मोकळेंसें वाटूं लागलें आहे. ( तसबीर पहात ) जों जों या राजपुत्राच्या चेहऱ्याकडे निरखून पहावें, तों तों माझ्या मनाला आनंदाची अधिक अधिकच भरती येते !

**जालं०:**—( तसबीर पाहून रागानें ) या सटवीच्या भुलवणीला तो कुमार बळी पडणार नाहीं असें मी समजत होतों. पण शेवटीं हिनें त्याला पछाडलेंच ! ( माधव येतो. )

**माधव०:**—( स्वगत. ) वाहवा ! आजसुद्धां मदयंती त्या लता-मंडपांतच बसलेली आहे, तर आतां त्वरेनें जाऊन तिची भेट घ्यावी. ( पडद्यांतून कंक हांक मारतो. " अहो कुमार, थांबा, थांबा, मीं आलों. " ) आली ही आयत्या वेळीं कंकाची पिडा ! आतां याला कशी तरी झुंकांडी देऊन पुनः इकडे यावें. ( जातो. )

**मद०:**—आम्हां उभयतांच्या समागमापासून दोघांनाही फार सुख होतें आहे, अशा अभिप्रायाचें एक गीत रचून मी या तस-बिरीखालीं लिहिलें आहे, तें एकदां वाचून पाहूं या.

## पद.

राग—पूर्वी. ताल—त्रिवट.

प्रणयिता फल लाभे हें आयासें ।
रंगलें तनमन वाहिलें प्रेमा ॥
लेशहि भेद जिवाला या ना भासे ॥ ध्रु० ॥

सहवासिं दंग सुखाच्या हें हव्यासें।
या कोक-युगा विरह-कातरा।
शोक न व्हावा वियोगाच्या आभासें ॥ २४ ॥

माझ्या मनांतला सर्व अभिप्राय तर या गीतांत आला आहे. पण त्या प्रियकराचा अभिप्राय खरोखरीच कसा काय आहे कुणाला ठाऊक ?

**जालं०:**–( झुडपांतून क्रोधानें उघड ) कुलटे, कोणच्या प्रियकराचा अभिप्राय तुला पाहिजे ? हलींच्या कीं पूर्वींच्या ?

**मद०:**–( घाबरून तसबीर लपवून ) अगबाई, कोण आहे इथे ? ( पळूं लागते. )


**जालं०:**–( बाहेर येऊन तिला धरून ) हा मी जालंदर धनुर्धर तुझें शासन करायला हजर झालों आहें. (तरवार उपसूं लागतो.)

**मद०:**–( त्याचे दोन्ही हात धरून ) नाहीं हो प्राणनाथ ! मी कांहीं केलें नाहीं. नका मला मारूं ! ( तसबीर तिच्या पदराखालून जालंदराच्या पायांशीं पडते. )

**जालं०:**–चांडाळणी, तुझ्या असल्या मायावी भाषणांनीं फसणारा मनुष्य मी नव्हे ( तसबिरीकडे बोट दाखवून ) हें पहा तसबिरीच्या रूपानें हें तुझें पातकच माझ्या पायां पडून तुझा शिरच्छेद करण्याविषयीं माझी प्रार्थना करीत आहे. आतां नाहीं तुला जिवंत ठेवणार ! ( तिला ढकलून तरवार उपसतो. )

**मद०:**–( घाबरून बोबडी वळल्याच्या स्वरानें ) अहो, धांवा ! धावा ! खून ! खून !

**माध०:**–(पडद्यांतून) मदयंती! भिऊं नकोस. हा मी आलोंच ! ( येतो. मदयंतीकडे पाहून स्वगत ) अरे ! ही तर प्रभावती ! आणि हा कोण ? ( आश्चर्यानें स्तब्ध होतो. )



**जालंदर**—दुष्टे, तसविरींत काढलेला हाच तो तुझा जार ! ( पृ० ६१ )

**जालं०:**–( क्रोधानें दांतओठ चावून ) दुष्टे, तसबिरींत काढलेला हाच तो तुझा जार! ( माधवास ) अरे ए दुष्टशिरोमणि, परस्त्रीचा अभिलाष करणारा महापातकी, दरवडेखोराच्यासुद्धां या स्त्रीधनावर दरवडा घालतोस! भोग आपल्या कर्माचें फळ! ( माधवाच्या अंगावर चालून जातो दोघे लढूं लागतात मदयंती तसबीर व मुकुट तसाच टाकून पळून जाते जालंदर लढतां लढतां थकल्याचा आविर्भाव दाखवतो. )

**माध०:**–अरे, तूं कोण आहेस हें मला माहीत नाहीं, आणि माझ्याशीं कां लढतो आहेस हेंही ठाऊक नाहीं. तथापि मी तुला इतकेंच सांगतों कीं, तूं थकल्यासारखा दिसतो आहेस, याकरतां वाटेल तितका विसावा घेऊन ताज्या दमानें पुन्हां लढायला ये. तुझी युद्धाची हौस पुरवायला मी केव्हांही सज्ज आहें व समर्थ आहें. ( तरवार म्यानांत घालतो. )

**जालं०:**–( तरवार म्यानांत घालून ) होय. काल सूर्यास्तापासून मला झोंप व विश्रांति मिळाली नाहीं. मला थकवा आला आहे खरा. तूं सामान्य प्रतीचा योद्धा नाहींस, हें मीं आतां पाहिलेंच आहे. त्यांतून तूं मला उदारपणानें विसावा घेण्याची सवलत दिलीस, यावरून तूं लोकोत्तर वीर आहेस अशी माझी खात्री झाली आहे. अशा सन्मान्य वीराशीं वैर व कलह करण्याचें माझ्या नशीबीं आलें याचें मला फार वाईट वाटतें. परंतु नाइलाजाची गोष्ट आहे कीं, तुझा अगर माझा प्राण जाईपर्यंत मला तुझ्याशीं लढलेंच पाहिजे.

**माध०:**–पण एकदम इतक्या निकरावर येऊन प्राण जाईपर्यंत माझ्याशीं लढण्याचा निर्धार करणारा असा तूं मनुष्य आहेस तरी कोण?

**जालं०:**–मी असा तसा कोणी सामान्य मनुष्य नाहीं हें माझें नांव ऐकतांच तुला कळेल. माझें नांव जालंदर धनुर्धर.

**माध०:**–( आश्चर्यानें ) काय ? जालंदर धनुर्धर या नांवाचा बंडवाला या राज्यांत प्रसिद्ध आहे तो तूंच काय ?

**जालं०:**–( अभिमानानें छातीला हात लावून ) होय. जालंदर धनुर्धर असें ज्याचें नांव तूं ऐकलें आहेस तोच मी.

**माध०:**–तूं शूर आहेस, आणि मीं शौर्याचा चाहता आहें. या राज्यांत रावापासून रंकापर्यंत सर्वांचा तुझ्याशीं द्वेष आहे खरा, पण तूं माझा कोणताही अपकार केलेला नाहींस, त्याअर्थी माझा तुझ्याशीं द्वेष नाहीं तुझ्या मनाचा कांहीं भलताच ग्रह होऊन तूं एकदम माझ्याशीं वर्दळीवर आलास त्यामुळें मला तरवार उपसणें भाग पडलें एरवीं तुझें माझें वैर असण्याचें कांहींच कारण नाहीं.

**जालं०:**–राजपुत्रा, कांहींच कारण नाहीं म्हणतोस ? तर मग हें पहा कारण ! ( तसबीर उचलून त्याच्या हातांत देतो. )

**माध०:**–( तसबीर पाहून ) हां. हां. प्रभावतीनें आपली स्वतःची व माझी तसबीर एकत्र काढून तिच्या खालीं हें प्रेमाचें काव्यही रचून लिहिलें आहे ! ( तसबीर फेंकून देतो. ) अंः ! मला काय असल्या तसबिरीची पर्वा आहे ? या तसबिरींतल्या प्रभावतीच्या ठिकाणीं मदयंती काढलेली असती, तर हीच तसबीर मीं नेहमीं उराशीं बाळगली असती, आणि शिरसा वंदन केली असती. कारण मदयंती मला प्राणापेक्षांही प्रिय आहे.

**जालं०:**-मदयंती नव्हे, प्रभावती !

**माध०:**–( रागानें ) प्रभावती नव्हे, मदयंती !

**जालं०:**–( रागानें तरवारीस हात घालून ) अरे ! पुन्हां मदयंती म्हणतोस !

**माध०:**–( तरवारीस हात घालून ) एकदां, दोनदां, सातदां,

शंभरदां म्हणेन. मदयंती. मदयंती. मदयंती. म्हणायला कोणाची भीति आहे ? मदयंती ही माझी स्त्री आहे, हें ज्याला कबूल नसेल त्याला ही माझी तरवार कबूल करायला लावील.

**जालं०:**–( स्वगत ) प्रभावतीच्या कपटामुळें याला भूल पडली आहे, म्हणूनच हा असें भलतीला भलतें नांव देतो आहे. परंतु मी समजून उमजून याच्याशीं वेड्यासारखा कां भांडतों आहें ! या अन्नपुत्राचा भ्रम दूर करून प्रभावतीच्या हौसेचा हिरमोड करणें हें कांहीं माझें काम नव्हे. माझ्या मदयंतीशीं याचा कांहीं संबंध नाहीं एवढ्या ज्ञानानें मी तृप्त आहें ( उघड ) या तसबिरींतली स्त्री माझी बायको आहे.

**माध०:**–पण ही राजकन्या आहे. ही तुझ्या हातीं कशी लागली ?

**जालं०:**–( आश्चर्याचा आविर्भाव करून ) काय ? ही राजकन्या आहे ?

**माध०:**–होय. हिचें नांव प्रभावती. हें तुला ठाऊक नाहीं एकूण?

**जालं०:**–नाहीं बुवा ! आपल्याला हें मुळींच ठाऊक नव्हतें. मी तर हिला पहिल्यापासून मदयंती या नांवानेंच ओळखतों. असें हिनें खोटें नांव मला कां सांगितलें कोण जाणे ?

**माध०:**–अरे, तें माझ्या ध्यानांत आलें आहे. तूं बंडखोर असल्यामुळें तुझ्याशीं संबंध ठेवणें कोणाला सुरक्षित वाटणार ? त्यांतून ही पडली राजकन्या ! तेव्हां तिनें दिलें आपल्या सखीचें नांव दपटून नी दुसरें काय ! राजकन्येनें तुला छान फसवलें !

**जालं०:**–राजकन्येनें फसवलें हें तर खरेंच ! ( स्वगत ) कुणाला ? तुला कीं मला ? ( उघड ) ती काय लबाड आहे पहा !

**माध०:**–अरे, ती फार बिलंदर आहे ! ( दोघे हंसतात. ) पण तुझें आणि हिचें हें असलें नातें हिच्या बापाला ठाऊक आहे ?

**जालं०:**—हो. त्याला माहीत नसायला काय झालें ? पूर्वी हिची माझ्यावर फारच चांगली प्रीति होती पण तूं इथें आल्यापासून तिचें मन आतां तुझ्यावर गेलें आहे. आणि ती माझा अतिशय द्वेष करूं लागली आहे. याकरतां आतां मला इथून गेलें पाहिजे पण जातां जातां तुला स्नेहभावानें बजावून ठेवतो कीं, तूं कोणा तरी स्त्रीच्या नादीं लागून झुरत आहेस आणि प्रेमानें वेडा झालेला दिसतो आहेस. परंतु याचें पर्यवसान दुःखांत आणि निराशेंत होईल ही गोष्ट मी माझ्या अनुभवावरून तुला सांगतों आहें. याकरतां वेळींच सावध हो. कुमारा, स्त्रियांची जात फार लबाड असते, आणि पुरुषांना भुलवून त्यांचे हाल हाल करीत असते बरें !

## पद.

राग—शंकराभरण. ताल—झंपा.

**कपट—नाटक—नटी । मोह—मदिरा—घटी ।**
**स्वैर ही गोमटी । पुरुषा नटवि विटवि ॥ ध्रु० ॥**
**युव—मनोदारिणी । नयन—विष—धारिणी ।**
**शुभ—गति—निवारिणी । दुरुनी सुकवि चुकवि ॥ २५ ॥**

**माध०:**—जालंदरा, तुझ्या मनाची स्थिति पाहून मला वाईट वाटतें. या राजकन्येच्या कपटी वर्तनामुळें तुला अतिशय चीड आलेली आहे, आणि तूं आवेशाच्या भरांत एका व्यक्तीचे दोष सर्व स्त्रीजातीवर आरोपित करीत आहेस, हा केवढा अन्याय करतो आहेस ! ज्या स्त्रीवर मी अनुरक्त झालों आहें ती जर तूं पाहिली असतीस तर असें कधींही बोलला नसतास ! तिची योग्यता मी तुला काय सांगूं !

पद.

राग-सुघा सुगराई. ताल-त्रिवट.

कोमल-हृदया शीलोदारा ।
धरातल-रमा ती आर्या ॥ ध्रु० ॥
प्रेम-धनाची खाणी रमणी ।
स्त्रीजनीं गुण-गणना-स्मरणी ॥
वरिन सुकृत-योगें ती भार्या ॥ २६ ॥

**जालं०:**—बाबारे, स्त्रीप्रेम हें कमलपत्रावरच्या जलबिंदूप्रमाणें दिसतांना मोठें रमणीय दिसेल, पण तें कसोटीला लावून पहा कीं तत्काळ त्याचा फोलपणा कळून येईल.

**माध०:**—स्त्रियांच्या प्रेमाविषयीं जर तुझ्या मनांत असा भ्रम असेल तर तो खुशाल असो ! पण माझ्या वल्लभेविषयीं म्हणशील तर तिच्या प्रेमाला कसोटी लावली असतां तें बावनकशी सोनेंच आहे असें कोणालाही समजून आलेंच पाहिजे.

**जालं०:**—बरें आहे. त्याचा वाद कशाला ? पण मी सांगतों हेंच शेवटीं खरें ठरेल. ( दुधाची कावड खांद्यावर घेऊन ) घ्यारे दूध ! गोड ताजें दूध ! काळ्या गाईचें दूध! पाडशा म्हशीचें दूध ! ( हंसून ) कां ? हें सोंग ठीक दिसतें आहे कीं नाहीं ? घ्यारे दूध ! गोड ताजें दूध ! ( जातो. )

**माध०:**—काय विचित्र मनुष्य आहे हा ! याचा पराक्रमही विचित्र ! आणि याची गांठ पडण्याचा मला योग आला तोही विचित्रच ! ( थांबून ) एकूण इथे हा सारा ब्रह्मघोटाळाच मला दिसतो आहे ! ही राजकन्या प्रभावती आपल्या सखीच्या नांवावर या जालंदराशीं संबंध जोडते, आणि असा हा तिनें जोडलेला संबंध युगंधर राजाला माहीत असूनसुद्धां हीच मुलगी तो माझ्या गळ्यांत बांधूं पाहतो आहे !!! हा युगंधर बडा लफंग्या आहे ! (हंसतो ) या

जाळ्यांत मीसुद्धां गुरफटला जायचा! पण मीं पाहिल्या तडाक्यालाच प्रभावती राजकन्येची लुच्चेगिरी ओळखली म्हणून हा वेळपर्यंत निभावलों आहें. काय हे राजे आणि काय या राजकन्या! आणि काय ही यांची नीतिमत्ता! ( पडद्यांत शब्द होतो—अहो कुमार! अहो कुमार! तुम्ही आहां कुठे? तुम्ही हें आरंभलें आहे काय? थांबा! अंमळ थांबा! ) हे आले पुन्हां कंकराव! आज यानें माझी पाठच घेतली आहे! ( कंक येतो. )

कंक०:—अहो कुमार, तुम्ही मला कुठे सांपडाना म्हणून क्रीडाशैलावर चढून सभोंवतीं पाहिलं तों तुमची आणि कोणा गांवढळ माणसाची लढाई जुंपलेली दृष्टीस पडली. मग मी घाबरून आता काय होतें, काय न होतें, असा विचार करीत तुमच्या रक्षणाकरितां धांवतच आलों! कुठे आहे तो भुरटा?

माधव०:—तो भुरटा नाहीं. तो या देशांतला एक फार प्रसिद्ध मनुष्य आहे.

कंक०:—असा कोण बुवा हा प्रसिद्ध मनुष्य?

माध०:— त्याचें नांव जालंदर धनुर्धर!

कंक०:—( घाबरून खालीं बसतो. ) अरे बापरे! जालंदर धनुर्धर! आतां कापणार तो माझी मान! त्याला कुठची करुणा येणार?

माध०:—अहो उगीच कां घाबरतां? मीं त्याचा पराजय करून त्याला पळवून सुद्धां लावलें आतां कशाला तो इथे येईल?

कंक०:—पळालाना? बरें आलें. बाकी मी त्याला भितों अशांतला प्रकार नाहीं! पण कुमार, असल्या लढाया बिढाया करायच्या फंदांत तुम्ही पडतां हें फार गैर करतां! अहो, आपण इथे आलों कशाला, आणि करतों काय, याचें कांहीं तरी भान असायचें होतें!

बरें, झालें तें झालें. दैवानेंच वेळ बचावली. चला आतां लौकर भोजनाला ! माझा जठराग्नि अगदीं प्रदीप्त झाला आहे.

**माध०:**–कंकराव, तुमच्या जठराग्नीला आहुति देण्याच्या आधीं अतिशय जलदीनें माझें एक काम करा. नर्मविलास मंदिरांत जाऊन मदयंतीला कळवा कीं, मी खुशाल आहें. जालंदर युद्धांत पराजित होऊन पळून गेला.

**कंक०:**–हा निरोप प्रभावतीला सांगायचा कीं मदयंतीला ?

**माध०:**–मदयंतीला. ( जातो. )

**कंक०:**–माझें नडलें असेल इतक्या तांतडीनें जाऊन त्या भिकारड्या मदयंतीला सागायला ! मी हें प्रभावती राजकन्येलाच जाऊन सांगणार. त्या मदयंतीचें मला तोंडसुद्धां पहायला नको ! पण ही तसबीर कुणाची इथे पडली आहे ? [ तसबीर पाहून ] वा ! वा ! उज्जनीहून निघतांना मीं जसें भाकित केलें होतें तसेंच घडायचा योग अगदीं जवळ आलेला दिसतो प्रभावतीनें ही कुमाराची आणि आपली तसबीर एकत्र काढली आहे. एकुण आमच्या कुमारावर ही राजकन्या अगदीं खूष होऊन गेली आहे ! ( चपला येते. )

**चप०:**–( स्वगत ) कुमार माधवांचें आणि एका गवळ्याचें युद्ध सुरू झाल्याची बातमी मदयंतीनें कळवल्यावरून ताईसाहेब फार घाबरल्या, आणि त्यांनीं मला इथे बातमीसाठीं पाठवलें. पण इथे पहावें तों कुमार नाहीं, गवळी नाहीं, लढाई नाहीं, नी कांहींच नाहीं ! नाहीं म्हणायला कुणाचीशी तसबीर हातांत घेऊन न्याहाळीत हा कंक इथे उभा आहे. यालाच विचारूं या. ( उघड ) कंकराव, कुमार कुठे आहेत ?

**कंक०:**–कुमार निघून गेले भोजनाला.

**चप०:**–( स्वगत ) एकूण कुमार खुशाल आहेत. आत्तां माझा जीव थंड झाला. ( उघड ) ती तसबीर कुणाची पहातां ?

**कंक०:**–( डौलानें ) चल! रिकामटेकड्या पोरींना यांतलें काय सांगायचें आहे! हा विषय आहे मोहरांचा आणि मोत्यांच्या कंठ्याचा! तुला काय यांतलें सांगायचें आहे?

**चप०:**–तर मग सांगाच मला ती तसबीर कुणाची ती.

**कंक०:**–तुझ्या मदयंतीला मी सांगतच होतों कीं हा कुमार कधीं तुला प्राप्त व्हायचा नाहीं. माझें म्हणणें खरें झालें कीं नाहीं? प्रभावतीनें घेतला कीं नाहीं तो वश करून?

**चप०:**–छे! छे! खोटी गोष्ट!

**कंक०:**–खोटी गोष्ट म्हणतेस? पहा तर मग ही तसबीर.

**चप०:**–( तसबीर पाहून ) ही तसबीर कुणीं काढली?

**कंक०:**–( डोळे मिचकावून ) कुणी म्हणजे? कुमारांनीं!

**चप०:**–छे छे! पुन्हां खोटेंच बोलतां. ही तसबीर कुणी काढली हें हा मुकुटच सांगतो आहे ( शिलातलावरचा मुकुट घेते.)

**कंक०:**–राजकन्येनें काढली हेंच ना तुझें म्हणणें! मग त्यांत काय गैर झालें? पहा पहा कुमारांच्या शेजारीं बसलेली ती किती सुंदर दिसते आहे ती! राजतेज तें राजतेज! नाहीं तर तुझी ती हिडिस कंजारीण मदयंती!

**चप०:**–कंकराव, त्या दिवशीं तुम्हीं माझ्या सखीची निंदा केलीत आणि मग प्रभाकर महाराजांनीं तुमचें काय केलें तें आठवतें आहे ना? माझ्यापाशीं तिची पुन्हां निंदा कराल तर तसाच कांहीं तरी प्रसंग तुमच्यावर ओढवेल बरें!

**कंक०:**–अग जा! मोठी भय दाखवणारी आली आहे! ही तसबीर मीं आत्तां वाड्यांत जाऊन राणीसाहेबांना दाखवणार, आणि त्यांच्यापासून कांहीं तरी मोठें बक्षीस उपटणार!

चप०:–( स्वगत ) मेल्या, इतकेंही तूं खचित करशील, आणि मग ताईसाहेबांचें कपट उघडकीला येऊन त्यांची फजीति होईल. पण मी ती तसबीर तुझ्या हातांत ठवतेंच आहें कुठ ? ( कंकाच्या हातांतून तसबीर हिसकावून घेऊन पळूं लागते. )

कंक०:–अग थांब. थांब. ती तसबीर दे आणि जा पाहिजे तिकडे !

चप०:–( पळत ) ही मी आधीं माझ्या सखीला दाखवणार आणि मग तुम्हाला देणार.

कंक०:–( स्वगत ) असो. तेंही बरेंच आहे. ही तसबीर पाहिल्यावर मदयंतीचा भ्रम दूर होईल, आणि ती कुमाराचा नाद सोडील. ( उघड ) अग थांब. मीही तिकडेच येतों आहें. तूं पुढें जातेच आहेस तर माझें एवढें काम कर.

चप०:–सांगा काय तें.

कंक०:–नर्मविलास मंदिरांत जाऊन ताईसाहेबांना सांग कीं, कुमार खुशाल आहेत. तो जालंदर धनुर्धर पराजित होऊन पळून गेला. कुणी कांहीं काळजी करूं नका. एवढें सांग.

चप०:– तुह्मी काय म्हणतां तें मीं चांगलेंसें ऐकलें नाहीं. जवळ येऊन सांगा. ( पळूं लागते. )

कंक०:–वाऱ्यासारखी पळते आहेस, आणि जवळ येऊं कसा ? तुझ्याबरोबर मला कुठे पळवतें ? बरें. जितकें जसें ऐकलें असशील तितकें तसेंच जाऊन सांग. तों मी आलोंच मागोमाग.

चप०:–या, या तर. लौकर या. याल ते मागच्या चौकांतच या. ताईसाहेब तिथेंच आहेत. ( जातात. )

## प्रवेश २ सीन १.

**स्थळ**—नर्मविलास मंदिर.

( चपला धांवत येते. प्रभावती तिला सामोरी जाते. )

**प्रभा०**:–( घाबरून ) अग चपले, धांवतेस कां ? तुला पाठ-वलें त्याचें काय झालें ?

**चप०**:–( धापा टाकीत ) काळजी करण्याजोगें कांहीं नाहीं. कुमार माधव आणि जालंदर यांची लढाई होऊन जालंदराचा पराजय झाल्यामुळें तो पळून गेला. कुमार खुशाल आहेत. त्यांना कांहीं इजा झालेली नाहीं.

**प्रभा०**:–( हर्षानें ) कुमारांनीं जालंदराचासुद्धां पराभव केला ना ! असे हे सिंहासारखे शूर ! काय बाई यांचा विलक्षण पराक्रम ! चपले, तूं हें वर्तमान सांगितल्यामुळें माझा आनंद गगनांत मावे-नासा झाला आहे.

**चप०**:—ताईसाहेब, आपल्या या आनंदाला विरजण घालणें माझ्या जिवावर येतें. पण मी तरी काय करूं ? हें पहा काय तें ! ( तसबीर व मुकुट प्रभावतीच्या हातांत देते. )

**प्रभा०**:–( तसबीर पाहून ) हाय हाय रे देवा ! घात झाला !

**चप०**:—घातबीत अजून कांहीं झालेला नाहीं पण पहा हे तुमच्या लाडक्या सखीचे चाळे कोणच्या थराला गेले आहेत तें ! हा मुकुट तिला दिलात म्हणून ही तसबीर निघाली बरें ! तरी मी सांगतच होतें. ( कंकाकडे पाहून ) आला हा मेला थेरडा ! आतां आपण खोलींत जाऊन स्वस्थपणें तसबीर पहा. याबद्दल मग बोलूं. आधीं मला या कंकाची थोडीशी गंमत करावीशी वाटते ती करूं दे ! ( जातात. )

## सीन २.

( कंक येतो. )

**कंक०:**—आलों एकदांचा नर्मविलास मंदिरापर्यंत. म्हातारपण आणि हें पळायचें काम ! दोन्ही जमणार कशीं ? पण चपलेनें पुढे जाऊन सारें सांगितलेंच आहे, त्यामुळें यायला अंमळ उशीर लागला तरी त्यांत कांहीं बिघडलें नाहीं. आतां प्रथम राजकन्येची गांठ घ्यावी

( पडद्यांत चपला ओरडते. " धांवा हो धांवा ! कुमारमाधवांच्या उरावर जालंदर बसला आहे आणि तो त्यांची मान कापतो आहे. कोणी सोडवा हो कुमारांना ! ) ( त्रासून ) काय शिंची ही कारटी भलतेंच सांगते आहे ! आतां करावें तरी काय हिला ! ( ओरडून ) अग चपले, तसें नव्हे. तसें नव्हे. हें तूं भलतेंच काय ओरडत सुटली आहेस ? ( चपला पुनः पडद्यांत ओरडते. " अहो धांवा हो धांवा ! कुमारमाधवांच्या उरावर जालंदर बसला आहे आणि तो त्यांची मान कापतो आहे. कोणी सोडवा हो कुमारांना ! हेंच वर्तमान सांगायला इथे कंकराव आले आहेत त्यांना विचारा म्हणजे ते जालंदराला दाखवून देतील धांवा ! " पडद्यांत गडबड व धांवाधांव होते. आचारी पोळपाट, लाटणें. पळा, झारा वगैरे आयुधें घेऊन येतात. )

**प० आचारी:**—( पळा फिरवून कंकास ) कुठे आहे जालंदर ! आत्तां त्याचा संहार करतों !

**कंक०:**—अहो नाहीं, नाहीं जालंदरानें कांहीं केलें नाहीं.

**दु० आचारी:**—आम्ही आहोंत तोंपर्यंत कुमारांना काय भय आहे ? चेष्टा नाहीं लागल्या इथे ! कुमारमाधव सरकारचे पाहुणे आहेत. आणि पाहुण्यांचें रक्षण करणें हें आमचें ब्रीद आहे.

**प० आचारी:**—अरे, हाच हाच जालंदर !

**दु० आचारी:**—खरें रे खरें ! जालंदर मोठा सोंगाड्या आहे म्हणतात. म्हाताऱ्याचें सोंग घेऊन आलेला हाच तो !

**प० आचारी:**—तर मग घाल याला या पोळपाटावर !

**कंक०:**—( आश्चर्यानें व भीतीनें ) काय ? मला या पोळपाटावर घालणार ?

**दु० आचारी:**—अरे हो ! या लाटण्यानं तुला लाटून टाकतों. तूं काय समजला आहेस ?

**प० आचारी:**—पण आधीं या मोगरीनें गुलामा, तुला तिंबून तिंबून मऊ केला पाहिजे.

**दु० आचारी:**—( आवेशानें ) मऊ केला पाहिजे !

**प० आचारी:**—( ऐटीनें ) अरे दुष्टा जालंदरा, या स्थानाच्या ठायीं किमर्थ प्राप्त झाला आहेस ?

**दु० आचारी:**—(लाटणं उगारून ) किमर्थ प्राप्त झाला आहेस ?

**कंक०:**—( स्वगत ) लेकाचे भांग पिऊन अगदीं तर्र झालेले दिसताहेत. यांच्या हातून आज धडपणें सुटलों म्हणजे मिळवली ! (उघड) अहो माझें ऐकून तरी घ्याल ?

**प० आचारी:**—आम्ही तुझें कांहीं एक ऐकत नाहीं. तूं जालंदराची रदबदली मुळींच करूं नकोस. आम्हीं त्याची फार दिवस गय केली, पण आज आम्हांला जालंदर जिवंत ठेवायचा नाहीं. चल ! जालंदर कुठे आहे तो दाखव ! ( आचारी कंकाची ओढाओढ करतात ]

**कंक०:**—अहो, जालंदरानें कांहीं केलें नाहीं. त्या कारटीनें चहूंकडे आग लावली त्याला मी काय करूं ? मला ताईसाहेबांकडे

घेऊन चला म्हणजे गर्व उलगडा करतों. ( पडद्यांत चपला ओरडते, " कुमारांची मान कापतो आहे हो जालंदर ! आतां काय करूं ? बाहेर कंकराव आले आहेत ते सांगताहेत हो ! ते कसें खोटें सांगतील ? आतां काय करूं ?" )

( पाणक्या मोठी घागर घेऊन येतो. )

**पाणक्याः**—कुठे आहे, कुठे आहे जालंदर ? ही घागर त्याच्या टाळक्यांत घालून त्याचा कपाळमोक्ष करतों ! हाच वाटतें तो ! अरे दुष्टा, थांब. नीट उभा रहा. ( घागर उगारतो. )

**कंक०:**—( अतिशय घाबरून )अरे बापरे ! अरे, अरे, जरा थांब. मी सांगतों तें ऐकून तरी घ! ( पडद्यांत चपला ओरडते " अहो धांवा हो धांवा, जालंदरानें कुमाराची मान कापली तरी स्वस्थ कसे बसलांत ! धांवा हो धांवा ! ) हात् कारटे ! अरे कुणी तिच्या तोंडांत बोळा घालारे ! ( कामाठी झाडणी फिरवीत येतात. )

**प० कामाठीः**—अरे बाबे ! हा जालंदर म्हणजे कोण आहे ? त्याला मी केराप्रमाणें समजतां !

**कंक०:**—कुठून मी या खुळ्यांच्या चावडींत सांपडलों आहें कुणाला ठाऊक ! अहो, सारें ऐकून तरी घ्या ! कुमारानें जालंदराला पिटाळून लावलें.

**दु० कामाठीः**—(आवेशानें)काय ? जालंदरानें कुमाराला कवटाळून धरलें ? आतां सोडवतों कुमाराला ! चल, हो पुढें. जालंदर म्हणजे कोणच्या झाडाचा पाला !

**प० कामाठीः**—आणि झाडाचा पाला असला तरी त्याला अस्सा उडवून देतों. चल ! ( झाडणी उडवून कंकास पुढें ओढतो. )

**कंक०:**—( त्रासून ) मरा शिंच्यांनो ! तुम्ही जर माझें ऐकूनच घेत नाहीं तर करायचें काय ? ( चपला पडद्यांत ओरडते, " अहो

धांवा हो धांवा ! जालंदरानें कुमाराची मान कापली हो ! अजून स्वस्थ कसे बसलांत ? " ) अरे त्या कारटीला कुणी विहिरींत तरी बुडवा ! ( कुळंबिणी मुसळें घेऊन येतात. )

प० कुळं०:-कुठें आहे ग मेला जालंदर ?

दु० कुळं०:—त्याला मुसळांनीं ठेचून मारूं या !

प० कुळं०:—काय बाई मेल्याचा सुळसुळाट !

कंक०:—पहा ! पहा हा पिशाचांचा घोळका कसा माझ्या राशीला लागला आहे तो ! जालंदर खरोखरीच यांना भेटला आणि जरी त्यानें नुसता फुंकर टाकला तरी सुद्धां हीं गरीबें मरून जातील ! पण रांडेच्यांची सारी वीरश्री उतू आली आहे ती माझ्या बोकांडीला बसण्यापुरती ! ( उघड ) अहो, मी काय म्हणतों तें कृपा करून ऐकून घ्याल काय ?

प० कुळं०:-(आवेशानें) ऐकत नाहीं नी कांहीं नाहीं. तिकडे जालंदर कुमाराचा गळा कापतो आहे आणि म्हणे याचें रडगाणें ऐकत बसा ! कुठें आहे जालंदर ? दाखव. ऊठ ( त्याला मुसळांनीं टोंसतात. )

कंक०:—आतां आली मरायची वेळ ! अग मुसळवाल्यांनों, मला बोलूं तरी देणार कीं नाहीं ?

प० कुळं०:-अगदीं बोलूं देणार नाहीं ! चल, ऊठ ! कुठें आहे जालंदर तो दाखव ! त्याला आम्ही आज मुसळांनीं मारणार !

कंक०:—पण बळरामदादाच्या थोरल्या आक्कांनो, जालंदर कुमाराचा गळा कापतो हें तुम्हाला सांगितलें कुणी ?

सर्व जण:—कुणी सांगितलं म्हणजे ? चपलेनें सांगितलं.



कं.क—पहा हा पिशाचांचा घोळका कसा माझ्या राशीला लागला आहे तो ! ( पृ० ७४ )

**कंक०:**– ती आहे लुच्ची टवळी ! अवलादीची अवदसा आणि अवदसेची अवलाद ! तिचें काय तुम्ही खरें मानतां ? आतां मी सांगतों हें सर्वजण ऐका हो ऐका ! जालंदर पराजित होऊन पळून गेला. कुमार माधव खुशाल आहेत.

**प० आचार्य:**–( खेदानें ) अरेरे ! काय करावें ! आज जहागीर मिळवायची संधि गेली ! ( कंकाच्या अंगावर खेंकसून ) मग हें पहिल्यानेंच कां नाहीं बोललास ? माझा तिकडे भात करपला असेल ! कढी उतू गेली असेल ! ( जातो. )

**कंक०:**–अहो, प्रभावतीताईसाहेब कुठे आहेत ?

**दु० आचार्य:**–जा शोधीत ! माझ्या तिकडे पोळ्या करपल्या असतीलना ? ( तो व बाकीची सर्व मंडळी चरफडत घाईघाईनें निघून जातात. )

( पडद्यांत चपला ओरडते, " अहो धांवाहो धांवा ! जालंदरानें कुमाराचा गळा कापला म्हणून कंकराव सांगताहेत हो ! )

( मदयंती येते. )

**मद०:**–(रडत) कंकराव, काय हो आज माझ्यावर हा कठीण प्रसंग गुदरला !

**कंक०:**–( तिला रडतांना पाहून ओक्साबोक्सीं रडूं लागतो. ) ताईसाहेब, कायहो हा माझ्यावर प्रसंग गुदरला !

**मद०:**–( स्फुंदत ) तो दुष्ट जालंदर—

**कंक०:**–( स्फुंदत ) केव्हांच पळून गेला !

**मद०:**–( रडें आंवरून आश्चर्यानें ) काय ? जालंदर पळून गेला ? मग तुम्ही कां रडतां ?

**कंक०:**–( रडें आंवरून ) आपण कां रडतां ?

मद०:—चपलेनें भलभलतें ओरडायला सुरुवात केली म्हणून मला रडें आंवरेना !

कंक०:—आणि आपण रडूं लागल्यावर मी कसं स्वस्थ बसायचं बरं ? सांगा, आपणच सांगा ! आपण रडूं लागलां म्हणून मीही रडूं लागलों ! आम्हां दरबारी लोकांचा सांप्रदाय असा आहे कीं, राजे लोकांच्या तोंडावर किंचित् हास्य दिसलें कीं, आम्हीं जोरजोरानें खो खो खो हंसत असतों, आणि त्यांची किंचित् सचित मुद्रा दिसल्याबरोबर आम्हीं ओक्साबोक्सीं रडत असतों.

मद०:—( हंसत ) एकूण तुम्ही दरबारी लोक फारच कोंवळ्या मनाचे आहां म्हणायचे ?

कंक०:—( विस्मयानें ) कोंवळ्या मनाचे ? आह्मी मुत्सद्दी लोक कोंवळ्या मनाचे ? करा ताईसाहेब, आमची थट्टा करतां तर करा बापडी ! अहो, यांत मनाचा काय संबंध आहे ? हें नुसतें सुख-दुःखाचें पोकळ प्रदर्शन आहे पोकळ प्रदर्शन ! अगदीं कोरडें ठणठणीत प्रदर्शन ! अशीं वेळीं अवेळीं प्रदर्शनें करून दाखवण्याचा आम्हां मुत्सद्दी लोकांचा सांप्रदाय सनातन आहे.

मद०:—( हंसत ) बरं. राहूं दे तुमचा तो सांप्रदाय. आधीं मला सांगा. कुमार खुशाल आहेत ना ? काय काय ती सगळी हकीकत सांगा. कुमारांची आणि जालंदराची लढाई सुरू झाली होती तिचें काय झालें ?

कंक०:—तिचें काय व्हायचें ? कुमार महापराक्रमी ! केवळ रुद्राचा अवतार ! त्यांचा प्रताप सहन न झाल्यामुळें तो दरवडेखोर पळून गेला.

मद०:—( स्वगत ) एकूण हा सांगतो यावरून पाहिलें तर जालंदरानें माझी गुप्त गोष्ट कांहीं कुमाराला कळवल्याचें दिसत नाहीं.

एवढें एक बरें झालें. ( उघड ) कंकराव, फार चांगलें वर्तमान तुम्हीं सांगितलेंत आतां उन्हाचे कशाला घरीं जातां ? आतां इथेंच भोजन करा.

**कंक०:**—नाहीं नाहीं. कुमार माझी वाट पहात असतील ना ? मला निरोप द्या.

**मद०:**—बरें तर. ( जात. )

( पडद्यांतून " धांवा हो धांवा. जालंदर कुमार माधवांचा गळा दाबतो आहे हो ! " असें ओरडत चपला येते. )

**कंक०:**—( तिला पकडून ) भली सांपडलीस ! तुझाच गळा कुणी तरी आधीं दाबला पाहिजे ! आगलावी कुठची ! चल. ताई-साहेबांकडे आतां चल

**चप०:**—कंकराव, माझ्यावर कां बरें उगीच रागावतां ? तुम्हीं मला काय सांगितलेंत तें मला चांगलेंसें ऐकूं आलें नाहीं म्हणून मी त्याच वेळीं बोललें होतें. तुम्ही म्हणालांत जसें ऐकलें असशील तसेंच सांग. मला जसें ऐकूं आलें होतें तसें मीं सांगितलें. यांत काय बरें माझा अन्याय कंकणराव ? ( हात हिसकावून पळून जाते. )

**कंक०:**—( कांहीं पावलें पाठलाग करून ) जाऊं दे शिंची !

( जातो. )

## प्रवेश ३.

—:०:—

स्थळः—नर्मविलास मंदिर. प्रभावतीचा महाल.

( मदयंती व प्रभावती येतात. )

**मद०:**—ताईसाहेब, या आठ दिवसांत माझ्याविषयीं आपलें मन अगदीं बदललेलें दिसतें. माझ्या हातून काय चूक झाली हें मला सांगितल्याखेरीज कसें बरें कळेल? माझी वागणूक कुठे चुकते आहे हें मला दाखवून दिलें म्हणजे मी आपल्या मनाप्रमाणें वागण्याचा यत्न करीन. आपण मला फारच अवघड कामगिरी सांगितली, आणि ती केवळ आपला हेतु सिद्धीस जावा म्हणून मैत्रीकरितां मीं कबूल केली. ती कामगिरी तर मी नीट बजावतें आहें ना?

**प्रभा०:**—होय ग बाई! माझी कामगिरी तूं इतक्या शिताफीनें बजावूं लागली आहेस कीं कुमारांशीं माझें लग्न व्हावें ही मी आशा सुद्धां याउपर बाळगायला नको!

**मद०:**—असें आपण निराश होण्याजोगें काय बरें मीं केलें?

**प्रभा०:**—( रागानें ) तूं काय केलें आहेस हें समजून उमजून मला बोलायला लावतेस का? कुमारांसमोर तूं काय काय चेष्टा करीत असतेस आणि त्यांच्याशीं कशी लाडीगोडीनें वागत असतेस, हें एकदां सोडून दहादां मीं पाहिलें आहे. आणखी पुन्हां विचारते मीं काय केलें आहे म्हणून!

**मद०:**—हे काय? आपण जें सोंग मला दिलें त्याची वतावणी कशी तरी नको का मला करायला? कुमार माधव आपणाला उज्जनीहून मुद्दाम पाहण्याकरितां इथे आले. आणि आपलें नांव घेऊन आपल्या जाग्यावर असणारी मी, जर त्या कुमारांसमोर एखाद्या

वेडसर मुलीप्रमाणें हिरमुसलें तोंड करून बसलें. अथवा जर कठोरपणाचे किंवा उद्दामपणाचे शब्द विनाकारण मी त्यांच्याशीं बोलूं लागलें, तर त्यांत दुर्लौकिक होईल कोणाचा ? आतां बोलून चालून सांगच तें. त्याची बतावणी करतांना एखादे वेळीं मर्यादा आलांडून पुढें पाऊल पडणें माणसाच्या हातून होतेंच आहे. माझ्याही हातून झालें नसेल असें मी म्हणत नाहीं. म्हणूनच मघांशीं म्हटलें, कीं माझें कुठे चुकतें आहे तें आपण मला दाखवायला पाहिजे.

**प्रभा०:**—तुझ्या या मायावी भाषणानें मीं कधींही फसणार नाहीं. कुमार माझ्या हातीं कधींही लागूं नयेत हीच तुझी इच्छा ! त्यांची पट्टराणी व्हायची वासना तूंच धरली आहेस. आणि म्हणूनच नानाप्रकारच्या युक्ती लढवून त्यांना वश करून घेतलेंस ! मैत्रीला चांगली जागलीस बरें ! तुझ्या या गोऱ्यागोमटया दगलबाज चेहऱ्याला भुलून तुला अनन्यभावानें प्रेम अर्पण करणाऱ्या तुझ्या नवऱ्याला—त्या धर्मनिधीला—चांगली शिक्षा केलीस ! कुबेरदत्ताच्या कुळांत तूं अशी कुलांगार कारटी निपजलीस आणि त्याच्या कुळाचा उद्धार केलास बाई !

**मद०:**—( कांकुळतीनें ) नको हो ताईसाहेब अशी माझ्यावर आग पाखडूं ! कोणी टवळीनें आपली अशी समजूत केली आहे कुणाला ठाऊक !

## पद.

राग—मांड. ताल—केरवा.

**काय अपराध न जाणें कैसा जाहला ॥**
**बहु जागलें भागलें मन माझें सेवाया**
**भावें या पावलां ॥ ध्रु० ॥**

ओपिला भरंवसा म्हणा अचल तसा मीं राखिला ।
प्रणयाचि असला भुवनीं सांगा कोणीं पाहिला ॥ २८ ॥

( रडूं लागते. )

**प्रभा०:**—पुरे कर हा तुझा कांगावा !

## पद.

राग—मांड. ताल—केरवा.

काय अपराध तुझा गे कसा जाहला ॥
बहु जागलें भागलें मन माझें यश
मोठें आलें या पावलां ॥ ध्रु० ॥
ओपिला करिं गळा चिरिला प्रणय तसा तूं राखिला ॥
प्रणयाचि असला भुवनीं नाहीं कोणी पाहिला ॥ २९ ॥

मी अगदीं सरळ सरळ वागणारी बायको आहें. माझ्या प्रश्नाला तूं सरळ उत्तर दिलें पाहिजेस.

**मद०:**—विचारा तर काय तें !

**प्रभा०:**—पहिल्याच भेटींत तूं कुमारांच्या अंगावर फुलांचा पोषाख स्वत: काय म्हणून घालीत होतीस ? अनोळखी परक्या माणसाला पाहिल्याबरोबर त्याच्या गळ्यांत माळ घालण्याइतकी प्रभावती मूर्ख आहे असा का तुला माझा लौकिक करून दाखवायचा होता ? फाजील कुठची !

**मद०:**—हें काय ? पोषाख घालायला जर तिथे दुसरें कोणीच नव्हतें, तर कुमारांना तसेंच का परत लावून द्यायचें ? तसें केलें असतें तर प्रभावतीनें माझा अपमान केला असें नसतें का त्यांनीं म्हटलें ?

**प्रभा०:**—पण तिथे दुसरं कोणी नव्हतें म्हणतेस, तर कामदेवांच्या पूजेच्या निमित्तानें तूं आम्हांला आधीं घालवूनच कां दिलेंस?

**मद०:**—न देऊं तर काय करूं? कुमारांना पाहिल्याबरोबर आपली जी स्थिति झाली, ती त्यांनीं पाहिली असती तर तें ठीक झालें नसतें; म्हणून मला तसें करावें लागलें.

**प्रभा०:**—बरीच कीं ग तूं प्रत्येक गोष्टीची संपादणी करायला शिकली आहेस! हे लाखों रुपये किंमतीचे जवाहिराचे दागिने अंगावर घालायला कुठून आणलेस?

**मद०:**—( स्वगत ) आतां काय सांगूं हिला? जालंदरानें दिले असें कसें सांगूं? ( उघड ) हे दागिने मला माझ्या प्रियकरानें दिले आहेत.

**प्रभा०:**—पण त्या प्रियकराचें नांव सांगशील कीं नाहीं? तुझा नवरा धर्मनिधि कितीही श्रीमंत असला, तरी असले दागिने तुला देण्याइतकी कांहीं त्याची ऐपत नाहीं हें खास. तर मग सांग आतां हे दागिने कुठून आणलेस ते?

**मद०:**—माझ्या प्रियकरानें हे दागिने मला दिले आहेत एवढें खरें आहे. ( लज्जेचा आविर्भाव करून ) त्यांचें नांव मी कसें सांगूं?

**प्रभा०:**—कसें सांगशील? तूं सांगितलें नाहींस तरी तें मला ठाऊक आहे. हे राजे लोकांच्या घरचे दागिने आहेत. हे कुमार माधवानींच तुला दिले असले पाहिजेत. आपण कोण आहों ही ओळख तूं त्यांना दिलीस आणि दागिने मागितलेस. त्यांना काय उशीर? त्यांनीं गरीबाची मुलगी दिली पट्टराणी सजवून नी दुसरें काय? तूं आणि ते गुलगुल गोष्टी करीत आज सकाळीं जाईच्या मंडपांत बसलां होतां तेव्हां हे दागिने त्यांनीं तुझ्या अंगावर घातले असतील. ( उपरोधिक स्वरानें ) हे दागिने घालतांना तुम्हां दोघां-

त्या प्रेमाला अगदीं ऊत आला असेल नाहीं बरें ? तो दरवडेखोर जालंदर तुझ्या दागिन्यांच्या अभिलाषानें तिथे आला नसता तर आणखी काय काय झालें असतें कुणाला ठाऊक ?

**मद०:**—( स्वगत ) आतां हिला काय उलगडून सांगूं कपाळ ! ( उघड ) ताईसाहेब, आपली ही अगदीं खोटी समजूत झालेली आहे.

**प्रभा०:**—( रागानें लाल होऊन ) खोटी समजूत म्हणतेस ? रहा तर मग हें काय तें ! घे तुझ्या बेइमानीचें माप पदरांत ! ( तिच्या हातांत तसबीर देते. )

**मद०:**—( गांगरल्याचा आविर्भाव करून ) ताईसाहेब, ही तसबीर मी कांहीं एकटींनें नाहीं काढली !

**प्रभा०:**—हो. हो. तूं एकटीनें ही तसबीर काढली नाहींस हें दिसतेंच आहे. तूं त्यांची आणि त्यांनीं तुझी, असेंच कीं नाहीं ? चांडाळणी, न कळत माझ्या छातींत खंजीर खुपसलास ! माझ्या प्रेमांत विष कालवलेंस ! पण यापासन तुझें कध्धीं कध्धीं कल्याण होणार नाहीं !

## पद.

राग:—परज. ताल—त्रिवट.

कपट करुनि घडविसि प्रेम-भंग।
सुख पर-नर-संगमीं गणिसी ॥
मळविसि अमळिन निज-कुल कुलटे ॥ ध्रु० ॥
हृदय-ताप वदवि शाप। सुख पापे तुज
ना मिळे। नरक-गति तव कृति
तुजवरि उलट ॥ ३० ॥

( जाते. )

मद०:—अशी हिची समजूत झाली हें फार चांगलें झालें. आतां कुमाराचें आणि हिचें रहस्य कधींही होण्याची भीति उरली नाहीं. ही सवत एकदांची टळलीच म्हणायची ! आतां हा कुमार माझ्या हातून कसा निसटतो तें पहातें ! ( जाते )

---

अंक तिसरा समाप्त.

# अंक ४.

## प्रवेश १.

स्थळः—आमोदसुंदर उद्यान.

( माधव येतो. )

**माधव०**:-आज दोन दिवस मदयंतीच्या मनांत कशामुळें विकल्प उत्पन्न झाला आहे, कांहीं कळत नाहीं !

### पद.

**राग**—खमाज. ताल पंजाबी.

**गमे वामा दयिता—मनाची गति**
**चंचला ॥ ध्रु० ॥**
**परिहरी मजला न बोले बाला । मावळली**
**प्रांजल लीला ॥ ३१ ॥**

तिच्या मनांत काय शल्य आहे तें दूर व्हावें, तिनें माझ्याशीं पूर्वीप्रमाणें प्रेमळपणानें वागावें, बोलावें, बसावें, या गोष्टी कशा घडून येतील याच विवंचनेंत मी चूर आहें. ( प्रभावतीस येतांना पाहून) आणि ही माझी विवंचना दूर करण्यासाठींच जणू काय, माझ्या मनोरथाची ही कल्पलता इथे अकस्मात् प्रकट झाली ! ( जवळ जाऊन ) प्राणसखे, मेघमाला अंतरिक्षांत आविर्भूत झाली म्हणजे चातकाला जसा आनंद होतो, तसाच तुझ्या या अकल्पित दर्शनानें मला आनंद झाला आहे.

**प्रभावती:**—खरेंच का आनंद झाला ? कीं कुठली ही पीडा मला सतावायला आली आहे असें वाटून त्रास होतो आहे ?

**माध०:**—प्रिये, तूं असें उपरोधिक भाषण करून मला दुःख द्यावेंस असा अपराध तर माझ्या हातून झालेला मला स्मरत नाहीं. तथापि न कळत झालाच असेल तर तूं मला त्याबद्दल क्षमा करावीस हें माझें मागणें आहे.

**प्रभा०:**—आपण थोर राजेलोक ! मी एक गरीबाची मुलगी. मीं कांहीं केलें तरी आपली खरी प्रीति मला प्राप्त व्हायची नाहीं, हें वास्तविक मला कळायला पाहिजे होतें; पण भोळ्या स्वभावामुळें तें मला कळलें नाहीं; आणि त्यामुळेंच हें आशाभंगाचें दुःख मला भोगावें लागतें आहें. अपराधी मी आहें. आपला कसला अपराध !

**माध०:**—मदयंती, तुझ्यापेक्षां आवडतें असें या जगात मला कांहींच नाहीं. इतकें असून तूंच मला विनाकारण वाक्ताडन करावेंस हें माझें दुर्दैवच समजलें पाहिजे !

**प्रभा०:**—अशीं मधुर भाषणें करून मला पुन्हां पुन्हां मोहांत घालायची खटपट कां करतां ! आपलें कपट समजून आल्यामुळें आतां माझे डोळे चांगले उघडले आहेत बरें ! कुमार, मन एकीला आणि भाषण दुसरीला, याप्रमाणें हें सोंग आपण आणखी किती दिवस पुढें चालवणार ?

**माधव०:**—जिला मीं मन दिलें आहे तिच्याशींच मीं भाषण करतों आहें.

## पद.

राग—देसकार. ताल त्रिवट.

प्रियतमे बोल फोल मम नोहे ॥
भ्रांति तुला झाली मोहें ॥ ध्रु० ॥

हें भाषण जिला मन तिजला ॥
तेथ अढळ तें राहे ॥ ३१ ॥

**प्रभा०:**—नाहीं कुमार, राजे लोकांनीं खोटें बोलून गरीब भोळ्या मुलींना भुरळ पाडावी यांत काय पुरुषार्थ आहे ? आपलें मन प्रभावती राजकन्येला दिलें आहे, आणि हें मायावी गोड गोड भाषण मात्र माझ्याबरोबर चाललें आहे !

## पद.

राग—भैरवी. ताल त्रिवट.

नृपति-कन्या कां वाटे अनुरूप कांता ॥ ध्रु० ॥
गरिब मी दुबळी बळें। मज शे किं लोटिलें।
वचन तसलें। मजसि दिधलें ॥
उचित गमलें। असें आतां ॥ ३२ ॥

( डोळ्यांत आंसवें आणून ) गरिबींत जर कांहीं दुःख असेल, तर तें हेंच आहे कीं, गरिबांच्या मुली म्हणजे खेळण्या बागडण्याच्या बाहुल्याच आहेत, असें थोर म्हणविणाऱ्या श्रीमंत लोकांना वाटावें ! गरिबाची मुलगी म्हटली म्हणजे तिला शील, स्वाभिमान, सद्वर्तन यांची ओळखच नसते असें आपण समजतां कीं काय ?

**माध०:**—मदयंती, हा तुझा दोषारोप सर्वथैव निराधार आहे. प्रभावतीला मीं मन दिलेलें नाहीं. तिच्या प्रेमापासून मी सर्वथा पराङ्मुख आहें माझा सर्व जीव, माझें सर्व तन, मन, धन तुला वाहिललें आहे तें कायमच आहे. मग भलताच संशय घेऊन कां बरें दुःखी होतेस ? फार काय सांगूं ? माझें मन जागृतावस्थेंत सर्वदा तुझ्या चिंतनांत गुंतलेलें असतेंच, पण निद्रेंतसुद्धां नेहमीं तुझींच गोड स्वप्नें मला पडत असतात.

**प्रभा०:**—[ स्वगत ] यांच्या भाषणांत तर कुठे कपटाचा लेश सुद्धां दिसत नाहीं. पण नाहीं; वेडेपणा पदरीं आला तरी पुरवला,

पण यांना आणखी छेडून खात्री करून घेतली पाहिजे. [ उघड ] आपणाला अशीं स्वप्नें पडतात म्हणतां, पण मला काल एक स्वप्न पडलें तें याच्या अगदीं उलट होतें.

**माध०:**—तुला काय स्वप्न पडलें ?

**प्रभा०:**—मीं स्वप्नांत एक तसबीर पाहिली तींत आपण आणि राजकन्या मोठ्या प्रेमानें एकत्र बसलां आहां आणि परस्परांचें प्रेम सुचविणारें एक गीत सुद्धां त्या तसबिरीखालीं लिहिलेलें आहे. काय बाई गीत तें ! हो. आठवलें. हेंच तें गीत. [ " प्रणयिता फल लाभे हें " इ० पूर्वोक्त पद म्हणते. ]

**माध०:**—हें स्वप्न कसलें !. ही खरीच गोष्ट आहे.

**प्रभा०:**—( रागानें ) एकूण आपणच ती राजकन्येची तसबीर काढली हें खरेंना ?

**माध०:**—हां. तें मात्र खरें नाहीं. कारण मला चित्रें मुळींच काढतां येत नाहींत. माझें म्हणणें तुला खरें वाटत नसेल तर माझ्या परिवारापैकीं पाहिजे त्या माणसाला विचार. सर्वांना ही गोष्ट ठाऊक असेल. जर मला चित्रें काढतां येतीं तर किती बहार झाली असती! तुझी तसबीर काढून तिचें ध्यान करण्यांत मी तल्लीन झालों असतों !

**प्रभा०:**— ती तसबीर आपण काढली नाहीं म्हणतां, तर ती आपल्या दृष्टीस कशी पडली ?

**माध०:**—त्या दिवशीं जाईच्या मंडपांत प्रभावती हातांत ती तसबीर घेऊन पहात बसली होती. इतक्यांत जालंदर तिथे येऊन तिला मारूं लागला जाईच्या लतामंडपांत तूं असशील अशा समजुतीनें मी त्या मंडपाकडे जात असतां तिची आरोळी माझ्या कानावर पडली, त्यावरून तूंच कांहीं संकटांत पडली आहेस

असें समजून तुझ्या रक्षणाकरितां मी धांवून गेलों. पण तिथे पाहतों तों प्रभावती आणि तिला मारूं पहाणारा जालंदर ! मग जालंदराचें मी पारिपत्य करणें ओघानेंच आलें. नंतर—

**प्रभा०:**–( उपरोधिक स्वरानें मध्येंच ) बरोबरच आहे ! एवढे मौल्यवान् दागिने आपण हौसेनें तिला दिले. आणि ते दागिने जर जालंदर बुचाडून घेऊं लागला, तर तें आपणाला कसें पहावेल !

**माध०:**—काय ? मीं दागिने दिले ? काय वेडीबिडी नाहींसना तूं ? ती राजकन्या आहे. तिला दागिन्यांना काय तोटा ? आणि ती दागिने माझ्याजवळ कां मागेल ? आणि मी तरी कुठले देणार? नायकांच्या दागिन्यांचे जोड मी स्वारींत बरोबर बाळगीत असतों अशी का तुझी समजूत आहे ? छे ! छे ! जालंदर प्रभावतीचे दागिने बुचाडून घेण्याकरितां तिला मुळींच मारीत नव्हता. तिच्यावर त्याचा राग होण्याचें कारण ती तसबीरच होय.

**प्रभा०:**—त्या तसबिरीनें जालंदराला राग येण्याचा काय संबंध ?

**माध०:**—तो संबंध सारा तुला ठाऊक आहे. उगीच वेड पांघरूं नकोस !

**प्रभा०:**—नाहीं. मला कांहीं ठाऊक नाहीं.

**माध०:**—तूं राजकन्येची बालपणापासूनची मैत्रीण म्हणवतेस आणि तिच्या चारित्र्यांतल्या या भयंकर गुह्याचा तुला कांहींच सुगावा नसावा ही मोठी अजब गोष्ट आहे !

**प्रभा०:**–( उत्कंठेनें ) कुमार, मला कांहीं माहीत नाहीं. काय तें आपण कृपा करून लवकर सांगावें.

**माध०:**—पण ही गोष्ट कुठेही ओंठाबाहेर न फुटण्याविषयीं वचन देशील तर सांगेन.

**प्रभा०:**—होय. होय. मीं तसें वचन देतें. सांगावें.

**माध०:**—ऐक तर. ही तुझी सखी राजकन्या जालंदर धनुर्धराची बायको आहे ! आणि हें प्रत्यक्ष त्यानेंच मला सांगितलें.

**प्रभा०:**—( आश्चर्यानें व भीतीनें स्वगत ) काय बाई भयंकर गोष्ट ही ! मदयंतीचा नवरा जालंदर असेल हें कोणाच्या स्वप्नांत तरी येईल का ? तरीच कुमारांच्या गळ्यांत मदयंती हार घालूं लागली तेव्हां तें त्याला सहन न होऊन त्यानें रागानें तीर मारला वरें का !

**माध०:**—[ स्वगत ] हिला यांतलें कांहींच माहीत नव्हतें एकूण ! कशी विचारांत गर्क होऊन गेली आहे !

**प्रभा०:**—[ स्वगत ] दागिनेही मदयंतीला जालंदराकडूनच मिळालेले ! माझ्या प्रियकरानें ते मला दिले असें ती म्हणत होती तें खरें तर एकूण ! असले मौल्यवान् अलंकार एक राजानें तरी द्यावे, नाहीं तर चोरानें तरी द्यावे ! तसबिरीचेंही कौटिल्य मदयंतीचेंच असलें पाहिजे.

**माध०:**—कां ? झालाना आतां चित्रवंचनेचा परिहार ?

**प्रभा०:**—( गहिंवरून ) कुमार, मी चांडाळणीनें भलताच संशय घेऊन निष्ठुर भाषणें करून आपला विनाकारण छळ केला याबद्दल या मूर्ख दासीला क्षमा करावी.

**माध०:**—( हंसत ) आतां तरी तुला कोणताही संशय राहिला नाहींना ? तर मग परवां मागितलेलें उत्तर कां देत नाहींस ?

**प्रभा०:**—तें उत्तर मी देईन. पण तें मजकडून घेण्यापूर्वी आपला आपण विचार पाहिला आहे ना ? मी आपल्या म्हणण्याला रुकार देणार तो माझ्या सर्व सख्यांसमक्ष प्रतिद्रूपानें देणार. आणि

तसें झालें म्हणजे तितक्याच प्रसिद्धपणानें आपण माझा अंगीकार केला पाहिजे.

**माध०:**-हें सर्व मी आनंदानें कबूल करतों. मग हा सुप्रसंग केव्हां घडून येणार तें सांग.

**प्रभा०:**—मी म्हणतें हें सारें आज रात्रीं देवासमोर समारंभ होणार आहे त्यावेळीं घडून येईल. पण या गोष्टीचा पुन्हां एकदां आपण विचार करावा. मी गरीबाची मुलगी असून आपण मला पदरीं घेतल्यावर एकपत्नीव्रतानें रहायचें आहे. शिवाय आपल्या या कृत्यानें युगंधर व प्रभाकर हे फार नाखूष होतील. आपल्या बरोबरीच्या राजे लोकांत आपली मानहानि होईल. कदाचित् आपल्या वडिलांना राग आला तर पुढें प्राप्त होणाऱ्या राज्यपदालाही आपण मुकाल. या सर्व गोष्टींचा विचार आपण रात्र होईपर्यंत करावा. आपलें मन फिरलें असल्यास अजूनही मागें सरायला आपल्याला अवसर आहे. आशाभंग झाल्यामुळें माझें एकटीचेंच मन काय विदीर्ण होईल तेवढें पुरे !

**माध०:**—मदयंती, या सर्व गोष्टींचा विचार केल्याखेरीज मी तुझ्या प्रीतीचा अभिलाष केलेला नाहीं व करीतही नाहीं. ( चपला येते. तिला पाहून ) ही पहा तुझी सखी चपला इकडेच आली. ( हंसत ) चपले, तुझी सखी कुठं आडरानांत शिरली होती तिला वाट सांपडली कीं नाहीं हें पहायला आलीस, नाहीं बरें ?

**चप०:** ( प्रभावतीकडे पाहून तिनें मान डोलवल्यावर हसत ) छे ! छे ! कुमार, त्याकरितांच केवळ मी आलें आहें असें नाहीं आपणाला निमंत्रण देण्याकरितां प्रभावतीताईसाहेबांनीं मला पाठवलें आहे.

**माध०:**—कशाचें निमंत्रण ?

**चप०:**—ताईसाहेबांनीं सांगितलें आहे कीं, आज रात्री काम-देवाच्या उत्सवानिमित्त आम्ही सर्व जणी नृत्यगायन करणार आहों. त्यावेळीं आपण येऊन समारंभ साजरा केला पाहिजे येण्याची मर्जी केंव्हां होईल हें कळलें म्हणजे त्याप्रमाणें तयारी ठेवूं.

**माध०:**—बरें आहे. रात्रीच्या बरोबर नऊ घटका वाजल्या म्हणजे मी आधीं सूचना देण्याकरितां कंकरावांना पाठवीन. मागून एक घटकेनें मी येईन. असेंच ना मदयंती ?

**प्रभा०:**—( लाजून हंसत ) यांत मी काय सांगायचें आहे ?

**माध०:**—मीं यावें अशी तुझी आज्ञा असल्यामुळेंच मी येणार.

**प्रभा०:**—आज्ञा कीं प्रार्थना ? बरें आहे. आपण तसेंच म्हणा-यचें तिथे काय उपाय ? ( माधव जातो. )

**चप०:**—ताईसाहेब, कुमारांविषयीं आपण भलभलते कुतर्क काढून किती तारांगण मांडलें होतें ? आतां झालेना सारे संशय दूर ?

**प्रभा०:**—( ओशाळून ) चपले, मीं फारच वेडेपणाचें वर्तन केलें याबद्दल मला पश्चात्ताप होतो तो काय सांगूं ? कुमार अत्यंत उदार मनाचे असल्यामुळें त्यांच्या मनांत हें कांहीं रहायचें नाहीं. पण मी त्यांना विनाकारण दुःख द्यायचें तें दिलेंच !

**चप०:**—पण ताईसाहेब, आजचा समारंभ झाल्याबरोबर आपण कुमारांना ओळख दिल्याखेरीज राहूं नये बरें का ?

**प्रभा०:**—आतां एक दिवसानें काय होतें आहे ? उद्यां देवाचा उत्सव संपतोच आहे. आणि त्याबरोबरच पूर्वसंकल्पाप्रमाणें सोंगाच्या बतावणीची मुदत सरतेच आहे. तूं म्हणतेस त्याप्रमाणें परवां करूं म्हणजे झालं !

चप०:—वा ! हें मोठेंच सांगितलें आपण ! परवां सकाळीं राजवाड्यांतून आपणा सर्वांना नेण्याकरितां स्वारीचा सरंजाम येईल, तऱ्हां अंबारींत कुमारांशेजारीं आपल्यालाच बसलें पाहिजे. मदयंती का बसायची आहे ?

प्रभा०:—तीच तर परवां ओळख देण्यांतली मौज आहे ! मी कोण आहें, हें त्यावेळीं अकस्मात् कळल्यावर कुमारांना किती विस्मय होईल, आणि साऱ्या लोकांना केवढा हर्ष होईल, आणि माझ्या कारस्थानीचें जन विश्व किती कौतुक करील ! आजच ही बातमी फोडल्यावर मग ही मौज पहायला कुठची मिळणार ?

चप०:—केवळ मौजेसाठीं हें सोंग आणखी लांबवावें हें कांहीं माझ्या मनाला येत नाहीं. मदयंती काय करील आणि काय न करील याचें मला अतिशा भय वाटत असतें.

प्रभा०:—( तिरस्कारानें ) वा ! मदयंतीचा मोठाच बाऊ दाखवतेस मला ! ती आणखी मूर्खपणा करील तर आपलेंच हंसें करून घेईल ! दुसरें काय करणार ? मी म्हणतें असेंच करायचें.

चप०:—बरें ! आपली मर्जी ! ( कंकास येतांना पाहून ) ताईसाहेब, तो पहा कंक वावटळीसारखा इकडेच येतो आहे. कांहीं तरी अभद्र बोलून तो आपल्याला दुःख देईल. आपण पुढें निघून जा. मी त्याला थांबवून धरतें.

( प्रभावती जाते तों दुसऱ्या बाजूनें कंक येतो. )

कंक०:—कुठे आहे मदयंती ?

चप०:—ती गेली पुढें. कां ? तिच्यावर कां राग ?

कंक०:—कां राग म्हणून तूं मला विचारतेस ? आपण माझा अंगीकार केला पाहिजे, असें तिनें आतांच कुमारांपाशीं म्हटलेलें

मीं ओझरतें ऐकलें आहे नाहीं ती तसे बोलली ? बाकी आमच्या कुमारांनीं तिला काय सांगायचें तें सांगितलेंच आहे म्हणा !

**चप०:**—त्यांनीं काय सांगितलें ?

**कंक०:**—आमच्या कुमारांनीं तुझ्या मदयंतीला साफ सांगितलें कीं, तुझ्या प्रीतीचा मीं अभिलाष केलेला नाहीं, आणि करीत नाहीं. चल जाव !

**चप०:**—( स्वगत. ) आचरट गेला ! कांहीं तरी ऐकतो आणि कांहीं तरी सांगत सुटतो ! ( उघड ) तिनें किंवा कुमारांनीं एकमेकांना काय पाहिजे तें म्हटलें असेल. पण त्याची पंचाईत करणार तुम्ही कोण ?

**कंक०:**—आम्ही कोण हें तुला ठाऊक नाहीं ? आम्ही दरबारी लोक राज लोकांच्या श्रेष्ठतेचें रक्षण करणारें आहों. राजे व प्रजा यांनीं परस्परांची मर्यादा राखली पाहिजे, याबद्दलचे हमीदार आम्ही मुत्सद्दी लोक आहों. तूं काय समजते आहेस ! आम्ही समाजघटनेच्या मंदिराचे खांब आहोंत खांब !

**चप०:**—तुम्ही खांब असा कीं तुळई असा ! माझ्या सोबतिणीच्या कामांत तुम्ही लुडबुड करूं नये हें चांगलें !

**कंक०:**—वा ! तिचा असला निर्लज्जपणा मीं निमूटपणें सोसावा असें म्हणतेस काय ? तुझी सोबतीण कुमारांना भुलवून त्यांचा घात करणार आहे. लबाड टवळी !

**चप०:**—( हात जोडून ) कंकराव, तोंड आटपा.

**कंक०:**—खालमुंडी चेटकीण !

**चप०:**—( रागानें ) कंकराव ! तोंड आटपा.

**कंक०:**—साखरसोदी !

चपला०:-( धिक्कारानें ) कंकराव ! तोंड आटपा !

कंक०:-कवटाळकुकडी !

चप०:-अहो कंकराव, तुम्हांला किती जागें करावें ? काय गुण असेल तो असो, पण तुम्हीं माझ्या सोबतिणीला वाईट म्हटलेंत म्हणजे तुम्हांवर कांहीं तरी किचाटें येतात; आणि त्यांत तुमची दुर्दशा होते ती पाहून मला भारी वाईट वाटत असतें !

कंक०:-दुसरीं कुठून किचाटें येणार ? तूंच मूर्तिमंत किचाट आहेस ! पण मी तुला डरायचा नाहीं ! मदयंती जर कुमारांचा नाद न सोडील तर तिला अश्शा शिव्या देईन आणि अश्शी छळीन ! ( चरफडत पाय आपटीत जातो. )

चप०:-महाविष्णूनीं पाताळांत दैत्य घातले तेव्हां पृथ्वीवरचे सारे लुडबुडे लोक पकडून त्यांना त्या पाताळाच्या खालच्या पाताळांत कां कोंबून घातले नाहीं हें त्या भगवानालाच ठाऊक ! ( थांबून ) ताईसाहेबांना शिव्या दिल्याबद्दल कंकाला बक्षीस हें दिलेंच पाहिजे. काय बरें बक्षीस योजावें ? ( खदखदां हंसत ) हां. असेंच करावें, आणि त्याला तोंडघशीं पाडावें; म्हणजे त्याला चांगलीच अद्दल घडेल ! लुब्रा मेला ! ( जाते.)

## प्रवेश २.

---:०:---

**स्थळः**–नर्मविलास मंदिर.

( मदनिका, चांद्रिका, सौदामिनी, मंदाकिनी, व मोहिनी वगैरे सख्या बसलेल्या दृष्टीस पडतात. )

**सौदा०:**– काय ग मोहिनी, ताईसाहेबांची मसलत त्यांच्या मनाप्रमाणें तडीला जाऊन कुमारांची प्रीति त्यांनीं संपादन केली; त्याप्रमाणें वधूवरांनीं परस्परांस वरण्याचा समारंभ आज भगवान् कामदेवासमोरच होणार तर !

**मोहि०:**–होय, आणि तो समारंभ पाहून मदयंतीच्या तळपायाची आग मस्तकाला जाईल हो !

**मंदा०:**–तसें झालें तर काय वाईट झालें ? तिनें मूर्खपणा करून ताईसाहेबांना किती ताप दिला बरें ?

**चंद्रि०:**–मला तें पहिल्यापासून ठाऊकच ! ही असले खेळ करायचीच !

**मंदा०:**–ताईसाहेबांचा स्वभाव अगदीं सरळ. त्यांना कुठे हें कळलें होतें ?

**चंद्रि०:**–तिच्यावर त्यांचा अतिशय विश्वास होता, पण आतां पहा त्या विश्वासानें कसा घात होत होता तो !

**मोहि०:**–कुमारांबरोबर माणसें आलीं आहेत तीं मोठ्या आशेनें वाट पहात बसलीं आहेत कीं, कुमारांचें राजकन्येशीं लग्न कधीं ठरतें आहे ! आणि आज त्यांनीं राजकन्येला सोडून मलतीलाच माळ घातलेली पाहून त्यांची फार निराशा होईल नाहीं बरें ?

**मंदा०:**—बाकीच्यांचें राहू दे. पण त्या कंकानें हें पाहिलें म्हणजे त्याचा राग अनावर होऊन मला वाटतें त्याला वायुच होईल !

**सौदा०:**—गडे, आतां नऊ घटका वाजायची वेळ आली. सूचना द्यायला कोणी येणार होतें तें अजून कसें येत नाहीं तें ?

( पडद्यांत शब्द होतो—" अग मुलींनों, कुठे बसल्या आहेत या सगळ्या जणी ! ) आलें वाटतें कोणसें ! ( कंकाचा वेष घेऊन चपला येते तिला पाहून ) कोणसेंसें काय ! हें कंकरावच आले !

**चप०:**—( अंतरावर उभी राहून ) मुलींनों, आज कुमारांची स्वारी कांहीं येत नाहीं. आज नाचणें नाहीं, गाणें नाहीं, नी कांहीं नाहीं. याकरितां तुम्हीं जाऊन निजा आतां चला.

**सौदा०:**—( आश्चर्यानें ) असे कसें होईल ? कुमार येणार म्हणून अगदीं ठरलें आहे. ताईसाहेबांनीं इतक्या मेहनतीनें बसवलेली घडी अशी एकाएकींच कशी विसकटेल ?

**मंदा०:**—( तिला चिमटा काढून ) ताईसाहेबांनीं नव्हे, मदयंतीनें. अहो कंकराव, खरेंच का कुमार येत नाहींत ?

**चप०:**—इश्श बाई ! कितीनुदां पुन्हां पुन्हां सांगायचें तें !

**चंद्रि०:**—अं ! असें काय बायकांसारखें बोलतां हो !

**चप०:**—मी काय बायको का आहें पोरींनों ? मी पुरुश आहें. मी पुरशासारखेंच बोलतें आहें.

**सौदा०:**—पुरशासारखें बोलतें आहें ? अहो पुरुश ! इकडे पुढें या असे ! काय बाई चमत्कार तरी ! ( चपला मागें मागें सरते तों सर्व जणी तिला ओढून पुढें आणितात. )



**सौदामिनी**—पुरुष म्हणत असतात कीं आत्याबाईला मिशा असत्या तर कांका म्हटलें असतें. (पृ० ९७)

**चंद्रि०:**–( चपलेच्या हातांतील काठी हिसकावून घेऊन तिचें पागोटें पाडिते. ) म्हाताऱ्या, इतके दाट काळे कुळकुळीत केंस तुझ्या डोकीवर कुठले रे ?

**सौदा०:**–अग, याच्या अंगावरचा झगा काढा ग ? ( झगा काढतात. ) अहो कंक, तुम्ही लुगडें कधींपासून नेसूं लागलां ?

**चप०:**–नका ग अशी माझी विटंबना करूं ! मी तुमची आपली उगीच चेष्टा केली.

**मोहि०:**–( चपलेची दाढी ओढून ) अहो दाढीवाले बुवा, तुमच्या सोंगाबद्दल हें घ्या तुम्हांला बक्षीस ! ( चापटी मारते. )

**चप०:**–अग मारतां काय म्हणून ? ( मिशा काढूं लागते. )

**सौदा०:**–(तिचे हात धरून) पुरुष म्हणत असतात कीं आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटलें असतें. पण कोणचे पुरुष आमच्या चपळा आत्याला चपळ काका ह्मणणार आहेत तें पहातें आतां ! ( चपला हात हिसकावून घेऊन मिशा काढून फेंकून देते.)

**सर्व जणी:**—कां ग तूं असले खेळ करतेस ? ( चपलेला ओढतात व मारतात. ती आपणाला सोडवून घेते. )

**चप०:**–( जातां जातां ) द्वाडगज मावशांनों, घटकाभर मौज करायला गेलें तर माझी अशी दशा केलीत का ? बरें आहे ! या खेपेला माझें सोंग तितकें साधलें नाहीं म्हणून तुमचें साधलें. पुन्हां मी हेंच कंकाचें सोंग घेऊन येईन तेव्हां पाहीन तुम्ही मला कशा ओळखतां त्या !

**मंदा०:**–अग जा ! तूं काय आह्मांला फसवतेस !

**चंद्रि०:**–तूं किती हुबेहूब सोंग आणलेंस तरी आम्ही तुला ओळखंच !

**सौदा०:**—आणि अशाच चापटपोळ्या देऊं !

**चप०:**—पहातें आतां कशा मला ओळखतां त्या! मी तुम्हांला हटकून फसवणार ! थांबा. तुमची खोडच मोडतें.

**सौदा०:**—अग जा ! मोठी आली आहे फसवणारी !

**चप०:**—हालोहाल फसवतें ! तुम्हाला माझ्या पायां पडायला लावतें !

**मोहि०:**—समजलें शहाणपण ! जा जा आतां ! (चापटी मारते.)

**चप०:**—सांगून संवरून फसवतें ! ( तिला चापटी मारून जाते.)

**मंदा०:**—काय बाई लुच्ची तरी !

**चंद्रि०:**—पण कंकाचें सोंग तिनें चांगलें आणलें होतें हो !

**सौदा०:**—बायकोनें पुरुषाचें सोंग आणलें तरी तिचें बायकोपण का कुठे लपलें आहे ? ही मध्येंच पुढें तोंड काढी, मध्येंच मागें सरे, तेव्हांच तिचा मला संशय आला. काय बाई नटरंगी मुलगी ही !

**मद०:**—ही चपला काय ढंग करील आणि काय न करील याचा नेम नाहीं ग बाई !

**मोहि०:**—ही त्रेपन टिकल्यांची बाहुली ! काय बाई इच्या अंगांत नाटक भरलें आहे ! पुरुषाचा वेष घेऊन आम्हाला फसवूं पहाते आहे ! ( पडद्यांत शब्द होतो. " अग मुलींनों ? कुठे बसल्या आहेत या सगळ्या जणी ? " )

**सौदा०:**—आली पुन्हां ! काय चावट आहे ! येऊं दे, येऊं दे ! आतां तिची धिंडच काढूं ! ( कंक येतो. )

**कंक०:**—अग पोरींनों !

**सौदा०:**–( वेडावते. ) अग पोरींनो ! काय हो म्हणतां आजीबाई !

**कंक०:**—( आश्चर्यानें ) आं ? असें काय बोलतात या ?

**सौदा०:**–आलीस का पुन्हां ? कां ग टवळे आमच्या राशीला पुन्हां पुन्हां तूं लागतेस ? ( कंकाची दाढी ओढूं लागतात. )

**कंक०:**–ओ यो यो ! अग असें काय करतां ?

**चंद्रि०:**–तुला अश्शा चापटपोळ्या देऊं म्हणून बजावलें होतें. मग कां आलीस पुन्हा ? कां आलीस ? ( चापट्या मारतात. )

**सौदा०:**–( त्याची काठी हिसकावून घेऊन त्याचें पागोटें पाडते. ) अग, ही काय लुच्ची आहे पहा ! या खेपेला डोक्याला पांढरे शुभ्र केंस हिनें चिकटवले आहेत ! ( केंस उपटूं लागते. कंक सगळ्यांना रागानें दूर लोटतो तों त्याचा झगा पडतो. )

**चंद्रि०:**–( आश्चर्यानें व भीतीनें ) बायांनो, हा बायको नाहीं !

**मंदा०:**–ही पुरुषच खरा !

**मोहि०:**–हा लुगडें नेसलेली नाहीं !

**कंक०:**–मुलींनो, मी तुमचा आजा शोभण्याजोगा म्हातारा माणूस; आणि तुम्ही माझी अशी थट्टा करतां ही केवढी शरमेची गोष्ट आहे !

**मंदा०:**–( पायां पडून ) कंकराव ! चुकलों. चुकलों. माफ करा. चपलेच्या लबाडीमुळें आमच्या हातून चूक झाली. तिनें तुमचें सोंग आणून आम्हांला फसवायचा बेत केला होता. म्हणून आमच्या हातून हा अन्याय झाला. माफ करा, आणि ही गोष्ट बाहेर कुठेंही बोलूं नका !

**कंक०:**–( संतापून ) हें सारें चपलेनें केलें म्हणतां ? येऊं दे तिला आतां माझ्या समोर; म्हणजे हीच काठी तिच्या डोक्यांत न

घालीन तर नांवाचा मी कंकरावच नव्हें ! कुमारांची स्वारी आत्तां येते आहे, म्हणून राजकन्येला सांगून तुम्हांला कळवायला आलों, तों तुम्हीं माझी अशी संभावना केलीत !

**मंदा०:**—कुमारांना यायला अजून किती अवकाश आहे ?

**कंक०:**—आतां अवकाश मुळींच नाहीं.

**सौदा०:**—असें का ? तर मग चला आतां जलदी जलदीनें आपली तयारी आटपूं. कुमारांच्या स्वागताकरितां ताईसाहेबसुद्धां येऊन दाखल झाल्या. चला जाऊं लवकर. ( सर्व सख्या जातात व मदयंती येते. )

( मदयंती व कंक आपापसांत कुजबुजतात. )

**कंक०:**—ताईसाहेब, हे पहा कुमार आले. ( माधव येतो. )

**मद०:**—यावें कुमार, बसावें.

**माध०:**—राजकन्ये, तूंही बैस. ( दोघें बसतात. )

**मद०:**—कुमार, या दिवसांतली ही वसंतऋतूची अवर्णनीय शोभा पाहून मनाला अतिशय आल्हाद होतो. नाहीं बरें ?

**माध०:**—होय. या दिवसांत पुष्पसंपत्तीनें शोभायमान झालेलीं उद्यानें, त्यांवरून मंद मंद वाहणारे सौगंध—समीर, अमृताची वृष्टि करणारे चंद्रकिरण, संतापहारक जलविहार, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे आम्हां भूतलवासी लोकांना नंदनवनाची शोभा दाखवण्यासाठींच ईश्वरानें हा वसंतऋतु निर्माण केला आहे असें वाटतें

**मद०:**—ही वसंतऋतूची शोभा पाहून माझ्या मनांत नाना प्रकारचे तरंग उत्पन्न होतात.

**माध०:**—तुला काय वाटतें ?

**मद०:**—मला असें वाटतें कीं, प्रेमळ नरनारींच्या मनाचें एकीकरण करण्यासाठींच वसंतशोभेच्या रूपानें भूतलावर ही प्रत्यक्ष लक्ष्मीदेवीच अवतरली आहे ! पहा—

## पद.

राग-खमाज. ताल-त्रिवट.

**उदारा पहा हे प्रभा वासंती।**
**भासे हांसे सुमवेषा ॥ ध्रु० ॥**
**रमणा अनुनय-मार्ग शिकविते।**
**समजवि रामा रोष-परुषा ॥ ३३ ॥**

**साध०:**—राजकन्ये, तुझ्या कल्पनेचे तरंग या प्रसंगाला अगदीं समर्पक आहेत. भूतलावरच्या नरनारीजनांना हा भगवान् चंद्रमासुद्धां आपल्या वर्तनानें तोच उपदेश करीत आहेसें मलासुद्धां वाटतें !

## पद.

राग-मालकंस. ताल-झंपा.

**हा चंद्रिर प्रियतमा-रंजनिं सायास।**
**अभिनंदन पावे कांता-प्रसादें ॥ ध्रु० ॥**
**पति-पादलीना निशा गत-तामस ॥**
**जनामोद-कर नेत्रोत्सवा दे ॥ ३४ ॥**

**मद०:**—( स्वगत ) या राजपुत्राच्या आजच्या भाषणाच्या रोंखावरून आपली अनुकूलता मला दाखवण्याविषयीं हा उत्सुक झाला आहे असें मला वाटतें. आणि कंकानें मघांशीं सांगितलें त्याचा याच्या बोलण्याशीं मेळ बसतो. एकूण माझ्या तसबिरीनें चांगलेंच काम करून दाखवलें म्हणायचें ! असो. आतां आरंभलेल्या कामाला विलंब कशाकरतां लावावा ? ( उघड )सख्यांनो, रात्र होत चालली. चला. या लौकर !

( प्रभावतीसह सख्या येतात. सर्व जणी नाचतात व गातात. )

### पद

राग—भैरवी. ताल–त्रिवट.

समुदित–मदन–ललित–लीला । प्रमुदित
बाला । चलित–लोल–नव–सुम–माला ।
पुरुष अभिमत रति–वश करिति या ॥ ध्रु० ॥
करिति नृत्य कुतुक–कृत्य । मधुर गान
रस–निदान । दशन–भास–रुचिर–हास ।
चटुल–चाटु–वचन–रचना । भृकुटि कुटिल
नयनांत–पात । विलसित–जाती । प्रकटुनि
प्रिय–हृदय धरिति प्रणय–विजय मिळवाया ॥ ३५ ॥

( नाचतां नाचतां सर्व जणी देवास माळा वाहतात.
प्रभावती माधवाच्या गळ्यांत माळ घालते.
देवापुढची एक माळ उचलून माधव
तिच्या गळ्यांत घालतो. )

कंक०:—भ्रष्टाकार ! भ्रष्टाकार ! नाच थांबवा ! नाच थांबवा ! नाहीं तर डोचकें आपटून जीव देईन ! ( रागानें जमिनीवर हात आपटतो. मदयंती मूर्छित होऊन सख्यांच्या अंगावर पडते. सर्व जण भीतीनें व आश्चर्यानें स्तब्ध होतात. पडदा पडतो. )

अंक चौथा समाप्त.



कंक—भ्रष्टाकार ! भ्रष्टाकार ! नाच थांबवा ! ( पृ० १०२ )

## अंक ३.

### प्रवेश १.

स्थळ:—नर्मविलास मंदिर.

( मदयंती उभी आहे. तिच्यासमोर माधवही उभा आहे. )

**मद०:**—कुमार, काल रात्रीच्या समारंभांत जो प्रकार झाला त्यामुळें माझी पुरतीच निराशा झाली. हाय ! हाय !

**माध०:**—तुझी निराशा झाली याचें मलाही फार वाईट वाटतें. पण याचा सर्व दोष तुझ्याकडेच आहे. माझ्या प्रेमाची प्राप्ति तुला होईल ही आशा उत्पन्न होण्याजोगें वर्तन मीं कधींही केलें नाहीं.

**मद०:**—( डोळ्यांत आंसवें आणून ) कुमार ! किती हें तुमचें निष्ठुर भाषण ! मदयंतीचें सौंदर्य तुमच्या डोळ्यांत भरलें, आणि माझें सौन्दर्य तुम्हांला उपेक्षा करण्याला योग्य वाटलें ना ? मी इतकी विनवणी करीत असतां माझ्या प्रीतीची पायमल्ली करीत आहां, हें तुम्हाला योग्य आहे का ? या गोष्टीचा पुन्हां विचार करा हेंच मी तुम्हांजवळ मागतें !

**माध०:**—प्रभावती, याचा विचार काय करायचा आहे ? मदयंती गरीब असली तरी ती मला पसंत पडली. आणि तूं राजकन्या असून तुझ्यावर माझें मनच मुळीं जात नाहीं याला मी काय करूं ?

**मद०:**—तुमच्या छांदिष्टपणामुळें तिची गरिबीच तुम्हाला आवडली तर घटकाभर मी राजकन्या नाहीं असें समजा. मी गरिबाची मुलगी आहें आणि तीच राजकन्या आहे हेंच खरें माना !

**माध०:**—जें खोटें आहे, तें खरें कसें मानूं ?

**मद०:**—मग तिलाच तुम्हीं आपलें मन दिलेंत ?

**माध०:**—होय. तिलाच माझें मन अर्पण करून मी धन्य झालों!

( फुलारी हारतुरे वगैरे फुलांचें सामान आणतो. )

**मद०:**—अगबाई ! हा कोण माणूस इथे आला ? कोण ? फुलारी ! अरे, किती उद्धट माणूस आहेस तूं ! आधीं वर्दी पोंचवल्याशिवाय कां आलास ? ( फुलारी हारतुरे वगैरे सामान ठेवून मदयंतीकडे पहात पहात हंसत उत्तर न देतां जातो. ) नोकर लोकांचा केवढा हा उद्धटपणा ! कुमार, हें सारें मीं समजलें आहें ! माझ्या अन्नावर वाढलेल्या त्या कवडीमोल मदयंतीला आपण पट्टराणी केलीत, आणि तेव्हांपासून या साऱ्या नोकर लोकांची धनीण असूनसुद्धां मी कस्पटाप्रमाणें यांना वाटूं लागलें आहे ! देवारे देवा ! पदोपदीं माझा असा अपमान आतां होणार ना ? आईबापांच्या, आप्तइष्टांच्या, नोकरचाकरांच्या धिःकाराला मीं प्राप्त व्हावें, यापेक्षां मरण आलेलें काय वाईट ? आणि हें सारें कुमार, आपल्या अवकृपेचें फळ बरें ! मदयंतीला किंवा मला कोणालाच पसंत न करतां आपण तसेच उज्जनीस परत गेलां असतां तरी सुद्धां एका अर्थी तें बरें होतें. पण तिला सिंहासनावर बसवलेंत आणि मला पायाखालीं तुडवलेंत ! मीं पूर्वजन्मीं तुमचा असा कोणता अन्याय केला होता कीं, ज्याबद्दल तुम्ही मला माझ्या सखीकडून लाथा मारवतां ? कुमार ! दया करा ! दया करा ! माझी लाज राखणें आतां सर्वस्वीं तुमच्या हातीं आहे. मदयंतीचा त्याग करून तुह्मी माझा स्वीकार कृपा करून कराल तरच माझा तरणोपाय आहे. तर एवढी माझी विनवणी तुह्मीं ऐकलीच पाहिजे. तुमच्या प्रेमासाठीं रात्रंदिवस तळमळणाऱ्या या अभागी जिवाला तुह्मांखेरीज आतां कोण त्राता आहे ?

## पद.

राग–पिलु, ताल–केरवा.

निज मानस सदय करावें ॥ प्रेम मज द्यावें ॥
किती विनवुं प्रेम मज द्यावें ॥ ध्रु० ॥
प्राण दयेविण राहि न तुमच्या ।
याहुन परतें काय वदावें ॥ १ ॥
जरि वाटे मज टाकुनि जावें ॥
शरणगताचें शीर चिरावें ॥ ३६ ॥

छे ! छे ! यापुढें जीव ठेवणें मला सहन होत नाहीं ! (ओक्साबोक्सीं रडत कोंचावर पडते. )

**माध०:**—राजकन्ये, जागी आहेसना ? या निष्फळ वासनेनें तूं व्यर्थ आपली विटंबना करून घेतेस !

## पद.

राग—बहार. ताल–एका.

सुजन नच अभिलाषी पर–कामिनी ॥ ध्रु० ॥
मदनें मोहित वंचित कुंठित तूं ॥
शोक करिसि दिन–यामिनी ॥ ३७ ॥

छे ! माझ्यानें हें पहावतसुद्धां नाहीं ! ( जातो. )

**मद०:**—( उठून रागानें ) काय ? कुमार माझा अव्हेर करून निघूनसुद्धां गेला ? गेला तो गेला, आणि शिवाय मला परकामिनी असें खोटें दूषण लावून दुःखावर डागणी देऊन गेला ! याची ही वागणूक मनांत आली म्हणजे जिवाचा नखशिखांत संताप होऊन जातो, आणि स्त्रीजातीला परम असह्य अशा या अपमानाचा सूड घेण्यासाठीं जीव तळमळूं लागतो ! कशाला हे अंगावर दागिने ?

( दागिने तोडून फेंकून देते. ) आतां काय करूं ? माझ्या मनाची समजूत कशी करूं ? त्या दुरात्म्याकरतां—त्या दुष्ट माधवाकरतां—मीं मोठ्या प्रेमानें आणवलेले हे हारतुरे आतां सुयांप्रमाणें माझ्या डोळ्यांत सलताहेत ! यांना पायाखालीं तुडवून टाकूं दे आधीं ! ( तबकांतील सामान जमिनीवर आदळते. ) अगबाई ! हें काय ? डबी ? ही इथे कशी आली ! काय आहे या डबींत ? ( डबी उघडून ) हा कागद कसला ? ( वाचते. )

## साकी.

**नलिन-निमीलन जोंवरि होउन भृंग न बंदीं पडला ॥**
**आज तोंवरी शिवालयीं तव आगम जरि नच घडला ॥**
**रात्रौ शिर कापीं ॥ जालंदर हें आज्ञापी ॥ ३८ ॥**

ही जालंदराची चिठी ! सूर्यास्ताबरोबर उद्यानाबाहेरच्या शिवालयांत मला भेटायला न येशील तर रात्री तुझा शिरच्छेद करीन म्हणून दहशत घालतोय् चांडाळ ! पण बोलल्याप्रमाणें तो करून दाखवणार नाहीं असें तरी कसें म्हणावें ? इतक्या चौक्या ओलांडून इतका कडेकोट बंदोबस्त चुकवून जर त्याचें पत्र इथे येऊन पोचतें, तर तो सुद्धां म्हटल्याप्रमाणें येऊन माझ्या जिवावर घाला घालणार नाहीं असें आतां मुळींच म्हणवत नाहीं. मघांशीं आलेला फुलारी तो जालंदर स्वतः नसेल ना ? नव्हे पण ! तो कांहीं जालंदर खास नव्हे ! पण तो नसला तरी त्याचा कोणी हस्तक असेल ! हाय ! हाय ! आतां काय करूं ? ( रडत ) या जालंदराच्या आंचेनें होरपळलेलें आणि माधवाच्या धिक्कारानें लाजिरवाणें झालेलें हें जीवित आतां कशाला पाहिजे ? नको ! नको ! या देहाचा आतां कंटाळा आला. आतां इहलोक सोडून जावें हेंच उत्तम ! ( क्रोधानें ) पण नाहीं ! मदयंती ! ज्यांनीं तुझ्या जिवाचा तळतळाट केला त्या माधव व जालंदर या दोन राक्षसांवर सूड उगवल्याखेरीज इहलोक

सोडून कुठे जातेस? कां जातेस? जाऊं नको! ( विचार करून ) हो! प्रभावतीनें भाबडेपणानें स्वतःची मुद्रा माझ्या हवालीं केली, तिचा मी अस्सा उपयोग करणार! कुणाला पत्र पाठवावें? (थांबून) हो, बरें आठवलें! सैन्यामध्यें शितिकंठ नांवाचा अधिकारी आहे त्याचे सैनिक दूरच्या प्रांतांतून चाकरीकरतां नवीनच आणलेले आहेत. त्या सैनिकांनीं प्रभावतीला कधीं पाहिलेलें असण्याचा संभव नाहीं. असल्या लोकांसमोरच माझें राजकन्येचें सोंग खपण्याजोगें आहे. पण वेळ कोणची ठरवावी? होय. तीच वेळ! संध्याकाळची वेळ! शिवदर्शनाकरतां माधव त्याच वेळीं दररोज तिथे जात असतो, आणि त्याच वेळीं त्याच शिवालयाजवळ मी जालंदराच्या पत्राप्रमाणें त्याला जाऊन भेटतें; आणि सैनिक आले म्हणजे त्या दोघां दुष्टांना सैनिकांकडून मारवून टाकतें! ठार मारवून टाकतें! ठार—ठार मारवून टाकतें!! !

---

## प्रवेश २.

स्थळः—आमोदसुंदर उद्यानाबाहेरचें मैदान.

( जालंदर व मदयंती येतात. )

**जालं०:**—मदयंती, त्या दिवशीं माधवाला तूं फुलांचा पोषाख काय ह्मणून घालीत होतीस? आणि ज्या तसबिरींत तो व तूं एके-ठिकाणीं बसलेलीं दाखविलीं आहेत, अशी ती तसबीर काढून व ती-खालीं प्रेम–संदर्भाचें काव्य लिहून त्या तसबिरीकडे ध्यान लावून तूं कां बसली होतीस? बोल. याचा सरळपणें जबाब दे.

**मद०:**—( चोरून आसपास पाहून स्वगत ) अजून कसे सैनिक येत नाहींत ते? कुमारही अजून आला नाहीं!

जालं०:—मदयंती, बोलत कां नाहींस ? इकडे तिकडे काय पहातेस ? कुणाची वाट पाहते आहेस ? माझ्या प्रश्नाचें उत्तर दे.

मद०:—याचा खुलासा आपल्या नाहीं का ध्यानांत येत ? जिनें मला राजकन्येचें सोंग दिलें तिच्यास सांगण्यावरून हें सर्व मीं केलें आहे. माझें तनमन आपल्या चरणीं वाहिलेलें असल्यामुळें परपुरुषाला वळवण्याची ही लाजिरवाणी खटपट मला किती जिकीरीची आणि त्रासाची वाटत होती हें काय सांगूं ? पण प्रभावतीच्या आग्रहामुळें मला हें करावें लागलें याबद्दल क्षमा असावी.

जालं०:—तूं पक्की लबाड आहेस. तुझ्या बोलण्यावर माझा काडीमात्र विश्वास बसत नाहीं. माझ्यावर तुझी मुळींच प्रीति नाहीं. उगीच मला फसवायची खटपट करूं नकोस.

मद०:—छे ! छे ! मला आपण किती प्रिय आहां हें मी काय सांगूं ? हा जीव आपल्यावरून शंभरदां जरी ओंवाळून टाकला तरी माझ्या मनाची तृप्ति होणार नाहीं. इतकें असून आपण माझ्याविषयीं भलतीच शंका घेतां यामुळें मला फार फार दुःख होतें !

जालं०:—तूं खोटी आहेस आणि दुष्ट आहेस. तूं माझ्याशीं वंचना करते आहेस.

मद०:—( स्वगत ) काळतोंड्या ! व्यापाऱ्याचें सोंग आणून मला फसवून तूं नाहीं माझ्याशीं वंचना केलीस ? दरवडेखोर होऊन कसा प्रतिष्ठित सज्जनाच्या गोष्टी सांगतो आहे मला ! थांब! तुझी मरायची वेळ जवळ आली आहे. ( उघड ) नाहीं हो नाहीं ! मीं बोलतें हें सारें सत्य सत्य आहे.

जालं०:—तूं कांहीं सांगितलेंस तरी आतां तुझ्यावर माझा विश्वास बसेल ही भ्रांति धरूं नकोस. याउपर तुला मीं कधींही

मोकळी सोडणार नाहीं. आतां तुला जंगलांतच माझ्याबरोबर नेहमीं राहिलें पाहिजे.

**मद०:**—वा ! असें झालें तर फारच चांगलें होईल. पुन्हां पुन्हां मजबद्दल आपल्याला संशय येत असतो तो येण्याचें कारणच राहणार नाहीं. आपल्या सहवासापेक्षां मला अधिक प्रिय तें काय असणार ?

**जालं०:**—( दुरून माधवाला येतांना पाहून ) अरेच्या ! हा राजकुमार माधव काय म्हणून इकडे येतो आहे ?

**मद०:**—तो दररोज देवदर्शनाकरतां इथे येत असतो, त्याप्रमाणें आजही आला असेल. हो ! हें अनायासें बरेंच झालें ! त्याकडे जाऊन त्याशीं कांहीं बोलावें असें माझ्या मनांत आहे. याकरतां तितक्यापुरती मला मोकळीक द्यावी.

**जालं०:**—तुला काय त्याच्याशीं बोलायचें आहे ?

**मद०:**—प्रभावतीच्या सांगण्यावरून मीं त्या कुमाराशीं जें वर्तन केलें त्याबद्दल माझ्याविषयीं त्याच्या मनांत गैरसमज उत्पन्न झाला आहे तो दूर करावा, आणि मी आपणाबरोबर जंगलांत रहायला जाणार म्हणून प्रभावतीला त्या कुमाराबरोबरच सांगून पाठवावें; ही माझी इच्छा आहे. पुन्हां अशी संधि मला येणार नाहीं.

**जालं०:**—बरें आहे. पण मी तुला दूर जाऊं देणार नाहीं. तो दहा वीस हातांच्या अंतरावर आला म्हणजे त्याकडे जाऊन तुला काय बोलायचें असेल तें बोल. तेथपर्यंत या झाडाच्या आडोशाला मी बसून राहीन.

**मद०:**—बरें आहे. मी आपली दासी कधीं तरी आपल्या मर्जीबाहेर वागेन का ? जशी आपली मर्जी असेल तसेंच होऊं दे.

( जालंदर जातो. ) ( स्वगत ) अधमा, कशी तरी तुझ्या तावडींतून मला सुटूं दे, आणि ते सैनिक येऊं देत; म्हणजे दाखवतें तुला काय तें ! ( माधव येतो. )

**माध०:**–( पाहून आश्चर्यानें ) ही राजकन्या प्रभावती ! पण ही इथे एकटी काय म्हणून ! परिवारापैकीं कोणीच माणसं इच्या-जवळ नसावीं ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे !

**मद०:**–कुमार, तिसरे प्रहरीं तसे आपण निष्ठुरपणानें निघून गेलांत हें चांगलें केलें का ? आतां इतका वेळ तो विषय मनांत घोळायला आपणाला फुरसत मिळालेली आहे. अजूनसुद्धां माझ्या प्रेमाचा स्वीकार करण्याबद्दल आपल्या पाषाणहृदयी मनाला नाहीं का हो कांहीं द्रव येत ?

**माध०:**–छे ! छे ! राजकन्ये ! या जन्मांत तरी ती गोष्ट घडणें शक्य नाहीं !

**मद०:**–( सैनिकांना येतांना पाहून स्वगत ) वाट पहातां पहातां आले हे एकदांचे सैनिक ! आतां या राजपुत्रानें जगावें कीं मरावें हें माझ्या शेवटच्या विनवणीला तो जें उत्तर देईल त्यावरून ठरायचें आहे ! ( उघड ) कुमार, मी अनाथ गाय आपणाजवळ प्रेमाची भिक्षा मागतें. नका, नका माझा अव्हेर करूं !

**माध०:**–प्रभावती, हें तूं काय मांडलें आहेस ? लज्जा हें स्त्री-जातीचें निसर्गसिद्ध भूषण आहे ! त्याही भूषणाचा तूं अगदींच कसा त्याग केलास ?

**मद०:**–कुमार, माझें नाहीं ना ऐकत ?

**माध०:**–नाहीं.

**मद०:**–पुन्हां विचारतें, नाहीं ना ?

माध०:—नाहीं. नाहीं नाहीं. तीनदां सांगितलें. आतां विचारूं नकोस.

मद०:—( स्वगत ) मर तर मेल्या आतां ! नागिणीच्या मस्तकावर पाय देऊन तिला दुखवलेंस त्याचें भोग आतां फळ !

माध०:—( सैनिकांना येतांना पाहून ) हे कोण लोक आहेत ? हे सैनिक तुझ्या परिवारापैकींच आहेत कीं काय ?

जालं०:—( स्वगत ) हे सैनिक काय म्हणून इथे आले आहेत ? मदयंतीनें कांहीं तरी दग्याची मसलत खास केलेली दिसते. (उघड) राजपुत्रा, सावध ! सावध ! इथे दगा आहे. मी आलोंच तुझ्या मदतीला.

माध०:—( आश्चर्यानें ) हें काय ? हा कोण माणूस सावधपणाची सूचना देत इकडे येतो आहे ? ( पाहून ) हो. त्या दिवशीं मला उद्यानांत भेटलेला हा जालंदरच ! हा माझा मित्र आणि हे सैनिक माझे शत्रु म्हणायचे ! कोणी कसाही असो. प्रसंग भयंकर दिसतो. आपला बचाव आपण केलाच पाहिजे. ( तरवार उपसतो. )

मद०:—( माधवास ) थोडा धीर धरा ! हे कोण लोक आहेत याची चौकशी करून सांगतें हो ! ( सैनिकांस ) सैनिकहो, फळाचें नांव ?

सैनि०:—डाळिंब.

मद०:—फुलाचें नांव ?

सै०:—चाफा.

मद०:—पानाचें ?

सै०:—अशोक.

**मद०:**–( सैनिकांकडे धांवत जाऊन ) सैनिकहो, मी तुमची धनीण राजकन्या प्रभावती तुम्हांला हुकूम करतें, तुम्ही सच्चया बापाचे बच्चे असाल तर मारा, मारा, त्या दोन इसमांना ! ( माधव व जालंदर यांजकडे बोट दाखवते. ) ठार मारून टाका !

( प्रभावती धांवत येते. )

**प्रभा०:**–( धापा टाकीत ) अरे थांबा, थांबा. खबरदार पुढें पाऊल टाकाल तर !

**माध०:**–( प्रभावतीस ) मदयंती, तूं कशाला इथे आलीस ? हें रणसंमर्दाचें ठिकाण आहे. स्त्रियांच्या संचाराची ही जागा नव्हे. तूं मागें हो. माझें रक्षण करण्याचें सामर्थ्य मला पूर्ण आहे. त्यांतून माझा हा सोबती जालंदर धनुर्धरसुद्धां महापराक्रमी पुरुष आहे. तूं आमची काळजी करूं नकोस. मागें हो.

**प्रभा०:**–( आश्चर्यानें माधवास ) काय ? जालंदर ! ज्याला दुनिया शत्रु म्हणते त्यानें आमचा मित्र व्हावें, आणि मी जिला प्रियसखी म्हणत होतें त्या मदयंतीनें आमचें शत्रु व्हावें, हा भवितव्यतेचा उलटा फेरा आहे !

**मद०:**–अरे, तुम्ही तिचें काय ऐकतां ? मी राजकन्या प्रभावती तुम्हांला हुकूम करतें त्याप्रमाणें केलें नाहींत तर तुम्हांला कडक शासन केलें जाईल.

**प्रभा०:**–मी राजकन्या प्रभावती तुम्हांला निक्षून ताकीद देतें आहें. तुम्ही एक पाऊल पुढें टाकाल तर उद्यां सूर्योदय होण्यापूर्वी तुम्हा सर्वांचा शिरच्छेद करवीन.

**माध०:**–( जालंदरास ) आजची ही मदयंती मला निराळीच दिसते आहे ! आज हिच्या मुद्रेवर जें तेज चमकतें आहे व स्वरांत

अधिकाराची जी जाणीव उत्पन्न होते आहे ती यापूर्वी हिच्या ठिकाणीं मीं कधीं पाहिली नव्हती !

**जालं०:**–थांब. थोडा धीर धर.

**माध०:**–( निश्चयाच्या स्वरानें ) होय. राजकन्या प्रभावती ती हीच असली पाहिजे !

**जालं०:**–तूं अंमळ स्वस्थ राहून या स्त्री–चरित्राची विचित्र लीला पहाशील तर खरा !

**सै० अधिकारी:**–( स्वगत ) ही बाई म्हणते मी राजकन्या, आणि ती बाई म्हणते मीच राजकन्या ! यांतली खरी कोण आणि खोटी कोण ? या दोघीही आम्हांला हुकूम करतात आणि तंबी देतात. आतां काय करावें ? हां. आतां असेंच करावें. ( उघड प्रभावतीस ) बाईसाहेब, ज्यांनीं आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला पत्र लिहिलें त्यांचा हुकूम आम्हाला मानायचा. आपण पत्र लिहिलेलें असलें तर त्यांतले संकेत आपणाला माहीत असलेच पाहिजेत. बोला. फुलाचें नांव काय ? फळाचें नांव काय ? पानाचें नांव काय ?

**प्रभा०:**–तें मला कांहीं माहीत नाहीं. मीं पत्र पाठवून तुम्हांला इथे मुळींच बोलावलें नाहीं. तुम्ही या क्षणीं इथून चालते व्हा.

**सै० अधि०:**–( धिक्कारानें ) तूं कंगाल लबाड बायको आहेस. धनीपणाचा मान याच बाईसाहेबांचा आहे. यांचाच हुकूम आम्ही मानणार. चल हो एकीकडे !

**मद०:**–शाबास ! आतां जलदीनं काम आटपा, म्हणजे मी उद्यांपासून तुम्हांला दुप्पट पगार देण्याची शिफारस महाराजांना स्वतः करीन.

**माध०:**–जालंदरा, या नरपशूंचे हे उर्मटपणाचे शब्दसुद्धां मीं ऐकून घ्यावे म्हणतोस ना ?

जालं०:–कुमारा, केवळ तुझ्या बचावाकरतां मी आपण होऊन मरायला तयार झालों आहें त्याअर्थी माझें तुला एवढेंच सांगणें आहे कीं, मी सांगेन तोंपर्यंत लढाईची उतावळी करूं नकोस. या लोकांशीं कसें वागायचें हें मी पूर्णपणें जाणतों.

प्रभा०:–सैनिक हो, मी युगंधर राजाची कन्या प्रभावती तुम्हांला एकदां शेवटची आज्ञा करतें; ती ऐकत नसाल तर पदर पसरून प्रार्थना करतें, कीं या राजकुमाराला मारण्याविषयीं हीं दुष्ट घातकी स्त्री तुम्हांला सांगते तें तुह्मी ऐकूं नका, आणि या क्षणीं इथून निघून जा.

स० अधि०:–तूं कोण आम्हाला आज्ञा करणार? तुझी आज्ञा अथवा प्रार्थना आम्ही मानीत नाहीं.

माध०:-मर्जी तुमची! तुमच्या स्त्रियांना वैधव्यदीक्षा देण्याला ही माझी तरवार तयारच आहे!

जालं०:–मित्रा, अशी उतावळी कां करतोस? थोडा थाब म्हणतों ना?

प्रभा०:–अग चंडाळणी मदयंती! तूं माझी जिवलग मैत्रीण म्हणवीत होतीस आणि आतां अशी निष्ठुर कां ग झालीस! हा कुमार माझ्या प्राणाचा प्राण! याचा नको ग जीव घेऊं! तुझ्या पायां पडतें, काय सांगशील तें करतें!

जालं०:–(स्वगत) भूलोकावर अवतीर्ण झालेल्या या निस्सीम प्रेमाच्या देवतेला माझा नमस्कार असो!

माध०:–प्रिये, तूं अशी धैर्यहीन कां होतेस? या हलक्या लोकांपुढें करुणा भाकून तूं आपला व्यर्थ अपमान कां करून घेतेस? तुझ्यासमोर रक्तपात न व्हावा म्हणूनच केवळ हात आवरून धर-

ण्याविषयींचें जालंदराचें म्हणणें मीं मोठ्या कष्टानें कबूल केलें. तूं येथें नसतीस तर हे दुष्ट सैनिक माझ्या तरवारीनें यापूर्वीच गतप्राण होऊन गेले असते !

**सै० अधि०:**—अहो पराक्रमाचे खंदक ! बायकोपुढें पराक्रमाची प्रौढी मिरविणें सोपें आहे. आमच्या तरवारींशीं गांठ पडेल तेव्हां त्रिभुवन आठवेल त्रिभुवन !

**मद०:**—( चवताळून अधिकाऱ्याच्या कानावर ठोसा मारते. ) हरामखोरा ! नुसतें बोलून भागवतो आहेस, त्यापेक्षां हातानें करून कां दाखवीत नाहींस ? या दोन अपराध्यांना मारण्याविषयीं मीं हुकूम केला असतां हे अजून जिवंत कां राहिले आहेत ?

**सै० अधि०:**—अरे, तुम्ही दोन कोण इसम आहां, ते देवाचें नांव घ्या, आणि मरायला तयार व्हा.

**प्रभा०:**—कुमार ! मीं मूर्खपणाचे चाळे करून आपणाला प्राणसंकटांत घातलें, आणि त्यांतून आपणाला सोडवायला माझा उपाय आतां चालत नाहीं ! हाय हाय ! कशी हो मीं तुमची जन्मांतरींची वैरीण होऊन तुमचा दावा साधला ! आतां कसें करूं ? आतां या दुर्दैवी प्रभावतीनें मृत्यूचाच धांवा केला पाहिजे !

**माध०:**—( जालंदरास ) अरेरे ! हिला वेड तर नाहींना लागलें ?

**प्रभा०:**—( कुमारापुढें होऊन सैनिकांस ) अरे ! तुम्ही जर ऐकतच नाहीं, तर कुमाराला मारण्याच्या आधीं ही माझी मान पुढें केली आहे हीवर पहिल्यानूदां घाव घाला !

**मद०:**—सैनिक हो, जर तिचा तसाच आग्रह असेल तर तिला सुद्धां मारून टाका ! माझ्या खेंटराखालची बटीक ही ! हिचा इतका दिमाख पाहिजे कशाला ?

**माध०:**–प्राणप्रिये, हें तूं काय मांडलें आहेस ! मागें हो.–

**प्रभा०:**–कुमार, मला मागें व्हायला कां सांगतां ? मी क्षत्रियाची कन्या आहें. मृत्यूला मी भिणार नाहीं. मी मेल्यानें आपलें संकट टळतें असा अर्थ नाहीं हें मला समजतें. पण माझ्या देहाचा बळी देऊन मला आपलें शरीर जरी पळभर सुरक्षित राखतां आलें तरीसुद्धां माझ्या प्रेमाचें सार्थक झालें !

**मद०:**–अरे ? कशाची वाट पहातां ? व्हा पुढें ! ( सैनिक पुढें येतात. )

**माध०:**–(जालंदरास) मित्रा, हे सैनिक आतां अगदीं हातघाईवर आलेले दिसतात. आतां यांच्याशीं लढलेंच पाहिजे. प्रत्यक्ष कृतान्ताचेंच यांना जर आमंत्रण आलें असेल तर हे तरी बिचारे काय करणार ? आतां तुझ्या सांगण्याची मी वाट पहात नाहीं. ( सैनिकांस ) अरे अधमांनों, आतां सांभाळा या माधवाची तरवार ! ( पुढें चालून जातो. )

**जालं०:**–( माधवास मागें ओढून ) कुमारा, कुणाशीं लढणार तूं ? युगंधर राजाचीं असलीं शेंपन्नास शिपुरडीं मी दररोज पायाखालीं चिरडीत असतों !! ही माझी विश्वासघातकी अवदसा मला ठाऊकच ! मी इथे आलों तो बेफामपणानें आलों नाहीं हें तुला आतांच दाखवतों. ( शीळ वाजवतो. हत्यारबंद दरवडेखोरांची टोळी माधव व जालंदर यांपुढें येऊन उभी राहते. ) सैनिक हो, मी जालंदर धनुर्धर आणि हे माझे मर्द सोबती. आमचीं नांवें तरी तुम्हांला ऐकून माहीत असतीलच ! या क्षणीं इथून तुम्ही चालते न व्हाल तर तुम्हाला मारून टाकण्याचा हुकूम मी माझ्या सोबत्यांना देईन. ( दरवडेखोर पुढें सरकतात. )

**सै० अधि०:**–( सैनिकांस ) सैनिक हो, राजकन्येचा हुकूम या दोन इसमांना मारण्याचा आहे. पण राजकन्येपेक्षां सरकारचा

हुकूम आम्ही नेहमीं आधीं पाळला पाहिजे. मी तुम्हांला निक्षून बजावतों कीं लढाई करण्याविषयीं सरकारी हुकूम आम्हांला मिळालेला नाहीं. तुम्ही पराक्रमी पूर्वजांचे शूर बच्चे आहां. या दरवडेखोरांशीं लढण्याविषयीं तुमचे बाहु वीरश्रीनें स्फुरण पावत असतील यांत संदेह नाहीं. पण मला फार वाईट वाटतें कीं लढाई करायला–

**सै०**:–( मागें सरत एकदम ) सरकारी हुकूम नाहीं !

**मद०**:–( रागानें पाय आपटून ) हात् मेल्यांनों ! एवढाले कल्ले बाळगून शिपाईगिरीचा दिमाख मिरवतां, त्यापेक्षां कोठींतल्या कुळंबिणी कां नाहीं झालांत ?

**सै०**:–( मागें सरत ) सरकारी हुकूम नाहीं !

**मद०**:–अरे, तुम्हा लढवय्ये म्हणवणारांच्या छातींत हरणांचीं काळजें शिरलीं, आणि तुम्ही पळून चाललांत ! त्यापेक्षां मला तरी तलवार द्या म्हणजे यापैकीं एक दोन धटिंगणांचे मुडदे पाडतें ! नाहींतर मी तरी मरून जातें !

**सै०**:–( आणखी मागें सरत ) सरकारी हुकूम नाहीं.

**मद०**:–( ओक्साबोक्सीं रडत ) अरे घातक्यांनों ! तुह्मी जातां तर मला तरी बरोबर घेऊन चला ! [ त्यांना अडवते. ]

**सै०**:–( दरवडेखोरांस चालून येतांना पाहून ) सरकारी हुकूम नाहीं ! ( मदयंतीला घाईघाईनें ढकलून निघून जातात. )

**जालं०**:–(मदयंतीस पकडून जोरानें हिसडा देऊन)डाकिनी !

## पद.

**राग**–ललत. ताल एक्का.

**मदोद्धत विकट डाकिनि । नटलिस नरी ।**
**कपट–पटल–पिहित–दुरित–विलसित ॥ ध्रु० ॥**

सलिलिं काय बुडवूं ?। गगनिं काय उडवूं ?।
अतलिं दडवुं ?। अनवधि तुज रडवूं ?।
तिमिर-कुहरिं करुनि चरण निगडित॥ ३९॥

( दरवडेखोरांस ) जारे, हिला घेऊन जा. पण थांबा. ( मदयंतीच्या डोक्यावरील मुकुट काढून घेतो. ) हां. जा घेऊन हिला. ( दरवडेखोर मदयंतीला घेऊन जातात. जालंदर प्रभावतीच्या हातांत मुकुट देतो ) गुर्जराधीश्वर युगंधर महाराजांच्या कन्या प्रभावती ताईसाहेब यांच्या चरणाला मी प्रणाम करतों. ( प्रणाम करितो. )

**प्रभा०:**–( मुकुट घालून ) कुमार ! मी राजकन्या प्रभावती केलेल्या वंचनेबद्दल आपली क्षमा मागतें. यापेक्षां माझ्यानें जास्त बोलवत नाहीं.

**माध०:**–तूं राजकन्या आहेस हें स्वतः सांगायला नकोस ! तें तूं इथे आल्यापासूनच माझ्या लक्षांत आलें आहे. पण अशी वंचना तूं माझ्याशीं कां केलीस एवढेंच मला कळायचें राहिलें आहे.

**प्रभा०:**–आपली माझ्यावर खरोखरच प्रीति आहे कीं नाहीं' हें पाहण्याकरितां मीं हें कपट केलें. पण याबद्दल आपण क्षमा केली ना ?

**माध०:**–( तिला आलिंगन देऊन ) होय. केली. केली हें सांगायला कशाला पाहिजे ?

**जालं०:**–कुमारा, तुझी आणि त्याबरोबरच या राजकन्येचीही मला क्षमा मागितली पाहिजे. त्या दिवशीं उद्यानांत तूं इच्या प्रेमाचें वर्णन केलेंस तें मला खरें वाटलें नाहीं. त्यामुळें हिचें तुझ्यावरचें प्रेम कसोटीला लावायचें माझ्या मनांत आलें; आणि म्हणूनच हा उद्वेगदायक प्रसंग इतका वेळ मीं मुद्दाम लांबवला. नाहीं तर या संकटाचें निवारण मला क्षणांत करतां आलें असतें.



जालंदर—युगंधर महाराजांच्या कन्या प्रभावती ताईसाहेब यांच्या चरणाला मी प्रणाम करतों. ( पृ० ११८ )

**माध०**:—असो. आतां तर तुझी खात्री झाली ना ? जालंदरा ! इच्या प्रेमाचें व सद्गुणाचें वर्णन मीं त्यावेळीं केलें होतें तें तुला आठवतें आहे ना ? ( " कोमल हृदया " इत्यादि पूर्वोक्त पद " वरिलि सुकृतयोगें " असा फेर करून म्हणतो. ) पण प्रभावती, तूं इकडे कशी आलीस तें आधीं सांग.

**प्रभा०**:—या जालंदरानें मदयंतीला पाठविलेली ती चिठी, तिनें सैनिकांस लिहिलेलें माझ्या मुद्रेचें पत्र, आणि आपलें शिवालयाकडे येणें, या तीन गोष्टींमुळें माझ्या मनांत कांहीं एक तर्क उत्पन्न झाला, व त्यामुळें मी घाबरून एकटीच पळत सुटलें ती थेट इथेच आलें. असो. जालंदरा, तुझ्या मदतीमुळें या भयंकर अरिष्टांतून कुमाराचा बचाव झाला. या तुझ्या उपकाराचें आम्हांवर फार मोठें ओझें झालें आहे. धन्य आहेस तूं !

**माध०**:—जालंदरा, माझी तुझ्याजवळ एक मागणी आहे ती तूं कबूल करशील का ?

**जालं०**:—हो. हो. अलबत करीन.

**माध०**:—तर मग हा बंडाळी करण्याचा व दरवडे घालण्याचा वाईट धंदा तूं सोडून दे. तुझ्या योग्यतेला साजेलसा अधिकार व वैभव आमच्या राज्यांत माझ्या वडिलांकडून मी तुला देववतों.

**जालं०**:—माझा प्रस्तुतचा मार्ग सोडून देण्याबद्दलची माझी एक शर्त आहे, व ती या राज्यांतच पुरी झाली पाहिजे. ती शर्त अशी कीं, आजपर्यंत माझ्या हातून झालेल्या सर्व गुन्ह्यांबद्दल युगंधर महाराजांनीं मला आपण होऊन माफी दिली पाहिजे; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं अन्यायानें पूर्वी माझी मालमत्ता व सरदारीचा दर्जा काढून घेतला आहे, तें सर्व माझें मला परत दिलें पाहिजे. महाराजांनीं

केलेल्या अन्यायाबद्दल मीं पुष्कळ प्रकारें दाद मागितली, परंतु ती मला मिळाली नाहीं. उलट मला मारून टाकण्याबद्दल तमाम राज्यात दवंडी पिटवली गेली. तेव्हां स्वतःच्या बचावाकरितां मला बंडाचा झेंडा उभारावा लागला.

**प्रभा०**:—जालंदरा, तुझ्या कामांत फार अन्याय झालेला आहे हें महाराजांच्या लक्षांत आतां आलेलें आहे. तूं म्हणतोस त्याप्रमाणें तुला माफी मिळवून देण्याची तजवीज मी करतें.

**माध०**:—आणि मीही तुला याप्रमाणें युगंधर महाराजांकडून माफी देववण्याचें वचन देतों. हें वचन पूर्ण होईपर्यंत आमचा लग्न-समारंभ तहकूब राहिलाच पाहिजे.

**जालं०**:—(हंसत) तर मग आतां माझें काम हटकून होणारच ! कारण, महाराजांना झालें तरी जावईबुवा केव्हांही शिरजोरच असणार!

**प्रभा०**:—जालंदरा, तूं आतां मदयंतीचें काय करणार ?

**जालं०**:—तिच्या वर्तनाचें फळ तिला मिळेल !

**प्रभा०**:—काय ? तूं तिचा प्राण घेणार ? जालंदरा ! नको. नको. असा नितांतनिष्ठुर होऊं नकोस !

**पद.**

राग—भैरवी ताल—धुमाळी.

**पहात राहे तुज दया । भुवन-माता माया ।**
**माधव-जाया तिजसिं । वाहें मनिं रहाया ॥ ध्रु० ॥**
**मम न वधिं आली । हृदयिं धर दया ।**
**हो दाता वर मला हा द्याया ॥ ४० ॥**

**जालं०:**—ताईसाहेब, अशी भलतीच शंका आपल्या मनांत आली तरी कशी? स्त्रीहत्येनें मीं माझे हात कधींही विटाळणार नाहीं. मदयंतीसंबंधानें यापेक्षां दुसरें कांहीं मला सांप्रत सांगवत नाहीं.

**प्रभा०:**—जालंदरा, मदयंतीबद्दल तुझ्याजवळ कांहीं रदबदली करणें मला भाग आहे. कारण कीं कपटाला मींच प्रथम प्रारंभ केला नसता तर तिच्या हातून असलें दुर्वर्तन कदाचित् झालेंही नसतें. तूं तिला तुझें मन पुन्हां अर्पण कर असें मी सांगत नाहीं. मी एवढेंच म्हणतें कीं, तिचे कांहीं एक हाल न करतां शक्य तितक्या ममतेनें तिला तूं वागवीत जा; आणि कधीं काळीं तिला पश्चात्ताप झाला तर तिच्या अपराधाबद्दल तिला क्षमा कर.

**जालं०:**—ताईसाहेब, आपण सांगतां तर याप्रमाणें मी खचित करीन. तिनें पूर्वी अन्याय केले एवढ्यावरूनच केवळ मी तिच्याशीं अन्यायानें वागणार नाहीं. माझ्या संसारसुखाचें मातेरें झालें एवढ्याबद्दल मात्र मला वाईट वाटतें. ताईसाहेब, पुरुषाला स्त्रीप्रेमाची व स्त्रियांना पुरुषप्रेमाची इच्छा ही जन्मसिद्धच आहे. ती इच्छा पूर्ण करण्यासाठीं मीं व आपण दोघांनींही कपटाचा प्रयोग केला. मदयंतीला मीं कपटानें ताब्यांत आणलें खरें, पण तिचें प्रेम मला मिळालें नाहीं. माझा पराक्रम सर्वत्र अकुंठित चालत असतां एवढ्याशा दुर्बल स्त्रीचें मन मला ताब्यांत ठेवतां आलें नाहीं! आपण अबला असून या कुमाराला—या रणधुरंधर वीराला—कपटानें स्वाधीन करून घेतलें व त्याच्या मनावर साम्राज्य गाजविलें! प्रेममंदिराचें बंद झालेलें कपाट उघडलें जावें म्हणून महामल्लानें टकरा मारल्या असतां त्याचें कपाळ मात्र फुटलें, पण तें कपाट उघडलें गेलें नाहीं. तेंच कपाट एका बालमल्लिकेनें सहज लीलेनें खुलें करून आंतल्या भांडाराची लूट केली! ताईसाहेब, अहो कुमार, मी आपल्या दैवाचा हेवा करीत नाहीं. इतकेंच नव्हे. तर अत्यंत आनंदानें

आपलें अभिनंदनच करतों. आणि असें इच्छितों कीं, या सुखाचा उपभोग आपणा उभयतांना अखंड होत जावा !

**माध०:**–जालंदरा, हीं उद्यानाच्या बाजूनें कोणी माणसें येतांना दृष्टीस पडताहेत. मदयंतीनें आणखी कांहीं अरिष्ट नाहींना आह्मांवर आणलें ?

**जालं०:**–( पाहून हंसत ) उद्यानाकडून येणाऱ्या अरिष्टाचें कांहीं एक भय नाहीं. कारण तें सैन्य बायकांचें असून त्यावरचे सेनापति एक म्हातारेबुवा दिसताहेत !

**माध०:**–तर मग ते आमचे कंकरावच ! ( प्रभावतीच्या सख्या व कंक येतात. )

**सख्या०:**–मदयंती, इतका वेळ तूं होतीस तरी कुठे ? आह्मी तर बाई घाबरून गर्भगळीत झालों !

**कंक०:**–कुमार, तुह्मीं हें आरंभलें आहे तरी काय ? या मदयंतीच्या पाठीस लागून इकडे कुणीकडे आलांत ? ( प्रभावतीस ) बाई, आतां कुमारांना किती धांवशील ? आणि किती मला छळशील ? आतां प्रसन्न हो, आणि तुझें चेटुक काढून घेऊन राजकन्येशीं लग्न करायला कुमार माधवांना मोकळें कर ! (तिरस्कारानें) नुसता राजकन्येचा मुकुट घातला आणि खंडीभर दागिने अंगावर घातले म्हणजे कोणी राजकन्या म्हणत नसतें ! किती झालें तरी राजतेज तें राजतेज ! त्याची गोष्ट फार निराळी असते. तुला कशाला हीं सोंगें पाहिजेत ?

**जालं०:**–अहो म्हातारेबुवा, आजपर्यंतच्या तुमच्या साऱ्या ओळखी खोट्या झाल्या.

**माध०:**–अहो कंकराव, आधीं मी तुह्मांला एक नवीन ओळख करून देतों ती लक्षांत ठेवा. जालंदर धनुर्धर ह्मणतात तो हाच !

( सर्व सख्या व कंक घाबरतात. )

**कंक०:**–( कांपत ) अरे देवा ! आतां मात्र खास मरतों ! अहो चोरांचे बादशहा ! सोडा मला ! माझ्याजवळ कांहीं नाहीं हो ! ( प्रभावतीकडे बोट दाखवून ) मदयंतीच्या अंगावर पुष्कळ दागिने आहेत ते द्या, म्हणजे तुमचें सात पिढ्यांचें कल्याण होईल ! माझ्यापासून तुह्मांला काय मिळणार ?

**जालं०:**–अहो कंकराव, भिऊं नका. मी तुम्हां सर्वांचा मित्र आहें. शत्रु नाहीं. आतां दुसरी एक मी तुह्मांला ओळख करून देतों. राजकन्या प्रभावती ताईसाहेब ह्मणतात त्या ह्याच !

**कंक०:**–( दचकून ) कुमार, हा सांगतो आहे हें खरें आहे का हो ?

**प्रभा०:**–होय. खरें आहे कंकराव !

**कंक०:**–तुह्मी बोलूं नका. कुमारांना सांगूं दे !

**माध०:**–होय. कंकराव, हें खरें आहे. राजकन्या प्रभावती ती हीच.

**कंक०:**–( टाळी वाजवून हंसून ) अस्सें ! आतां तुमच्याच तोंडानें झालें म्हणून बरें ! मी जर हें आधीं बोललों असतों तर तुम्हीं कधींच मान्य केलें नसतें ! बाकी याच प्रभावती ताईसाहेब आहेत, हें मीं कधींच ओळखलेलें आहे ! अहो, किती झालें तरी राजतेज तें राजतेज ! तें कधीं झांकेल कीं काय ? पण म्हटलें, या प्रभावती ताईसाहेबांच्या मौजेच्या लीला चालल्या आहेत त्या चालूं द्या ! आपण कशाला बोला ! मदयंती म्हणा म्हटलें, हो मदयंती ! गरिबाची मुलगी म्हणा म्हटलें, हो गरिबाची मुलगी ! आपल्याला काय ?

**चप०:**–( प्रभावतीकडे बोट करून ) आणि शें दोनशें रुपये हुंडा भरून या माझ्या सखीला तुम्ही छानदार नवरा पाहून देणार होतां, ते हे कुमार माधवच का हो कंकणराव !

**कंक०:**—आलीस का तूं इथे मला पीडा द्यायला ! आतां कां मी कंकणराव होईन ? आतां इथल्या राणीसाहेब मला मोत्यांचा कंठा देणार आहेत, आणि उज्जनीच्या राणीसाहेब मला हजार मोहरा बक्षीस देणार आहेत ! आणि हीं दोन्ही बक्षिसें मी एकटाच घेणार ! ताईसाहेब, आपण आतां आमच्या धनीण होणार; याकरतां राणी-साहेबांपर्यंत माझा गरिबाचा वशिला लावून आपण तो कंठा मला मिळवून दिला पाहिजे.

**प्रभा०:**—त्या कंठ्यावर आतां तुमचा कांहीं हक्क नाहीं कंकराव ! कुमारांची प्रीति संपादन करण्याच्या कामीं तुम्हीं मला कांहींच मदत केली नाहीं. ती मदत जर कोणी केली असेल तर ती या चपले-नेंच केली आहे. याकरतां तो कंठा मी तिलाच देववणार.

**चप०:**—खरेंच कंकराव ! त्या कंठ्यावर माझाच हक्क आहे.

**कंक०:**—( रडवें तोंड करून ) पण तो कंठा मला फारच आ-वडला आहे.

**प्रभा०:**—बरें आहे. इतकें जर तुमचें त्या कंठ्यावर मन गेलें असलें, तर तो कंठा चपलेच्या गळ्यांत घालून तिच्याशीं तुमचें लग्नच लावून देऊं म्हणजे झालें !

**कंक०:**—नको ! नको !

**जाल०:**—( हंसून ) हें तर फारच उत्तम ! कंकराव, मागें सरूं नका. अहो तुमचें काय जातें ? तुम्हांला कंठा मिळतो आणि त्या-बरोबर एक छानदार बायकोही पण मिळते आहे !

**सर्व जणी:**—हो. हो. असेंच होऊं द्या कंकराव !

**चप०:**—(कंकाजवळ जाऊन ) मी तुम्हांशीं चांगली वागेन, तुम्हांवर प्रीति करीन. एखादे वेळीं बिथरलें म्हणजे मात्र संभाळा हो कंकणराव !

**कंक०:**—नको ! नको ! माझे साडेसाती ! नको ! मला तो कंठा नको ! तूं नकोस ! आणि तूं जिथें असशील तिथून पन्नास कोसांत राहणेंसुद्धां नको ! अहाहा ! परमेश्वरानें काय अजब चीज पैदा केली आहे ! चल निघ !

**प्रभा०:**—चला. आतां उद्यानांत परत जाऊं. जालंदरा, पंधरा दिवस चालू असलेल्या कामदेवाच्या उत्सवाची आज समाप्ति आहे. त्या समारंभाला हजर राहण्यासाठीं तूंही आम्हांबरोबर उद्यानांत चल.

**माध०:**—पण उद्यानांत जाण्याच्या आधीं शिवदर्शन घेऊं म्हणाशीं झालेल्या भयंकर गडबडीमुळें तें तसेंच राहिलें आहे. या प्रदोषकाळीं भगवान् भूतनाथाचें दर्शन घेणें अत्यंत पुण्यदायक आहे. तर चला आतां तिकडेच जाऊं.

( सर्व जातात. पडदा पडतो. )

## भरतवाक्य.

राग—तिलक कामोद. ताल—एक्का.

**प्रणत—भजक—भय—हरण। विषम—लोचन**
**गुण—निधान। मुदंभोद शंभो समर्पों**
**चरणिं सुमन नमुनि ॥ ध्रु० ॥**
**दुरित—चय विलय पावो। सद्गुणाभ्युदय**
**होवो। सुखावो सुजन करिं भव—भंगा।**
**धृतगंगा। सितांगा असंगा मना दे**
**सुमति तवचि भजनिं ॥ ४१ ॥**

---

## अंक पांचवा समाप्त.

संगीत चित्रवंचना नाटक समाप्त.

# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

या पुस्तकांत पटवर्धन सरदारांच्या जुन्या दप्तरांतील ऐतिहासिक महत्त्वाचे अस्सल कागदपत्र प्रसिद्ध होत आहेत. हे कागदपत्र आम्हीं मोठ्या श्रमानें मिळवून त्यांची सालवारी व प्रकरणवारी लावून तारीख, महिना व सन यांच्या अनुक्रमानें छापीत आहों. प्रत्येक पत्रावर तारीख, महिना व सन घालून पत्रांतील मजकुराचें दर पृष्ठावर हेडिंग दिलें आहे व खालीं अर्थाची फोड करण्याकरितां भरपूर टिपाही दिल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरण छापतांना त्यांतील विषयाचें सुसंगत विवेचन करणारी एक एक प्रस्तावनाही जोडिली आहे. पानपतच्या युद्धापासून तों तहत बाजीरावीच्या अखेरीपर्यंतचा इतिहास या पुस्तकांत येणार असून तो त्या त्या काळांतील पेशवे, प्रमुख मुत्सद्दी, व सरदार यांच्याच शब्दांनीं वर्णिला जाणार आहे; मराठी इतिहासाची हौस बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें व प्रत्येक लायब्ररीनें या पुस्तकाचा अवश्य संग्रह करावा. या पुस्तकाचे आजपर्यंत नऊ भाग प्रसिद्ध झाले असून प्रत्येकाची किंमत तीन रुपये आहे. पहिल्या दोन भागांच्या प्रती शिल्लक नाहींत. पुढचे सात भाग, व अधिकारयोग व हरिवंशाची बखर हीं नऊ बुकें एकदम घेतल्यास सतरा रुपयांस मिळतील. टपाल व व्ही. पी. खर्च दीड रुपया निराळा पडेल.

**वासुदेव वामन खरे, मिरज.**

# अधिकार-योग.

अथवा

## नाना फडनवीस यांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास.

'खूब शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नाना फडनविसांनीं राज्य बुडविणाऱ्या एकाहून एक बलिष्ठ अशा प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठीं लढविलेलीं कारस्थानें, तीं लढवितांना त्यांवर आलेलीं दुर्घट संकटें, त्या संकटांतून पार पडतांना त्यांनीं प्रकट केलेली निस्सीम स्वामिभक्ति, उज्ज्वल देशाभिमान व अलौकिक चातुर्य यांचें सप्रमाण वर्णन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन वगैरेंच्या लेखांतून जागोजाग भरपूर उतारे देऊन या ग्रंथांत केलें आहे. किं० ८१०, पोस्टेज ८१.

---

# हरिवंशाची बखर.

अथवा

## पटवर्धन सरदारांच्या हकीकती.

या पुस्तकांत पेशवाईंतील पटवर्धन वगैरे प्रसिद्ध सरदार व थोर थोर मुत्सद्दी यांचे अद्भुत पराक्रम, चातुर्य, धाडस, स्वाभिमान, गुरुजनांविषयीं आदर, मानसिक औदार्य व निस्सीम स्वामिभक्ति वगैरे सद्गुणांचें उत्तम प्रकारें आविष्करण करणाऱ्या आणि वीर, करुण व हास्य या रसांनीं ओथंबलेल्या आख्यायिका असून लढाईंतले, छावणींतले, दरबारचे व नानाप्रकारचे घरगुती प्रसंग फार मनोरंजक प्रकारें वर्णिले आहेत. किं० ८१०, ट. ख. ८१.

---

क्र. 322
नं. ...१७/२८...

# तारामंडळ ( सचित्र ).

( दुसरी आवृत्ति. )

या नाटकांत एका महामनस्क देशभक्ताचा अपूर्व स्वार्थत्याग, देशभक्ति व पितृभक्ति यांमध्यें विरोध आला असतां पितृभक्तीनें हार खाऊन देशभक्तीचें साचिव्य पतकरल्यामुळें झालेले सुपरिणाम, भगवद्भक्तीचें साफल्य, सत्यव्रताचा बाणा, पोकळ श्रीमंतीचा तोरा व दुराग्रह, दुर्जनाचें गूढ निष्ठुर दौर्जन्य, इत्यादि बोध घेण्याजोग्या अनेक गोष्टी मनोवेधक प्रकारानें दाखविल्या आहेत. नाटकांतले प्रसंग विविधरसात्मक कल्पिले असून ते जागोजाग उदात्त विचार व रमणीय कल्पना घालून सुशोभित केले आहेत. यांत अकरा चित्रें घातलीं आहेत. पहिली दोन हजार प्रतींची आवृत्ति दोन वर्षांतच खपून गेल्यामुळें दुसरी आवृत्ति काढावी लागली, हीच गोष्ट या नाटकाच्या लोकप्रियतेची साक्ष देते. किं० ८१२, ट. ख. ८१.

वासुदेव वामन खरे, मिरज.

IRBK-0100222